कर्नाटक सरकार

# समाज विज्ञान

## भाग - 2

# SOCIAL SCIENCE

## Textbook

## Part 2

## मराठी माध्यम

## Marathi Medium

# 8

## इयत्ता 8 वी

## EIGHTH STANDARD

NOT TO BE REPUBLISHED
@KTBS

**KARNATAKA TEXTBOOK SOCIETY (R.)**
6th Cross, Malleshwaram
Bengaluru - 560 003.

# अनुक्रमणिका

J3E9D1


| क्रमांक | प्रकरण | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| | **इतिहास** | |
| 16 | मौर्य आणि कुशाण घराणे | 1 |
| 17 | गुप्त आणि वर्धन घराणे | 7 |
| 18 | दक्षिण भारतातील राजघराणी : सातवाहन, कदंब व गंग | 14 |
| 19 | बदामीचे चालुक्य आणि कांचीचे पल्लव | 22 |
| 20 | मान्यखेटचे राष्ट्रकूट आणि कल्याणचे चालुक्य | 29 |
| 21 | चोळ आणि द्वारसमुद्राचे होयसळ | 36 |
| | **राज्यशास्त्र** | |
| 22 | लोकशाही | 42 |
| 23 | स्थानिक स्वराज्य संस्था | 50 |
| | **समाजशास्त्र** | |
| 24 | दैनंदिन जीवनातील समाजशास्त्र | 63 |
| 25 | समाजाचे प्रकार | 66 |
| | **भूगोल** | |
| 26 | जलावरण | 70 |
| 27 | जीवावरण | 79 |
| | **अर्थशास्त्र** | |
| 28 | अर्थशास्त्राच्या मुलभूत संकल्पना | 87 |
| | **व्यवहार अध्ययन** | |
| 29 | विविध व्यापारी संघटनांचा उदय | 96 |
| 30 | मोठ्या व्यापारी संघटना | 103 |


NOT TO BE REPUBLISHED @KTBS

प्रकरण - 16

# मौर्य आणि कुशाण घराणे

B5Y4U2

**प्रस्तुत प्रकरणात तुम्ही या गोष्टी शिकणार आहात :**

- *भारताने पाहिलेले पहिले साम्राज्य - मौर्य साम्राज्य.*
- *मौर्य साम्राज्यातील प्रसिद्ध सम्राट अशोक यांची कामगिरी, राज्य कारभार, कला आणि शिल्पकला क्षेत्रातील योगदान.*
- *कुशाणांचा इतिहास तसेच कनिष्कांचा राज्यकारभार आणि वास्तुशिल्पकलेतील योगदानबद्दल समजून घेतील.*
- *भारताच्या नकाशात मौर्यांच्या काळातील सम्राट अशोकांचा साम्राज्य विस्तार दाखविणे.*

## मौर्य साम्राज्य

भारतातील पहिले साम्राज्य म्हणजे मौर्य साम्राज्य होय. मौर्यांनी मगध मधून राज्यकारभारास सुरवात केली. चंद्रगुप्त मौर्य, बिंदुसार आणि अशोक हे या घराण्यातील महत्वाचे राजे होते. या घराण्याची स्थापना चंद्रगुप्त मौर्य यांनी केली. ग्रीक - राजदूत मेगॅस्थिनस याने आपल्या 'इंडीका' या ग्रंथात चंद्रगुप्तांच्या प्रसिद्धीचा उल्लेख केला असून ही माहिती अमर आहे. इंडिका हा ग्रंथ उपलब्ध नसल्या कारणाने त्यात काय नमूद केले आहे याची माहीती मिळत नाही. ग्रीक लेखकांनी आपल्या लिखाणात 'इंडीका' ग्रंथातील उदाहरणे दिली आहेत.

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

***अर्थशास्त्र :***

*1902 मध्ये म्हैसूर येथिल ओरिएंटल ग्रंथालयामध्ये आर. रामशास्त्री यांनी कौटिल्यांने रचिलेल्या अर्थशास्त्र या पुस्तकाच्या हस्तलिखीताचा' शोध लावला. हे पाश्चात्य जगाला सापडलेल्या अर्थशास्त्रापेक्षा वेगळे आहे. कौटिल्यानी यामध्ये शासनशास्त्राची तत्वे, राजा आणि मंत्र्याच्या जबाबदाऱ्या परराष्ट्र धोरण आणि आर्थिक नियोजन इ. बद्दल सविस्तर विवेचन केले आहे. गुप्तहेरांचे जाळे आणि सैन्यव्यवस्थेवर अधिक भर दिला आहे. याच्या वैशिष्ट्यामुळे हजारो वर्षानंतर देखील जगभरातील विद्वानांना कौटिंल्यांच्या अर्थशास्त्राचे आकर्षण तितकेच आहे.*

**सम्राट अशोक :**

अशोक हा या घराण्यातील सुप्रसिद्ध राजा होता. या काळामध्ये पाच नगर केंद्रे होती. ती म्हणजे मौर्यांची राजधानी असलेले पाटलीपुत्र, तक्षशिला, उजैणी, कलिंग, तसेच सुवर्णगिरी ही अशोकाच्या साम्राज्यातील प्रमुख दळणवळणांची व्यापारी केंद्रे होती. तक्षशिला हे वायव्य भारताचे प्रवेशद्वार होते. उजैणी हे उत्तरेकडून दक्षिणेकडे व्यापार करणारे प्रमुख ठिकाण होते. कलिंग हे गंगानदीचे मुख तसेच समुद्राचे महाद्वार होते सुवर्णगीरी हे दख्खनचे मध्यभाग असलेले ठिकाण सध्या कर्नाटकात आहे. हे सर्व प्रदेश व्यापारी मार्ग होते तसेच एकमेकांशी जोडलेले होते.



NOT TO BE REPUBLISHED @KTBS

***कलिंग युद्ध :** राज्याभिषेकानंतर 8 वर्षांनी अशोकांनी कलिंग युद्ध पुकारले. या युद्धात सुमारे 1 लाख 50 हजार लोकांना बंदी करण्यात आले. सुमारे एक लाख लोकांचा मृत्यु झाला. कित्येक लोक बेघर झाले. राजा अशोकाचा या युद्धामध्ये विजय झाला. पण युद्धाच्या भीषणतेमुळे त्यांचे मन दुःखी झाले. युद्धातील संहार आणि भीषण दुःखामुळे ते पश्चातापाच्या आगीत होरपळू लागले व त्यांनी यापुढे युद्ध करणार नाही असे ठरवीले व ''दिग्वीजयापेक्षा धर्माचा विजय जास्त श्रेष्ठ'' आहे असे त्यांना वाटू लागले व त्यांनी बौद्ध धर्माचा स्विकार केला. अशोकाने आपले उर्वरित जीवन बौद्ध धर्माच्या शांती तत्वाचा प्रचार करण्यात घालवले.*

**राज्यकारभार :** अशोकाने आपल्या विशाल साम्राज्याचे विविध प्रांतामध्ये विभाजन करून राज्य केले. त्यांच्या राजकीय धोरणांचा आणि अकांक्षांचा उल्लेख शिलालेखांमध्ये आढळतो. हे शिलालेख तसेच स्तंभलेख सर्वात जुने शिलालेख आहेत .यामध्ये अशोकाने देवनाम प्रिया आणि प्रियदर्शी या उपाधींचा वापर केला आहे. सम्राट अशोक कलिंग युद्धानंतर जी जीवित हानी झाली तेव्हा ते बदलले होते. बुद्धांनी उपदेश केलेल्या दयाळूपणाने आणि शिकवणुकीने ते प्रभावित झाले. त्यानंतर त्यांनी बुद्धाच्या विचारांचा देशभर प्रसार करण्यासाठी ''धर्म महामात्रा'' अधिकाऱ्यांची नेमणूक केली. अशोकाने जारी केलेल्या आज्ञापत्रांमध्ये धर्माच्या कल्पना व्यक्त केल्या होत्या .हे अशोक धर्म म्हणून प्रसिद्ध आहेत.




**चार सिंहाच्या मध्ये आकर्षक धर्मचक्र**

सम्राटाला सर्वाधिकार होते. राजाच्या मदतीला मंत्री, पुरोहित, युवराज आणि सेनापती असत. साम्राज्याची विभागणी प्रांतात केली होती. तक्षशिला, उजैन, दौली, सुवर्णगिरी आणि गिरनार ही प्रांतीय कारभाराची केंद्रे होती. रूजुक (न्यायिक अधिकारी), युक्त (माहिती नोंदणी अधिकारी) यासारखे अधिकारी असत. राजधानी पाटलीपुत्रचा कारभार 30 अधिकारी असलेल्या 6 समित्यांमार्फत केला जात असे.

अशोकाने विविध केंद्रामधून विस्तीर्ण भूभागावर, राज्य केले. सर्व केंद्रानी राजाच्या महत्वाकांक्षेची घोषणा केली. त्यांच्या आकांक्षा शिलालेखांमधून व्यक्त केल्या गेल्या. हे शिलालेख तसेच स्तंभालेख सर्वात पहिले शिलालेख आहेत. सम्राट अशोक कलिंग युद्धानंतर जी जीवीतहानी झाली, तेंव्हा तो बदलला. बुद्धाची शिकवण त्याला प्रभावी ठरली. नंतर

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

त्याने देशात व देशाबाहेर बुद्ध धर्माचा प्रचार करण्यासाठी धर्ममहामात्रा व रक्षित यांची नेमणूक केली. अशोकाने निर्माण केलेल्या शिलालेखांमध्ये धर्माबद्दलचे विचार प्रकट झाले हेच विचार अशोकाचे विचार म्हणून प्रसिद्ध झाले.

*अशोकाचे अनेक शिलालेख हे प्राकृत भाषेत आहेत. हे ब्राह्मीलीपीतही आहेत. कर्नाटकातील चित्रदुर्ग जिल्हयातील ब्रह्मगिरी येथे अशोकाचा शिलालेख सापडला आहे. अशोकाच्या सारनाथ येथील स्तंभावरील चार सिंहाची मुद्रा भारत सरकारने राष्ट्रचिन्ह म्हणून स्विकारली आहे.*

या कालावधीमध्ये व्यापक व्यापार तसेच कृषी सुधारणा पहावयास मिळतात. कृषी सुधारणेसाठी विविध कार्यक्रमांचा अंवलंब केला जात असे. या संदर्भात विशेष कर सूट सुविधा प्रदान करण्यात आली होती. विस्तीर्ण प्रदेशावर देखरेख ठेवण्यासाठी वेगवगळ्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांना कायमस्वरूपी सैन्याची गरज होती. जमीन महसुल हे उत्पन्नाचे मुळ स्त्रोत होते. या संकलनासाठी विविध अधिकारी परिश्रम घेत असत. 'हेर' राजाला माहीती देत असत. नदी आणि जमीन मार्ग यावर नियंत्रण आणून व्यापारावर नियंत्रण मिळविले. यावर विविध कर आकारण्यात आले.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## कुशाण घराणे

ग्रीकांच्या नंतर भारतीय इतिहास तसेच संस्कृतीवर कुशाणांचा प्रभाव दिसून येतो. त्यांनी बौद्धधर्माला विशेष प्रोस्ताहन दिले. त्यांच्या राजाश्रयाने महायान पंथाला उत्तेजना मिळाली. कुशाणांच्या काळात गांधारकला विकसीत झाली.

मौर्यानंतर प्रसिद्धीला आलेले कुशाण साम्राज्य होय. ती मूलतः मध्य आशियातून भारतात स्थलांतर केलेली एक भटकी जमात होय. ते यूची जमातीचे वंशज होत. भारताच्या वायव्य भागात स्थायिक झालेल्या परदेशी जमाती म्हणजे शक आणि पार्शियन होय. कुशाण हे शक आणि पर्शियनांचा पराभव करून गंधार भागात स्थायिक झाले.


गंधर्व शैलीतील बुद्ध

या घराण्याचा संस्थापक कजुल कडफायसिस हा होता. विमकडफायसिस आणि कनिष्क हे या घराण्याचे पराक्रमी

वीर होते. युची या रानटी टोळ्या होत. कजुल कडफायसिसच्या नेतृत्वाखाली या टोळ्या एकत्र आल्या. तो हिंदुकुश पर्वतरांगा ओलांडून काश्मिर आणि काबूल येथे स्थायिक झाला विमफडफायसिसच्या काळात सोन्याची नाणी प्रचलित होती. त्यानंतर कुशाणांनी प्रमुख्याने सोने आणि ताब्यांची नाणी पाडली.

विमकड फिससन नंतर कनिष्क राजा झाला. त्याच्या काळात कुशाण साम्राज्य भरभराटीला आले. सा.श. 78 मध्ये त्याने राजसत्ताक पद्धती प्रस्थापित करून एका नव्या पर्वाला सुरवात केली. या वर्षाला 'शक काळ' असे म्हटले जाते.

कनिष्काचे राज्य दक्षिणेतील सांची आणि पूर्वेकडे बनारस पर्यंत पसरलेले होते. त्याच्या विस्तृत साम्राज्यात मध्य आशियाचाही समावेश होता. पुरुषपूर ही त्याची राजधानी होती. मथुरा हे दुसरे महत्वाचे ठिकाण होते. कनिष्काच्या राजाश्रयामुळे पूर्वीपेक्षा अधिक जोमाने बौद्ध धर्माचा प्रसार झाला. अश्वघोष, वासुमीत्र, संघरक्षा आणि इतर बौद्ध वैज्ञानिक या काळात होऊन गेले. कनिष्काच्या नेतृत्वाखाली चौथी बौद्ध धर्मपरिषद काश्मिर येथे भरविली गेली. अशोकाप्रमाणे कनिष्कानेही मध्य आशिया आणि चीनमध्ये बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी धर्मप्रचारक पाठविले. या काळात कला आणि शिल्पकलेला उत्तेजन मिळाले.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**बौद्ध परिषद**

| **परिषद** | **राजाश्रय** | **ठिकाण** | **अध्यक्षपद** |
|---|---|---|---|
| पहिली परिषद | अजातशत्रू | राजगृह | महाकश्यप |
| दुसरी परिषद | कलाशोक | वैशाली | सभाकामी |
| तिसरी परिषद् | अशोक | पाटलीपुत्र | मोगलीपुत्र तिसा |
| चौथी परिषद् | कनिष्क | कुंडल वन | वसुमित्रा |

## स्वाध्याय

**I. योग्य शब्दाने रिकाम्या जागा भरा :**

1. चाणक्य _______ म्हणून प्रसिद्ध झाले.
2. मौर्यांची राजधानी _______ ही होती.

3 कुशाण घराण्याचा संस्थापक _______ हा होय.

4. कनिष्काच्या नव्या पर्वाला _______ असे म्हटले जाते.

**II. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

5. सम्राट अशोकांच्या काळातील प्रमुख नगरांची नावे लिहा.

6. अशोकाच्या राज्यकारभाराचे वर्णन करा.

7 कुशाण कोणत्या वंशाचे होते?

8. कनिष्काचे साम्राज्य कुठपर्यंत विस्तारले होते ?

**III. उपक्रम :**

1. गांधार शैलीची अधिक माहिती संग्रहित करा.

2. कनिष्काच्या काळात झालेल्या बौद्ध महासमेंलनाबद्दल तुमच्या शिक्षकांकडून अधिक माहिती मिळवा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

***

# प्रकरण - 17

# गुप्त आणि वर्धन घराणे

E3J1Q5

**या प्रकरणाच्या अभ्यासाने आपण खालील गोष्टी जाणून घेऊया.**

- *भारताच्या नकाशावर गुप्त साम्राज्याचा विस्तार.*
- *गुप्त घराण्यातील प्रसिद्ध राजे, राज्यविस्तार आणि सुधारणा.*
- *वर्धन घराण्यातील सुधारणा, साहित्य आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदान.*
- *गुप्त घराण्यातील राज्यकारभार, साहित्य आणि विज्ञान क्षेत्रातील योगदान.*

शतकानुशतके राजकिय अनिश्चितीनंतर सा.श. '4' थ्या शतकामध्ये गुप्त साम्राज्याचा उदय झाला. संस्कृत भाषा आणि या भाषेतील विपुल साहित्य हा त्या कालखंडाचा आरसा आहे. मगध हे याचे मुळ स्थान आहे. पहिला चंद्रगुप्त याने लिच्छवी राजकन्येशी लग्न करून आपल्या राज्याचा विस्तार केला. पहिल्या चंद्रगुप्ताने सा.श. 320 मध्ये 'गुप्त शक' सुरू केले. या राजाला 'महाराजाधिराज' हि पदवी मिळाली.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

गुप्त काळातील भारत



**समुद्रगुप्त (सा.श. 335-380) :**

चंद्रगुप्तानंतर त्याचा मुलगा समुद्रगुप्त गादीवर आला. हरिसेनाने लिहिलेल्या 'अलाहाबाद प्रशस्तिमध्ये' त्यांच्या कर्तृत्वाचे वर्णन आहे. ही स्तुतीगाथा संस्कृत भाषेत अशोक स्तंभावर कोरलेली आहे. समुद्रगुप्ताच्या काळात, भारताचा जास्तीतजास्त भाग गुप्तांच्या वर्चस्वाखाली होता. त्याने केलेला अश्वमेध यज्ञ हा त्या काळातीळ वेदकालिन विधी आणि परंपरांची साक्ष देतो. समुद्रगुप्त हा एक शूर योद्धाच नव्हता तर तो थोर कवी आणि संगीत प्रेमीही होता. त्याचे संगीत प्रेम हे त्या काळातील नाण्यावरील विणावादन करत असलेल्या चित्रावरून दिसून येते.

**दुसरा चंद्रगुप्त (सा. श. 380-412) :**

दुसऱ्या चंद्रगुप्ताने समुद्रगुप्ताचे साम्राज्य वाढविले आणि स्थैर्य आणले. त्याने शकांचा पराभव करून पश्चिम भारत आपल्या अंमलाखाली आणला. भारतातील अनेक राजघराण्याशी वैवाहिक संबंध जोडले आणि तो प्रभावशाली झाला. त्याने 'विक्रमादित्य' ही पदवी मिळविली. त्याची कारकीर्द ही त्याने केलेल्या लढायापेक्षा, साहित्य आणि कलेला दिलेल्या उत्तेजनामुळे संस्मरणीय झाली आहे. प्रसिद्ध कवी आणि नाटककार कालीदास हा त्याच्याच काळातील होय. मेघदूत, रघुवंश, कुमारसंभव, आणि ऋतु संहार ही त्याची काव्ये होत. 'अभिज्ञान शाकुंतल' हे त्याचे प्रसिद्ध नाटक होय. शुद्रकाचे मृच्छकटिक आणि विशाखा दत्तचे, मुद्राराक्षस ही त्या काळातील प्रसिद्ध साहित्य कृती होय.



**मेहरूलीतील लोहस्तंभ**

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

***तुम्हाला हे माहित आहे का ?***

*दिल्लीमध्ये कुतुबमिनार जवळ मेहरूली स्तंभ आहे. त्याची उंची 23 फूट 8 इंच आहे. त्यांचे वजन अंदाजे 6 टन आहे. हा लोखंडी स्तंभ त्या काळातील भारतीयांच्या प्रगत तंत्रज्ञानाचे एक उत्तम उदाहरण आहे. आजपर्यंत वातावरणातील बदलांचा त्याच्यावर काहीच परिणाम झालेला नाही. या स्तंभामध्ये फॉस्फरसचे प्रमाण असल्यामुळे गंजण्याची प्रक्रिया मंद असते. म्हणून या लोखंडामध्ये फॉस्फरसचे प्रमाण अधिक आहे म्हणून त्याला गंज धरत नाही.*

### तुम्हाला हे माहित आहे का ?

**मेघदूत:** हे कालिदासाचे अत्यंत प्रसिद्ध काव्य आहे. यक्षाच्या कर्तव्यचुकार पणामुळे कुबेर राजा त्याला राज्याबाहेर जाण्याची आज्ञा करतो. अशा परिस्थितीत वाहणाऱ्या ढगाला अडवून कैलास पर्वताजवळ असलेल्या आपल्या पत्नीला तो प्रेमसंदेश पाठवितो. त्याच्या पत्नीकडे पोहचणाऱ्या मार्गातील सुंदर निसर्ग चित्रांचे वर्णन म्हणजेच मेघदूत. आजसुद्धा ही कविता जगप्रसिद्ध आहे. या कवितेचे भाषांतर सर्व भारतीय भाषेत आणि जगातील प्रमुख भाषात केले गेले आहे. आजतागायत लोक यातील नाट्यरस अनुभवत आहेत. मेघदूतामध्ये उत्तरभारतातील प्रमुख स्थळांचे वर्णन पहावयास मिळते.

### अभिज्ञान शाकुंतल :

हे कालिदासांचे सर्वोत्कृष्ट नाटक आहे. 'शाकुंतल' ही महाभारतातील कथा आहे. या कथेत राजा दुष्यंत शिकार करता करता कण्व ऋषिंच्या आश्रमात येऊन पोहचतो. तेथे तो शकुंतलेच्या प्रेमात पडतो आणि गंधर्व विवाह करतो. हे सर्व कण्व ऋषिंच्या अपरोक्ष घडते. दुष्यंत शकुंतलेला आश्रमात सोडून आपल्या राजधानीत परततो. या विरह काळातच दुर्वास ऋषिचे आश्रमात आगमन होते. शकुंतला दुष्यंताच्या आठवणीत मग्न असल्यामुळे दुर्वासांचे आदरातिथ्य करु शकत नाही. त्यामुळे क्रोधित होऊन ऋषी तिला शाप देतात. ''ज्याच्या आठवणीत तू मग्न आहेस त्याला तुझे विस्मरण होईल'' शापाची कठोरता लक्षात घेऊन पुन्हा तिला ते उःशाप देतात. की दुष्यंताने दिलेल्या भेटवस्तू (अंगठी) चे दर्शन होताच त्याला सर्वकांही आठवेल. शकुंतला गर्भवती असल्याने कण्व ऋषी तिला पोहचविण्यास दुष्यांताच्या दरबारी जातात. वाटेत जाताना शकुंतला त्यांच्या प्रेमाची खूण हरवते. त्यामुळे दुष्यंत तिला ओळखू शकत नाही. अपमानग्रस्त शकुंतला राजवाडा सोडते कांही दिवसानंतर ती अंगठी माश्याच्या पोटात सापडते. ती पाहताच दुष्यंताला सर्वकांही आठवते. त्याला पश्चाताप होतो. कांही दिवसांच्या प्रवासानंतर तो परतत असताना साधू मरिचांच्या आश्रमाला भेट देतो. तेथे सिंहाच्या बछड्यांशी खेळत असलेला मुलगा तो पाहतो. त्या मुलाची चौकशी करताच तो त्याचाच मुलगा असल्याचे समजते. अशा रितीने तो आपली पत्नी शकुंतला आणि मुलगा 'सर्वदमन' याला भेटतो.'अभिज्ञान शाकुंतल' हे जगातील सर्वोत्कृष्ट नाटक आहे.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

या कालावधीत गुप्तांचा पाश्चिमात्यांशी चाललेला व्यापार ठप्प झाला. परिणामत: त्यांचा आर्थिक व्यवहार थंडावला. त्यांच्या साम्राज्यावर लादलेल्या अटीमुळे अंतर्गत व्यापारालासुद्धा खीळ बसली. खेड्यामध्ये व्यापाराचे प्रमाण अत्यल्प होते. साहजिकच शहरी व्यापाराला याची धग जाणवू लागली पाटलीपुत्र नगरीला खेड्याचे स्वरूप प्राप्त झाले.

हा काळ स्मरणीय झाला. कारण पुराणासारख्या विविध, भक्तिपूर्ण आणि धार्मिक लेखनांची निर्मिती झाली. वराहमिहिर, भास्कर, आर्यभट्ट, चरक आणि सुश्रुतासारखे थोर शास्त्रज्ञ हे या काळातील होते. वराहमिहिर, भास्कर आणि आर्यभट्टाने खगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्र आणि गणितासारख्या विषयात फार मोलाची भर घातली, चरकाने 'चरकसंहिता' लिहिली, सुश्रुत्ताने 'सुश्रुतसंहिता' लिहिली जी शल्यचिकित्सेशी निगडीत आहे.

***गुप्तकाळातील शास्त्रज्ञ :***

***1. धन्वंतरी :*** *हा वैद्यशास्त्रातील प्रसिद्ध विद्वान होता. तो आयुर्वेदात निष्णात होता. त्याला भारतीय वैद्यकशास्त्राचा जनक म्हटले जाते. त्यांनी आयुर्वेदिक शब्दकोष तयार करून, भारतीय वैद्यक शास्त्रामध्ये मोलाची भर घातली.*

***2. चरक :*** *हा वैद्यक शास्त्रज्ञ होता. 'चरकसंहिता' ही वैद्यकशास्त्राला लाभलेली प्रमुख देणगी होय.*

***3. सुश्रृत :*** *हा शल्यचिकित्सक होता. तो शस्त्रक्रियापद्धती समजावून सांगणारा पहिला भारतीय होता. सैनिकांसाठी वेगळी चिकित्सापद्धती होती. याची त्याकाळी नोंद झाली आहे. आधुनिक शस्त्रक्रिया पद्धत व त्याने स्पष्टीकरण केलेल्या शस्त्रक्रिया पद्धती यांच्यामध्ये साम्य आढळते. हे त्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे.*

***4. आर्यभट्ट :*** *हा प्रसिद्ध खगोल शास्त्रज्ञ आणि गणिततज्ञ होता. तो वराहमिहिरानंतरचा प्रसिद्ध शास्त्रज्ञ होता. खगोलशास्त्र आणि गणिताच्या क्षेत्रात त्याची कामगिरी अद्वितीय आहे. भारतीय सरकार थोर शास्त्रज्ञांना आर्यभट्ट पुरस्कार देते. भारतीय उपग्रहाला आर्यभट्ट असेच नांव दिले आहे. त्यानीच शून्याचा शोध लावला. बीजगणितावर प्रभुत्व मिळवणारा तो पहिला भारतीय होता. सूर्यग्रहण व चंद्रग्रहण राहुमुळे होत नसून ते पृथ्वीच्या परिभ्रमणामुळे होते हे सिद्ध केले.*

***5. वराहमिहिर :*** *हा एक प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ होता. त्याने खगोलशास्त्रावरील 'पंचसिद्धांतीक' हा ग्रंथ लिहिला, जे खगोलशास्त्राचे बायबल म्हणून ओळखले जाते. 'बृहत्तसंहिता', बृहतजातक आणि लघुजातक इत्यादी ग्रंथ त्याने लिहिले. खगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्र, भूगोल आणि हवामानशास्त्र यामध्ये तो पारंगत होता.*

NOT TO BE REPUBLISHED
@KTBS

# वर्धन घराणे

सुमारे 2 शतके राज्यकारभार करणाऱ्या गुप्त साम्राज्याचे सा.श. 6 व्या शतका दरम्यान विभाजन झाले व लहान-मोठी राज्ये उदयाला आली. वर्धनांचे राज्य हे त्यापैकीच एक होय. त्यांनी सा.श. 6 व्या शतकात थानेश्वर येथून राज्यकारभार केला. काही ताम्रपट, बाणाचे हर्षचरित्र आणि चिनी प्रवासी ह्यू-एन-त्संगचे लिखाण या काळावर प्रभाव टाकते.

पुष्यभूती हा वर्धन घराण्याचा संस्थापक होय. प्रभाकरवर्धन आणि हर्षवर्धन हे या घराण्यातील महत्वाचे राजे होते. त्यांच्या वडीलांच्या मृत्युनंतर प्रभाकर वर्धन आणि त्याचे भाऊ राजवर्धन हर्ष हे थानेश्वरचे प्रमुख बनले. त्यांची बहीण राजेश्वरी कनोज राजाशी विवाहबद्ध झाली.

बंगालचा राजा शशांकने कनोजच्या राजाला ठार केले तेंव्हा हर्षाने कनोज ताब्यात घेऊन बंगालच्या राजावर आक्रमण केले. बंगाल आणि मगध हर्षाच्या वर्चस्वाखाली आले. पण नर्मदे पलीकडे दक्षिण भागात त्याला पुढे येणे शक्य झाले नाही. कन्नड चालुक्यराजा दुसरा पुलकेशी याने त्याच्या प्रगतीला खीळ घालून परत जाण्यास भाग पाडले. दुसऱ्या पुलकेशीचा हा विजय त्याचे राजकवी रवीकिर्तीच्या प्रशस्तिमध्ये दुसऱ्या पुलकेशीच्या पराक्रमाचा उल्लेख त्याच्या दरबारी कवी रवीकीर्तीने रचलेल्या ऐहोळे शिलालेखात आढळतो. आपल्या लिखाणाने अविस्मरणीय केला आहे. त्याने असेही व्यक्त केले की झालेल्या पराभवामुळे हर्षाचा परमानंद लोप पावला.

**राज्यकारभार :** राजाला राज्यकारभारात मंत्रीमंडळाची मदत होत असे महासंधीविग्रह (मध्यस्थ), महाबलाधीकृत (महासेनापती), भोगपती (महसूल अधिकारी) आणि दूत अशी नोकरशाहीची चौकट होती. राज्याचे प्रांतामध्ये विभाजन केले होते. जमीन महसुल हे राज्याच्या उत्पन्नाचे मुख्य साधन होते. मांडलिक राजे खंडणी देत असत.

राजा त्यांना जमिनी बहाल करीत असे व त्या बदल्यात युद्ध काळात सैन्याची मदत घेत असे. ज्यावेळी राजा राज्य चालविण्यास असमर्थ झाला त्यावेळी मांडलिकांचे वर्चस्व वाढून ते स्वतंत्र झाले.

कांही जमाती आणि पुरोहित वर्गाला जमिनी बहाल करण्यात आल्या. हर्षाने बौद्ध धर्माला महत्व दिले. ह्यू-एन-त्संगच्या लिखाणात बौद्ध धर्माच्या प्रसिद्धीची इत्यंभूत माहिती मिळते. या काळात बौद्धांचे नालंदा विद्यापीठहे शैक्षणिक चळवळीचे केंद्र होते. त्याला राजाश्रय मिळाला होता.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

# नालंदा विश्वविद्यालय



बुद्धाचे गतजन्मीचे नाव 'नालंद' होते. असे बौद्ध अनुयायांचे मत आहे. हे विश्वविद्यालय प्राचीन विद्यापीठ म्हणून प्रसिद्ध आहे. बुद्धाने नालंदा विद्यापिठाला भेट दिली होती. 25 मीटर उंचीची बुद्धाची पितळीमुर्ती हर्षवर्धनाने नालंदा विद्यापिठाला देणगीदाखल दिली अशी नोंद आहे. कुमार गुप्ताने येथील कला विद्यालयाला सहाय्य केले होते. नागार्जुन नावाचा विद्वान येथे होता. दिन्नगा आणि धर्मपाल हे प्रसिद्ध विद्वान होते. चिनी प्रवासी ह्यू- एन-त्संगने नालंदा विद्यापिठाला भेट दिली होती. कांही काळ वास्तव्यही केले होते. या ठिकाणाच्या बारीक तपशीलांची नोंद त्याने केली आहे. या ठिकाणी स्तूप, चैत्यालय, विहार, विश्रामधाम आणि बसण्यासाठी पायऱ्यांची सोय होती. त्याचबरोबर ध्यानमंदीर व्याख्यान आणि इतर उपक्रमांसाठी खोल्या होत्या. या सर्वांमुळे तेथील वैभवात भर पडली होती. अशोक, गुप्तराजे आणि हर्षवर्धन हे या ठिकाणाचे नावाजलेले आश्रयदाते होते. अपघाताने लागलेल्या अग्निमुळे येथील मूळग्रंथाचा नाश झाला आहे. बख्तियार खिलजी याच्या वैचारिक हल्यामुळे नालंदा विद्यापीठाचे वैभव नष्ट झाले.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. गुप्तांनी आपली कारकिर्द ______ या ठिकाणाहून सुरु केली.

2. पहिल्या चंद्रगुप्ताला ______ असे म्हटले जात असे.

3. कालिदासाचे प्रसिद्ध नाटक ________ होय.

4. विशाखादत्तची ________ ही प्रसिद्ध साहित्यकृती होय.

5. शुद्रकाने ________ ही साहित्यकृती लिहिली.

6. वर्धन घराण्याचा संस्थापक ________ हा होय.

**II. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

7. दुसऱ्या चंद्रगुप्ताबद्दल माहिती लिहा.

8. गुप्त साम्राज्याच्या ऱ्हासाची कारणे कोणती?

9. गुप्त कालीन प्रसिद्ध शास्त्रज्ञ कोण होते?

10. वर्धनाचा राज्यकारभार कसा होता ?

11. नालंदा विश्वविद्यालयाबद्दल माहीती लिहा.

**III. उपक्रम :**

1. कालिदासांच्या साहित्यकृतींची माहिती गोळा करा.

2. गुप्तकाळातील शास्त्रज्ञांची माहिती व चित्रे गोळा करा.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

***

## प्रकरण - 18

# दक्षिण भारतातील राज्यघराणी

## सातवाहन, कदंब व गंग

## (सा.श.पू. 3 ते सा.श. 13 व्या शतकापर्यंत)

H2P8W4

**या प्रकरणाच्या अभ्यासाने आपण खालील गोष्टी जाणून घेऊया.**

- *दक्षिण भारतातील सातवाहनांचा राज्यविस्तार, त्यांचे कार्य राज्यकारभार, कला आणि शिल्पकला. गौतमीपुत्र शातकर्णीचे योगदान.*
- *कर्नाटकामध्ये प्रथम साम्राज्य स्थापन करणारा कदंब वंश.*
- *कदंब घराण्याचा प्रसिद्ध राजा मयूरवर्मा, त्याच्या राज्यकारभार, कला, शिल्पकला व धार्मिक योगदान.*
- *गंग घराण्याची स्थापना, कला, शिल्पकला व साहित्य क्षेत्रात गंगांची देणगी.*
- *गंग आणि कदंबांचा साम्राज्य विस्तार नकाशात दर्शविणे.*

विंध्य पर्वतामुळे भारताचे दक्षिण आणि उत्तर असे दोन भाग झाले. विंध्य पर्वत आणि कन्याकुमारीमधील भाग दक्षिण भारत किंवा दख्खन म्हणून ओळखला जातो. सातवाहन, कदंब, गंग, चालुक्य, राष्ट्रकूट आणि पल्लव ही दक्षिण भारतात प्रमुख घराणी होऊन गेली.

### सातवाहन (सा.श.पू. 230 ते सा.श.220)

दख्खन प्रदेशावर राज्य करणारे सातवाहन हे पहिले घराणे होय. चंद्रगुप्ताच्या काळात सातवाहन राजे गोदावरी आणि कृष्णा या नद्यांच्या भूभागात राज्य करत होते. ते चंद्रगुप्ताचे मांडलिक होते व त्याला ते खंडणी देत. सा.श.पू.220 मध्ये सिमुख राजा स्वतंत्र झाला आणि श्रीकाकूलम हे राजधानीचे ठिकाण केले.

**गौतमीपुत्र शातकर्णी :**

हा या घराण्याचा प्रमुख राजा होता. त्याने राज्याच्या कडव्या शत्रूंना शकांना भारताच्या हद्दीतून हाकलण्याचे धाडस केले. हिंदू पंचांग अथवा कालगणना 'शालिवाहन शकाची' सुरुवात बहुधा गैतमीपुत्र शातकर्णीने केली असावी असे मानले जाते. त्याने आपल्या साम्राज्याचा विस्तार कोकण, बिरार, सौराष्ट्र, माळवा एवढेच नव्हे तर इत्तर प्रदेशातही केला. 'त्रिसमुद्रतोयापितवाहन' 'कुलण्यप्रतिष्ठापनंक' व 'सातवाहन' या पदव्या त्याने प्राप्त केल्या.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

यज्ञश्री शातकर्णी हा या वंशाचा शेवटचा राजा होता. त्याच्या काळात शकांच्या सततच्या आक्रमणामुळे हे साम्राज्य खिळखिळे झाले.

सातवाहनांच्या कारकीर्दीत राजा हा सर्वोच्च अधिकारी असे. सोयीनुरूप राज्याची विभागणी जिल्ह्यात करून त्याला 'जनपद' असे म्हटले जात असे. त्यांच्या व्यवस्थापनासाठी अधिकारी नेमलेले होते. खेडी आणि नगरांची व्यवस्था स्थानिक संस्थांच्याकडे असे.

समाजात वर्णभेदाला स्थान नव्हते. स्त्रिया उच्च पदांचा उपभोग घेत असत. समाजामध्ये शेतकरी, कारकून, व्यापारी, सोनार, कोळी, सुतार, विणकर, वैद्य इ. व्यवसाय करणारे लोक होते. व्यापारी आणि कामगार संघटना आस्तित्वात होत्या. आजसुद्धा अशा संघटना कार्यरत आहेत. या काळात व्यापार भरभराटीला आला होता. परदेशी व्यापाराला उत्तेजन दिले जात होते. नाशिक, कल्याण, भडोच आणि भटकळ ही व्यापारी केंद्र होती.



**कार्लेतील चैत्यालय**

वैदिक धर्माचे पालन करणाऱ्या सातवाहनांनी बौद्ध आणि जैन धर्मांना उत्तेजन दिले. धार्मिक एकात्मतेवर त्यांचा विश्वास होता.

त्यांनी कला, साहित्य, शिक्षणाला प्रोत्साहन दिले. प्राकृत भाषेचा वापर विद्वान आणि सामान्य माणूस करत असे. साहित्याची निर्मिती सुद्धा या भाषेतच झाली. याचे एक उदा. म्हणजे हलाने लिहिलेले 'गाथासप्तशती' होय. याच काळात अजंठा आणि अमरावती मधील चित्रकला सुरु झाली. राजवाडे, देवळे, विहार, चैत्यालय आणि किल्ले बांधले गेले. बनवासीचा व्यापारी भूतपालाने कार्ले येथे चैत्यगृह बांधले आहे. सातवाहनांच्या कारकिर्दीत कन्नड भूमी वैभवसंपन्न झाली. येथे अनेक साहसी आणि योग्य राज्यकर्ते होऊन गेले. त्यानी भारतीय संस्कृतीमध्ये भर टाकली.

## कदंब घराणे (सा.श. 325 ते सा. श. 540)

कर्नाटकात स्थापन झालेले कदंब हे पहिले राज्यघराणे होते. बनवासी ही त्यांची राजधानी होती (उत्तर कन्नड जिल्ह्यात आहे) मयूरशर्मा हा या घराण्याचा संस्थापक व प्रसिद्ध राजा होता. मयूरशर्माचा अपमान पल्लव राजा शिवस्कंदवर्मा याने केला तेव्हा

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

मयूरशर्माने क्षत्रिय धर्म स्विकारला व स्वतःला 'मयूरवर्मा' म्हणवू लागला त्याने पल्लवांना पराभूत करून कदंबांचे साम्राज्य स्थापन केले.

कदंबांनी कर्नाटकात व भारतीय संस्कृतीत भर घातली. कदंबांचे वर्चस्व असताना जवळ जवळ तीनशे वर्षे राजकीय एकी साधली. पुरोहित, मंत्री आणि सेनाधिकारी यानी राज्यकारभारात विशेष भूमिका पार पाडली. राज्यकारभाराच्या सोयीसाठी प्रांताधिकारी नेमले होते.

*चित्रदुर्गमधील चंद्रावळीत सापडलेल्या शिलालेखानुसार मयूर वर्माने येथील सरोवरच्या भिंती उंच केलेल्या आहेत.*

राज्याच्या उत्पन्नाचे जमिन महसूल हे प्रमुख साधन होते. सुतारकाम, लोहारकाम, सोनारकाम, कापड विणणे, तेल गाळणे, कुंभार काम इ. समाजातील प्रमुख व्यवसाय होते. व्यापार आणि शेतीला अधिक उत्तेजन दिले. समाजात वर्णपद्धती अस्तित्वात होती. एकत्र कुटुंब आणि पितृ प्रधान कुटुंबाला प्राधान्य दिले जात असे.

**कदंब साम्राज्य नकाशा**




@KTBS NOT TO BE REPUBLISHED



**बनवासीमधील मधुकेश्वर मंदिर**

कदंबानी वैदिक संस्कृतीचे अनुकरण केले असले तरी त्यानी बौद्ध आणि जैन धम र्ला उत्तेजन दिले. त्यानी हनगल पुलीगेरे आणि इतर ठिकांणांच्या जैन बस्तीला देणगी देऊन जैन धर्म व संस्कृतीला प्राधान्य दिले. कदंब राज्यात बौद्ध धर्मालाही श्रेष्ठत्व प्राप्त झाले होते. अजंठा आणि बनवासी ही दोन बौद्ध धर्माची महत्वाची केंद्रे होती मंदिरे ही सण, उत्सव व जत्रा साजरे करण्याची प्रमुख ठिकाणे होती. प्राकृत आणि संस्कृत या दोन्ही भाषांना प्रोत्साहन मिळाले होते. प्रथम प्राकृत आणि नंतर संस्कृत या राज्यभाषा होत्या. कन्नड ही बोलीभाषा होती. प्राचीन हालमिडी शिलालेखात 5 व्या शतकात कन्नड भाषा उपयोगात असल्याचे पुरावे आढळतात. हालमिडी शिलालेख हा कन्नड भाषेतील पहिला शिलालेख होय.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

*मळवल्ली शिलालेख प्राकृत भाषेत आहे. तर तलगोंडा हा शिलालेख संस्कृतमध्ये आढळून आलेला कर्नाटकातील पहिला होय.*

कदंबांनी कर्नाटकात वास्तु कलेचा पाया घातला. त्यानी बनवासीमध्ये अनेक मंदिरे आणि बस्ती बांधल्या. याच काळात आग्रहार, ब्रम्हपूरी, घटिका अशी शैक्षणिक केंद्रे स्थापन केली. त्या काळातील प्रमुख आग्रहार तलगोंडा आणि बलीगावे येथे आढळून आले. आग्रहार हे निवासी शाळा सारखे होते.

# गंग घराणे. (सा.श. 350 ते सा. श. 1004)

गंग वंशाचा उत्कर्ष आणि ऱ्हास कर्नाटकाच्या इतिहासातील महत्वपूर्ण अध्याय आहे. गंगघराण्याचा संस्थापक हा इक्ष्वाकू घराण्यातील होता असे मानले जाते कुवलाल, तलकाडू आणि मान्यपूर (आजचे मन्ने), नेलमंगल आणि ग्रामिण बेंगळूर जिल्हा येथून त्यानी राज्यकारभार केला.

गंगांचे राज्य दडीगाच्या कारकीर्दीत सुरु झाले. या घराण्यात 27 राजे होवून गेले. दुर्विनित हा या घराण्याचा प्रसिद्ध राजा होता. तो शूर योध्दा आणि विद्वान होता. त्याने दीर्घकाळ राज्य केले. आपले राज्य बळकट करण्यासाठी पुन्नतांच्यावर ताबा मिळविला. नाळल्ला येथे सापडलेल्या ताम्रपटानुसार त्याने पाणी पुरवठ्याकरिता अनेक तलावांची निर्मिती केली. पाणी पुरवठा करिता अनेक तलाव बांधले हे शिलालेखावरून कळते तो साहित्याचा भोक्ता होता. त्याने संस्कृत व कन्नडमध्ये साहित्य रचले. गुणाढ्याच्या वोड्डुकथांचे प्राकृतमधून संस्कृतमध्ये भाषांतर केले.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**गंगाचे योगदान :**

राजाला सहाय्य करण्यासाठी मंत्रीमंडळ होते. राज्यकारभाराच्या वेगवेगळ्या शाखा व मंत्री कार्यरत होते. खेड्यांचा राज्यकारभार सुव्यवस्थित होता. ग्रामसभा, जमीन महसूल, कर, न्याय, स्वच्छता आणि संरक्षणाची जबाबदारी घेत असे. कृषी हा मुख्य व्यवसाय होता. विणकाम आणि कुंभारकला हे इतर व्यवसाय होते. गंगांचे परदेशाशी व्यापारी संबंध होते.

या काळात समाज वेगवेगळ्या जाती जमातीत विभागला गेला असला तरी परस्परांवर अवलंबून होता. पितृप्रधान एकत्र कुटुंब पद्धत सर्वमान्य होती. प्रामाणिकपणा, एकनिष्ठता, शौर्य, धैर्य ही सामाजिक मूल्ये होती. चैत्यालये, मंदिरे, मठ आणि आग्रहार ही शैक्षणिक केंद्रे होती. ब्रह्मपुरी आणि घटिका या ठिकाणी उच्च शिक्षण दिले जात असे. तलकाडू, श्रवणबेळगोळ, बंकापूर आणि पेरू ही त्या काळातील महत्वाची शिक्षणकेंद्रे होती.

गंग हे जैनधर्मिय असल्याने जैनधर्माची भरभराट झाली. पूज्यपाद, वज्रनंदी, अजितसेन इत्यादींनी या धर्माला प्रसिद्धी मिळवून दिली. श्रवणबेळगोळ येथील 58 फूटी गोमटेश्वरांचा एकाच शिळेत कोरलेला दगडी पुतळा याच काळात तयार झाला. दर 12 वर्षांनी गोमटेश्वराचा होणारा महामस्तकाभिषेक तुम्ही पाहिला असेल.

गंगराजानी कला आणि शिल्पकलेला उत्तेजन दिले. त्यानी अनेक मंदिरे आणि बस्तींची निर्मिती केली. मन्ने येथील कपिलेश्वर मंदिर, तळकाडू येथील पाताळेश्वर आणि मारुलेश्वर मंदिर, कोलारमधील कोलारम्म मंदिर, बेगूरमधील नगरेश्वर मंदिर आणि श्रवणबेळगोळ मधील गोमटेश्वरांचा पुतळा ही त्यांच्या उत्तम शिल्पकलेची उदाहरणे आहेत. महास्तंभ आणि ब्रह्मस्तंभ हे खांब गंगाची देणगी आहे.

### *बाहुबली - गोमटेश्वर*



बाहुबली-गोमटेश्वर

*श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वर (बाहुबली) हा त्यागाचे प्रतिक आहे. रासमल्ल चौथा याचा मंत्री चौंडरायाने हा पुतळा उभा केला. शंभर भावामध्ये भरत हा ज्येष्ठ तर बाहुबली हा सर्वात लहान होता. भरताच्या राज्यरोहणानंतर त्याला चक्ररत्न मिळाले. तो आजूबाजूची राज्ये जिंकून सम्राट बनला. याच्याही पूर्वी त्याच्या भावानी त्याचे अधिपत्य स्वीकारले पण बाहुबलीने त्याला विरोध करून युद्ध पुकारले. दृष्टीयुद्ध, जलयुद्ध आणि मल्लयुद्धात भरत पराभूत होतो. मल्लयुद्धामधे बाहुबली भरताला उचलून हवेत गोल फिरवून फेकत असताना अचानक त्याचे मनपरिवर्तन होऊन भरताला खाली ठेवतो. आपल्या भावाला शरण येऊन तो निर्वाणासाठी प्रार्थना करतो. जोपर्यंत मुक्ती मिळत नाही तोपर्यंत उभे राहण्याचा पण होता. ज्योतिषांच्या सांगण्याप्रमाणे बाहुबली आपल्या भावाच्या राज्यात उभे राहून ध्यान करीत आहे. पण त्याला मुक्ती मिळत नाही, निर्वाण प्राप्त होत नाही. पण ज्यावेळी भरत घोषित करतो की हे संपूर्ण राज्य बाहुबलीचे आहे आणि त्याच्यातर्फे माझ्याकडून राज्यकारभार पाहिला जाईल. तेव्हा बाहुबलीला निर्वाण (मुक्ती) प्राप्त होते.*

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS



**तलकाडूमधील पाताळेश्वर मंदिर**

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

गंगराजे हे साहित्याचे भोक्ते होते. त्याकाळात संस्कृत, प्राकृत आणि कन्नड भाषेमध्ये साहित्याची निर्मिती झाली. दुसऱ्या माधवाने 'दत्तकसूत्र' हे वर्णन लिहिले आहे. दुर्विनिताने 'शब्दावतार' ही संस्कृत साहित्य रचना लिहिली गुणाढ्याच्या 'वोड्डुकथांचे' संस्कृतमध्ये भाषांतर केले. श्री पुरुषाने 'गजशास्त्र' लिहिले. शिवमारने 'गजाष्टक' या कन्नड कृतीची रचना केली. हेमसेनने 'राघव पांडवीय', वादीबसिंहाने 'गद्यचिंतामणी' आणि 'शास्त्रचूडामणी' तर नेमचंद्राने 'द्रव्यसार संग्रह' आणि चौंडरायाने 'चौंडपुराण' लिहिले.

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. सिमुखाने ________ ही आपली राजधानी केली.
2. हलाने ________ हा ग्रंथ लिहिला.
3. कन्नड भाषेतील पहिला शिलालेख ________ होय.
4. कदंबाची राजधानी बनवासी ही आताच्या ________ या जिल्ह्यात आहे.
5. गंग घराण्यातील ________ हा मुख्य राजा होय.
6. चौंडरायाने लिहिलेला ग्रंथ ________ हा होय.

**II. थोडक्यात उत्तरे लिहा :**

7. सातवाहन घराण्यातील शेवटचा राजा कोण?त्यांचा शेवट कसा झाला?

8. सातवाहन काळातील कलेबद्दल थोडक्यात माहिती लिहा ?

9. गंगाच्या कारकीर्दीत कोणत्या सामाजिक मूल्याना महत्व होते?

10. गंगाच्या काळातील चार ग्रंथांची नावे लिहा.

**III. उपक्रम :**

1. शिलालेखांच्या वाचना बाबत शिक्षकांशी चर्चा करा.
2. तुमच्या जवळ असलेल्या ऐतिहासिक देवळांना भेट देऊन त्याची माहिती गोळा करा आणि तुमच्या मित्रांशी चर्चा करा.

**IV. प्रकल्प :**

1. शिलालेख वाचनांची आवड निर्माण करणे.
2. कोणत्याही एका शिलालेखाचा अभ्यास करून त्यावर योजना तयार करा.
3. गंगाच्या राजधानीला भेट देवून त्याबद्दल माहिती गोळा करा.

***

NOT TO BE REPUBLISHED
@KTBS

## प्रकरण - 19

# बदामीचे चालुक्य आणि कांचीचे पल्लव

D8R7P5

**या प्रकरणाच्या अभ्यासाने आपण खालील गोष्टी जाणून घेऊया.**

- *बदामीच्या चालुक्य साम्राज्याचा आरंभ, प्रसिद्ध राजा, दुसऱ्या पुलकेशीचा राज्यविस्तार.*
- *धार्मिक, सामाजिक, संरक्षण आणि न्यायव्यवस्था.*
- *बदामीच्या चालुक्यांचे साम्राज्य नकाशात ओळखणे.*
- *कांचीच्या पल्लवांचे साहित्य, धर्म, कला शिल्पकला आणि शिक्षण क्षेत्रातील योगदान.*

## बदामीचे चालुक्य (सा.श. 540 ते 753)

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सा.श. 6व्या शतकात अनेक पराक्रमी राजांनी कर्नाटकावर राज्य केले. त्यापैकी एक म्हणजे बदामीचे चालुक्य. सतत दोन शतके कर्नाटकावर वर्चस्व प्रस्थापित करून वैभव संपन्न राज्यकारभार केला. दक्षिण भारताच्या इतिहासात एक शक्तिशाली राज्य म्हणून बदामीच्या चालुक्यांचे स्थान आहे.

सा.श. 6व्या शतकापासून ते 8व्या शतकाच्या मध्यापर्यंत बदामीच्या चालुक्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. राजा जयसिंह हा या घराण्याचा संस्थापक होता. दुसरा पुलकेशी हा या घराण्यातील अत्यंत बलाढ्य आणि शूर सम्राट होय. गंग, कदंब, आणि आळूप यांच्यावर वर्चस्व मिळवून त्याने आपल्या साम्राज्याचा विस्तार केला.

दक्षिणेत पल्लवांचे राज्य वैभवाच्या शिखरावर होते. राजा महेंद्रवर्माने दुसऱ्या पुलकेशीचे वर्चस्व अमान्य केल्यामुळे तो पराभूत झाला. जेंव्हा उत्तर भारतातील हर्षाने नर्मदापलीकडे येण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याला पुलकेशीने रोखले. या विजयामुळे त्याला ‘दक्षिण पथेश्वर’ आणि ‘द्वीपकल्पाचा सम्राट’ या उपाध्या मिळाल्या.

दुसऱ्या पुलकेशीला एकाच ठिकाणाहून आपल्या प्रचंड साम्राज्यावर राज्यकारभार करता येऊ न शकल्यामुळे त्याने आपला भाऊ कुब्जा विष्णूवर्धन याला वेंगीचा व्यवस्थापक म्हणून नेमले. तर जयसिंहाला गुजरात प्रांताचा व्यवस्थापक म्हणून नेमले. नंतर याच घराण्याने जवळजवळ 5 शतके वेंगीचे चालुक्य म्हणून राज्यकारभार केला.



बदामीचे चालुक्य

ह्यू-एन.त्संगने चालुक्यांच्या राजधानीला भेट दिली होती. त्याने आपल्या लिखाणात दुसऱ्या पुलकेशी व त्याच्या साम्राज्याबद्दल विस्तृत वर्णन केले आहे. राजा न्यायी आणि दयाळू होता. त्याचे सैन्य शिस्तबद्ध आणि निधड्या छातीचे होते. प्रजा सत्यप्रिय, समाधानी, स्वाभिमानी, संपन्न आणि राजांशी एकनिष्ठ होती. प्रजेला राजाबद्दल प्रचंड आदर होता. आणि राजाचे प्रजेवर अत्यंत प्रेम होते.

दुसरा पुलकेशी आशावादी सम्राट होता. त्याचे विदेशी राजांशी मैत्रीपूर्ण संबंध होते. पार्शियन राजा दुसरा खुस्त्रोशी त्याचे राजकीय संबंध होते अशी अरबी इतिहासकारांची नोंद आहे.

काही वर्षानंतर पल्लव राजा पहिल्या नरसिंहवर्माने आपला पिता महेंद्रवर्माच्या पराभवाचा बदला घेण्यासाठी चालुक्यावर आक्रमण केले. त्याने वातापी ताब्यात घेतले. शेवटचा चालुक्य राजा कीर्तीवर्माच्या काळात राष्ट्रकूटांनी त्याचे राज्य जिंकून घेतले.

**चालुक्यांचे योगदान :**

चालुक्यांनी कन्नड भूमी, भाषा आणि संस्कृतीची वाढ केली. येथील धर्म, साहित्य, कला आणि शिल्पकलेचे संवर्धन आणि रक्षण केले. त्यांच्या सैन्याला 'कर्नाटबल' असे म्हणतात चालुक्यकाळ हा कर्नाटकाच्या इतिहासातील थोर आणि वैभवसंपन्न काळ होता. हा काळ फक्त सैनिकी पराक्रमासाठीच नव्हे तर कला आणि साहित्यासाठी संस्मरणीय आहे.

चालुक्यांनी जवळजवळ 200 वर्ष राज्य केले. राजाचा राज्यकारभारात सक्रीय सहभाग असे. साम्राज्याचे जिल्ह्यात विभाजन केले होते. त्याला 'विषय' म्हटले जात असे. त्याची

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

देखरेख विषयाधिपती करत असत. खेडे हा राज्य कारभाराचा सर्वात लहान घटक होता. ग्रामप्रमुख खेड्यांची व्यवस्था आणि हिशोब ठेवत असे. चालुक्यांनी शैव, वैष्णव आणि जैन परंपराना उत्तेजन दिले. त्यांनी जैनबस्ती आणि बुद्धविहारांच्या बांधकामाना चालना दिली.

बदामीच्या चालुक्यांनी साहित्याला उत्तेजन दिले. त्यामुळे कन्नड आणि संस्कृत भाषेची वाढ झाली. कन्नड ही त्यांची राज्यभाषा होती. यांच्या कारकीर्दीत काव्यातील 'त्रिपदी' शैली अस्तित्वात आली. या काळात कन्नड साहित्यकृती निर्मिती नसली तरी कन्नड भाषेतील शिलालेख मात्र उपलब्ध आहेत. बदामीच्या कप्पे आर्यभटाची त्रिपदी शैली काव्यरूपात आढळून येते.

**शिलालेखावरील कप्पे आर्यभटाची कविता**



ಸಾಧುಂಗೆ ಸಾಧು
ಮಾಧುರ್ಯಂಗೆ ಮಾಧುರ್ಯಂ
ಬಾಧಿಪ್ಪ ಕಲಿಗೆ
ಕಲಿಯುಗ ವಿಪರೀತನ್
ಮಾಧವನೀತನ್ ಪೆರನಲ್ಲ ॥

ಒಳ್ಳೆಯವರಿಗೆ ಒಳ್ಳೆಯವನು. ಮಧುರಗುಣ ಉಳ್ಳವರಿಗೆ ಮಧುರವಾಗಿ ವರ್ತಿಸುವವನು. ತೊಂದರೆಪಡಿಸುವ ದುಷ್ಟರಿಗೆ ದುಷ್ಟನಂತೆ ಕಾಣಿಸುವವನು. ಈತನು ಅಸಾಮಾನ್ಯನಾದ ಮಾಧವನೇ ಆಗಿರುವನು.

तो चांगल्या लोकांशी चागला वागतो, तो गोड गुण असलेल्यांशी गोड वागतो, तो त्रास देणाऱ्या दुष्कर्म्यांना वाईट दिसतो. हा एक असाधारण माधव आहे.

रविकीर्ती, विज्ञीका व अकलंक हे या काळातील संस्कृत विद्वान होते. दुसऱ्या पुलकेशीच्या सुनेने कवयित्री विज्ञीकाने 'कौमुदी महोत्सव' लिहिले. शिवभट्टारकांने लिहिलेले 'हर पार्वतीय' ही या काळातील महत्वाची संस्कृत नाटके होती.

NOT TO BE REPUBLISHED
@KTBS



**पट्टदकल्लू मधील विरूपाक्ष मंदिर**

बदामीचे चालुक्य हे महान निर्माते त्याचबरोबर कलाप्रेमी होते. बदामी, ऐहोळे, पट्टदकल्लू येथे त्यांनी सुंदर देवालयांची निर्मिती केली. भारतीय स्थापत्यकलेत स्वतःची अशी 'चालुक्य शैली' विकसित केली. बदामीच्या खडकात गुहामंदिरे बांधली. त्यानी कलाकारांना आणि शिल्पकारांना उत्तेजन दिले.

ऐहोळे आणि पट्टदकल्लू येथील देवळे 'चालुक्य शैलीच्या' शिल्पकामांचा उत्तम नमुना होय. ऐहोळेला 'शिल्पकलेचा पाळणा' असे म्हटले जाते. अनेक मंदिरांची श्रेणीबद्ध रचना करण्याचा प्रथम प्रयोग येथे केला गेला याचठिकाणी आपल्याला लोकेश्वर (विरुपाक्ष), त्रिलोकेश्वर आणि मल्लीकार्जुन ही सुप्रसिद्ध देवळे पहायला मिळतात. चालुक्य कलेच्या विकासाचे पुरावे म्हणून बदामीच्या गुहातून विष्णू, वराह, हरिहर आणि अर्धनारी नटेश्वराचे अनेक उंच पुतळे (मूर्त्या) आढळून येतात. चित्रकलेलाही उत्तेजन प्राप्त झाले होते. या काळातील अजंठा लेण्यातील चित्रे जगप्रसिद्ध आहेत.

## कांचीचे पल्लव (सा.श. 350 ते 895)

पल्लव हे तामिळनाडूतील पहिले राजे होते. दक्षिण भारतामध्ये राज्य केलेल्या घराण्यामध्ये यांचे विशिष्ट स्थान आहे. त्यानी 4थ्या शतकापासून 9 व्या शतकापर्यंत राज्य केले. सुरुवातीला ते सातवाहनांचे अधिकारी होते. सातवाहनांच्या ऱ्हासानंतर पल्लवांनी स्वतःला प्रातांचे राजे म्हणून घोषित केले.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

शिवस्कंद वर्मा या घराण्यातील पहिला राजा होता. पल्लव आणि कदंबांच्या मध्ये सतत शत्रुत्व होते. दुसऱ्या पुलकेशीने पल्लव घराण्यातील महेंद्रवर्माला पराभूत केले. नंतर आलेला पहिला नरसिंहवर्मा हा पल्लव घराण्यातील प्रसिद्ध राजा होता. त्याने दुसऱ्या पुलकेशीचा पराभव करून वातापी ताब्यात घेतली. आणि चालुक्यांनी केलेल्या पराभवाचा बदला घेतला. या विजयामुळे त्याला 'महामल्ल' आणि 'वातापीकोंड' ही बिरुदावली प्राप्त झाली. याच्याच काळात ह्यू-एन-त्संगने कांचीला भेट दिली. नरसिंहवर्माने कांची जवळ समुद्राच्या काठावर महाबलीपूरम हे शहर वसविले. त्याने अनेक अखंड दगडातील देवळांची निर्मिती केली. अपराजित पल्लवांच्या कारकीर्दी दरम्यान चोळ घराण्यातील आदित्याने पल्लव कारकीर्दीचा शेवट केला.

**पल्लवांचे योगदान :**

पल्लवांनी तामीळनाडूमधील शिस्तबद्ध राज्यकारभाराची सुरुवात केली. कला, साहित्य, धर्म, शिल्पकला आणि शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान महत्वाचे आहे. वातापीमधील

चालुक्यांची आणि कांचीतील पल्लवांची कारकीर्द हा दक्षिणेतील पराक्रमांचा काळ होता. पल्लवांचे राज्य बलाढ्य आणि सुसंघटीत होते. मंत्री आणि प्रांताधिकारी होते. राज्याची विभागणी मंडल, नाडू आणि ग्रामामध्ये केली होती. ग्रामसभा ही खेड्यांच्या व्यवस्थेशी संबंधित होती. ग्रामभोजक हा खेड्याचा कारभार पहात असे.

पल्लवानी संस्कृत आणि तामिळ भाषेला प्रोत्साहन दिले. कांची हे संस्कृत साहित्याचे केंद्र होते. भारवी (किरातार्जुनिय) आणि दंडी (दशकुमार चरित) हे या काळातील कवी होते. राजा महेंद्रवर्मा याने स्वतः 'मत्तविलास प्रहसन' हे सामाजिक नाटक लिहिले आणि 'भागवद्ज्जुकम' हा ग्रंथ लिहिला. पल्लवांनी सर्व धर्मांना उत्तेजन दिले.

सुरुवातीचे पल्लव राजे बौद्धधर्मिय होते. नालंदा विश्वविद्यालयातील विद्वान धर्मपालाचा जन्म कांचीमध्ये झाला. राजा महेंद्रवर्मा हा जैन धर्म अनुयायी असल्यामुळे त्याच्या राज्यात अनेक जैनधर्मिय होते.

*शैव आणि वैष्णव धर्म सातव्या शतकामध्ये प्रसिद्ध होते. 63 महान संत नायन्नारनी शैव धर्माचा प्रचार केला. बारा अलवारांनी वैष्णव धर्माचा प्रसार केला.*

या काळात भक्तिमार्गाच्या चळवळीची सुरुवात झाली. त्याचबरोबर वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनास पाठिंबा देण्यात आला. तामिळ भाषेमध्ये श्लोक लिहिले गेले. ही तामिळ साहित्यातील मौल्यवान रत्ने मानली जातात.



**महाबलीपुरममधील पंचरथ**

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

पल्लव राजे साहित्य आणि शिल्पकलेचे चाहते होते. त्यांनी आपल्या राज्यात अनेक मंदिराची निर्मिती केली. जी शिल्पकलेतील कौशल्याची उत्तम उदाहरणे आहेत. पल्लवांच्या शिल्पकलेचे वर्गीकरण दोन प्रकारात केले जाऊ शकते. ते म्हणजे दगडात कोरलेली देवळे आणि रचनात्मक नमुन्याची देवळे होय.

महाबलीपूरमध्ये दगडात कोरलेली अनेक देवळे आढळून येतात. या देवळामध्ये अखंड दगडात कोरलेले आश्चर्यकारक पुतळे आढळतात. ते आपल्याला महाभारत, भागवताम धील कथा सांगतात. या ठिकाणी एकाच दगडात कोरलेला पंचरथ सुप्रसिद्ध आहे. यातील 'अर्जुनाची तपश्चर्या' हे कोरीव काम कलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून मानले आहे.

कांचीतील कैलासनाथ,एकंबरनाथ आणि वैकुंठ पेरुमल मंदिर आणि समुद्रकिनाऱ्यावरील महाबलीपुरम हे प्राचीन भारतीय शिल्पकलेचे अत्युत्तम नमुने आहेत.

देवळे ही धार्मिक आणि कलात्मक उपक्रमांची केंद्रे होती. ग्रामस्थ संध्याकाळी देवळाच्या पटांगणात एकत्र येऊन अनेक गोष्टीवर चर्चा करीत असत. फावल्या वेळेत एकत्र येऊन पुराण ऐकणे, भजन करणे वगैरे या गोष्टी इथे केल्या जात. अशा रीतीने देवळे ही सामाजिक आणि शैक्षणिक केंद्रे होती.

पल्लवांच्याकडे सुसज्ज आरमार होते. मलाया, इंडोनेशिया आणि इतर दक्षिण आशियायी देशांशी व्यापारी संबंध होते. त्यामुळे या देशामध्ये भारतीय भाषा, धर्म, परंपरा आणि संस्कृतीचा प्रभाव आपल्याला दिसून येतो.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. पुलकेशीने __________ या पल्लव राजाचा पराभव केला.
2. बदामीचे चालुक्य सैनिक हे __________ म्हणून ओळखले जात होते.
3. हर पार्वतीय हे संस्कृत नाटक __________ ने लिहिले.
4. वातापिकोंड ही उपाधी __________ या पल्लव राजाला दिली गेली.
5. अर्जुनाची तपस्या ही कलाकृती __________ येथे आहे.

**II. थोडक्यात उत्तरे लिहा :**

6. दुसऱ्या पुलकेशीने साम्राज्य विस्तार कसा केला ?
7. बदामीच्या चालुक्यांच्या राज्यकारभाराचे वर्णन करा.
8. बदामीचे चालुक्य हे साहित्यप्रेमी होते. उदाहरणसहित विविरण करा.
9. संस्कृत आणि तामिळ भाषेला पल्लवांनी कशाप्रकारे प्रोत्साहन दिले.
10. पल्लवानी कला आणि शिल्पकलेला दिलेल्या योगदानाचे विवरण करा?

**III. उपक्रम :**

1. बदामीच्या चालुक्यांची कन्नड भाषेतील कामगिरी यावर समूहामध्ये चर्चा करा.
2. त्रिपदी बद्दल तुमच्या कन्नड शिक्षकांकडून जाणून घ्या.
3. कांचीपुरम आणि महाबलीपुरम येथे सहलीचे आयोजन करा.

**IV. प्रकल्प :**

1. स्थानिक ऐतिहासिक स्थळांना भेट देऊन माहिती गोळा करून निबंध स्वरूपात लिहा.
2. बदामी, ऐहोळे आणि पट्टदकल्लू येथील प्रमुख देवालयांची चित्रे संग्रहीत करा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

***

## प्रकरण - 20

# मान्यखेटचे राष्ट्रकूट आणि कल्याणचे चालुक्य

U8V5Q1

**या प्रकरणाच्या अभ्यासाने आपण खालील गोष्टी जाणून घेऊया.**

- *राष्ट्रकूट वंशाचा संस्थापक, दंतीदुर्ग आणि प्रसिद्ध राज्यकर्ता अमोघवर्ष विषयी माहिती मिळवूया.*
- *राष्ट्रकूटांचे प्रशासन, साहित्य आणि वास्तुशास्त्रातील योगदानाबद्दल माहिती मिळवूया*
- *कल्याणच्या चालुक्यांचा विकास आणि प्रशासन व साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल माहिती मिळवूया.*
- *भारताच्या नकाशात राष्ट्रकूटांचे प्रदेश दर्शविणे.*

## राष्ट्रकूट (सा.श. 753 ते सा.श.973)

राष्ट्रकूट हे कन्नडिग होते. प्रारंभी ते चालुक्यांचे मांडलिक होते. नंतर ते स्वतंत्र होऊन दक्षिणेतील विशाल साम्राज्याचे प्रसिद्ध राज्यकर्ते बनले कन्नडच्या इतिहासात राष्ट्रकूटांचा कालखंड महत्वाचा आहे. कर्नाटक साम्राज्याचे वैभव वाढविण्याचे श्रेय याना जाते. यांचे उत्तरेला नर्मदा नदीपासून दक्षिणेला कावेरी नदीपर्यंत साम्राज्य पसरलेले होते. एलोरा येथील कैलासनाथ मंदिर, कन्नड मधील पहिला ग्रंथ 'कविराजमार्ग' यामुळे त्याना अजरामर केले आहे.

दंतिदुर्गापासून सुरु झालेले राज्य पुढे कृष्णा, दुसरा गोविंद, ध्रुव, तिसरा गोविंद, अमोघवर्ष आणि इतरांच्या काळात उत्कर्षाला पोहचले. अमोघवर्षाला मात्र त्याच्या कारकीर्दीच्या सुरुवातीला अनेक अडचणीना तोंड द्यावे लागले. पण त्याना संघर्षात रस नव्हता कारण तो शांतताप्रिय होता. त्यामुळे त्याने गंग आणि पल्लव घराण्याशी वैवाहिक नाती जोडून शत्रुत्व टाळले. तो शांतताप्रिय असल्याने उत्तरेकडील काही भागावरील वर्चस्व त्याला सोडावे लागले. पश्चिम किनापट्टीवरील बंदरे व्यापारात व्यस्त असल्यामुळे ती वैभवसंपन्न होती. त्यांचा पर्शियाशी आणि अरेबियाशी व्यापारी संबंध होता. या काळात अनेक प्रवाशांनी आणि व्यापाऱ्यांनी साम्राज्याला भेट दिली. अरेबियन प्रवासी सुलेमान हा त्यातील मुख्य होता. त्याने अमोघवर्षाचे वर्णन 'जगातील चार उत्तम सम्राटापैकी एक' असे केले आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अमोघवर्ष हा शूर आणि शांतताप्रिय होता. त्याने सर्व धर्मांना उत्तेजन दिले. त्याच्यानंतर दुसरा कृष्ण, तिसरा इंद्र आणि तिसरा कृष्ण याने राज्य केले. राष्ट्रकूटांचे राज्य दुसऱ्या कर्काच्या काळात कल्याणाच्या चालुक्य घराण्यातील दुसऱ्या तैलपने संपुष्टात आणले.




राष्ट्रकूट साम्राज्य

### राष्ट्रकूटांचे योगदान

राष्ट्रकूट घराण्यात राजपद वारसा हक्काने मिळत असे राजाला मदत करण्यासाठी मंत्रीमंडळ अस्तित्वात होते. मंत्रीमंडळात महत्वाच्या व्यक्तिंची नेमणूक केली जात असे. त्याला म हासंधी विग्रह (परराष्ट्रमंत्री) म्हटले जात असे. तो विदेशी व्यवहार पहात असे. राज्यकारभाराच्या सुविधेसाठी साम्राज्याचे राष्ट्र, मंडळ, विषय, नाडू आणि ग्राम असे भाग पाडले जात असत.



नाडोज पंप

खेड्याच्या प्रमुखाला ग्रामपती किंवा प्रभुगौड म्हटले जात असे. तो खेड्यातील सेनेचा प्रमुख असे. त्याला ग्रामसेवकांची मदत असे. येथे ग्रामसभा देखील असत. नाडूमधे नाडगौडा नावाचे अधिकारी असत. त्याचप्रमाणे विषयावर विषयपती, राष्ट्रासाठी राष्ट्रपती हे अधिकारी नेमले जात.

जमीनमहसूल, जकात, घर, दुकाने आणि त्याच बरोबर नावाड्यांचा कर हे राज्याच्या उत्पन्नाचे साधन होते. परदेशी व्यापारातून कर मिळत असे.

राष्ट्रकूटांनी कन्नड आणि संस्कृत भाषेला उत्तेजन दिले. संस्कृतमध्ये उत्तम साहित्य निर्माण

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

झाले. त्रिविक्रमाने 'नळचंपू' लिहिले. जे संस्कृत साहित्यातील चंपूकृती होय. हलायुधाने 'कवीरहस्य' लिहिले. जीनसेन गणितीतज्ञ, महावीराचार्य व्याकरण शास्त्रज्ञ, शकटायन, गुणभद्र व वीरसेन हे अमोघवर्षाच्या दरबारात कवी होते. प्रथम कवी पंप यानी आदिपुराण व विक्रमार्जुन विजय या दोन महान कन्नड साहित्यकृतींची रचना केली. उभयकवी चक्रवर्ती पोन्न यांनी शांतीपुराण रचले. अमोघवर्षाच्या दरबारात असलेल्या श्री विजयाची कविराजमार्ग ही कन्नड साहित्यातील महत्वपूर्ण कृती होती. या सगळ्यामधून कन्नड साहित्याची प्राचीन काळापासून वाढ झाली होती हे दिसून येते.

*हंपी कन्नड विश्वविद्यालयाकडून कवी पंपाच्या स्मरणार्थ कर्नाटकमध्ये साहित्य क्षेत्रात विशेष कार्य केलेल्या व्यक्तिला दरवर्षी 'नाडोज' हा बहुमान देण्यात येत आहे.*

*राष्ट्रकूटांच्या काळातील आणखी एक महत्वाची कृती म्हणजे शिवकोट्टाचार्य यांनी लिहिलेली वड्डाराधने यामध्ये जैन धर्माच्या धार्मिक कथा आहेत. यामध्ये स्थानिक कन्नड शब्दांना महत्व दिले गेले. कथाभाग, रचना, पात्रे आणि संवादामध्ये जिवंतपणा आढळतो. पंपयुगापूर्वीची ही महत्वाची गद्यकृती असून त्याला कन्नड साहित्यामध्ये सदैव महत्वपूर्ण स्थान आहे.*

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

त्या काळातील अग्रहार आणि मठ ही शिक्षण केंद्रे होती. संस्कृत, वेद, खगोलशास्त्र, तर्कशास्त्र आणि पुराणाबद्दल ज्ञान दिले जात होते. विजयपुर जिल्ह्यातील इंडी तालुक्यातील सालोटगी हे प्रमुख शैक्षणिक केंद्र होते.



**एलोरा येथील कैलासनाथ मंदिर**

राष्ट्रकूट राजे शिव आणि विष्णूचे भक्त असल्यामुळे त्यानी अनेक शिव आणि विष्णुची मंदिरे बांधविली. जैन धर्माला राजाश्रय दिला त्यामुळे जैनधर्माचा अधिक प्रसार झाला. तरी इतर धर्मानासुद्धा उत्तेजन दिले गेले.

राष्ट्रकूट राजे कलेचे आश्रयदाते होते. त्यांचे कलेच्या क्षेत्रातील प्रचंड योगदान वेरूळ येथे अखंड दगडात कोरलेले देऊळ आणि एलीफंटा लेण्यात आपण पाहू शकतो. वेरूळ येथील कैलाशनाथमंदिर पहिल्या कृष्णाने बांधले. हे एका अखंड दगडात कोरलेले 'आश्चर्य' आहे. हे मंदिर 100 फूट उंच, 276 फूट लांब आणि 154 फूट रूंद खडकात कोरलेले आहे. याच्या जवळच प्रसिद्ध दशावतार गुहा मंदिर आहे. मुंबईजवळ समुद्रात असलेली एलिफंटा गुहा आणि तेथील शिल्पे (त्रिमूर्ती) अतिशय उत्तमपणे कोरलेले आहे. रायचूर जिल्ह्यातील शिरवाळमधे राष्ट्रकूट कालीन मंदिरे आहेत. पट्टदकल्लूमध्ये देखील सुंदर जैन देवालय आहेत.

## कल्याणचे चालुक्य (सा.श. 973 ते सा.श.1189)

कल्याणच्या चालुक्यांच्या काळाला भारतीय इतिहासात मानाचे स्थान आहे. कल्याणाच्या चालुक्यांनी कला, साहित्य आणि शिक्षणाला उत्तेजन दिले. त्यांनी कन्नड आणि संस्कृत भाषेच्या विकासाला संपूर्ण सहयोग दिला. प्रसिद्ध कन्नड कवी दुर्गसिंह, रण्ण, नागचंद्र आणि इतर कवीना त्याने राजाश्रय दिला. वचनसाहित्य हे त्या काळातील महत्वपूर्ण साहित्य होय. कल्याण शहराची निर्मिती करून त्याचे राजधानीत रूपांतर करण्याचे श्रेय पहिल्या सोमेश्वराला जाते.

राष्ट्रकूटाचे मांडलिक असलेल्या दुसऱ्या तैलापाने राष्ट्रकूट राजा दुसऱ्या कर्काचा पराभव करून मान्यखेट ताब्यात घेतले. आणि कल्याणचे चालुक्य म्हणून राज्य स्थापन केले. सुमारे 24 वर्ष त्याने राज्यकारभार केला. या वंशातील प्रमुख राजा पहिला सोमेश्वराने 'कल्याण' शहरांची निर्मिती करून आपली राजधानी बनविली. हेच शहर म्हणजे आजचे बीदर जिल्ह्यातील बसव कल्याण होय. जरी त्याला अनेक लढाया लढाव्या लागल्या तरी त्याने 'कोप्पम' येथे चोळ सम्राटाचा पराभव केला.

*या काळातील विज्ञानेश्वराने आपली कृती 'मिताक्षर' मध्ये कल्याण शहराची नोंद 'न भूतो न भविष्यती' अशी केली आहे. विक्रमादित्य सारखा राजा कधी झाला नाही आणि होणारही नाही असा उल्लेख केला आहे.*

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

(सा.श. 1076 मध्ये) पहिल्या सोमेश्वराचा मुलगा सहावा विक्रमादित्य हा या वंशातील सर्वात थोर राजा होता हा अत्यंत धाडसी योद्धा आणि उत्तम राज्यकर्ता होता. त्याने सा.श. 1076 मध्ये 'चालुक्य विक्रमशक' सुरु केले. त्याने होयसळ राजा विष्णूवर्धनाने केलेले बंड मोडून काढले त्याने श्रीलंकेचा राजा 'विजयबाहू' यांच्याशी संबंध प्रस्थापित केले.

*बसवेश्वरांनी तीन प्रकारची शिकवण दिली. मृदु उपदेश, कठोर टीका, कडक सूचना. शिवाला संपूर्ण श्रद्धेने शरण गेल्यास मोक्ष प्राप्त होतो. अशी त्यांची शिकवण होती.* ***'काम हीच पूजा'*** *हा त्यांचा उपदेश होता. त्यांनी सा.श.1162 मध्ये 'अनुभव मंटप'ची स्थापना केली. त्यांनी आपली वचने साध्या कन्नड भाषेत काव्यात्मक शैलीमध्ये रचली. त्यामुळे ती सामान्य माणसाला समजत.*



**विश्वगुरु बसवेश्वर सांस्कृतिक नेता**

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

सहावा विक्रमादित्य आणि तिसऱ्या सोमेश्वरानंतर आलेल्या राजांच्या कारकिर्दीत या साम्राज्याला उतरती कळा लागली. चौथ्या सोमेश्वराच्या काळात राज्ये दुबळी झाली. तेव्हा कलचुरीच्या बिज्जळाने कल्याण ताब्यात घेऊन तेथून राज्य करायला सुरुवात केली. याचकाळात महान समाजसुधारक जगज्योती बसवेश्वर प्रकाशात आले. या क्रांतीमुळे बसवादी शिवशरणांची मूल्ये सर्वसामान्यापर्यंत पोहोचली.

सामाजिक सांस्कृतिक समावेशासाठी विश्वगुरू बसवेश्वर यांच्या अद्वितीय योगदानाची दखल घेऊन. कर्नाटक सरकारने त्यांना 13.02.2024 रोजी विधान सभेत विश्वगुरु बसवेश्वर यांच्या चित्राचे अनावरण करूण कर्नाटकाचे सांस्कृतिक नेते म्हणून घोषित केले.

### कल्याणच्या चालुक्यांचे योगदान :

बदामीच्या चालुक्यांप्रमाणे कल्याणच्या चालुक्यांनी अनेक क्षेत्रात भरीव कामगिरी केली. राजपद हे वारसा हक्काने मिळत असे. राज्याची विभागणी प्रांत (मंडळ) आणि छोटे प्रांत (नाडूमध्ये) केली होती. खेड्यांचा राज्यकारभार करण्यासाठी कंपन असत. (आजचे होबळी).



**नाणी**

जमीन महसूल हे राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. व्यापारकर जकात आणि व्यावसायिक कर ही उत्पन्नाची इतर साधने होती. जमीनमहसूल गोळा करण्यासाठी 'कडीतवर्गडे' नावांचा अधिकारी नेमलेला असे. व्यापार आणि उद्योगामध्ये वेगवेगळ्या श्रेणी होत्या. कल्याणच्या चालुक्यांनी साहित्याला उत्तेजन दिले. या काळात जैन विद्वानाच्या सहाय्याने कन्नड साहित्यांची भरभराट झाली. रण्णांनी लिहिलेले गदायुद्ध (साहसभीम विजय) दुर्गसिंहाचे पंचतंत्र, बिल्लणाचे विक्रमांक देवचरित, नयनसेनाचे धर्मामृत, विघ्नेश्वराचे मिताक्षरी, तिसऱ्या सोमेश्वराचे मनसोल्हास ज्याला संस्कृत विश्वकोष मानले जाते. चालुक्य काळातील अजोड रचना म्हणजे वचन-साहित्य. बसवेश्वर अक्कमहादेवी आल्लमप्रभू माच्चया हे प्रमुख वचन साहित्यकार होते.

*गद्यान, पन, द्रव्य, पोन आणि सुवर्ण ही त्याकाळची नाणी होती. लकुंडी आणि सुंडी येथे नाण्यांची टांकसाळ अस्तित्वात होती.*

चालुक्य फक्त साहित्य प्रेमी नव्हे तर कलेचे आश्रयदाते होते. त्यांचे कलेच्या क्षेत्रातील योगदान फार मोठे आहे. लक्कुंडी येथील काशिविश्वेश्वर देवालय, इटगीमधील महादेवमंदिर, कुरुवतीमधील मल्लीकार्जुन देऊळ आणि गदगमधील त्रिकुटेश्वर मंदिर ही त्यांच्या काळातील उत्तम उदाहरणे आहेत. या घराण्यातील राजानी कन्नड भूमीला कलेचे माहेरघर बनविले.

यांच्या काळात संगीत आणि नृत्य या कला वैभवसंपन्न झाल्या. संगीतकार, नर्तक यांची दरबारात वर्णी लागत असे. राणी चंद्रलेखाने अनेक संगीततज्ञ आणि नर्तकांना राजाश्रय दिला होता. नृत्य, संगीत, कला आणि आभूषण अशा वेगवेगळ्या विषयांसंबंधी 'मनसोल्हास' आणि दुसरा जगदेकमलाच्या 'संगीत चुडामणी' या ग्रंथात चर्चा केलेली आढळून येते.



**लक्कुंडी येथील काशीविश्वेश्वर देवालय**

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. राष्ट्रकूट घराण्याचा संस्थापक ________ होय.
2. राष्ट्रकूटांचा पराभव केलेल्या कल्याणच्या चालुक्य घराण्यातील राजा ________
3. कवीरहस्याचा लेखक ________
4. पोन्नानी रचलेली प्रसिद्ध कविता ________
5. कल्याणच्या चालुक्य घराण्यातील प्रसिद्ध राजा ________
6. या काळात सामाजिक सुधारणा करणारी व्यक्ती ________

**II. थोडक्यात उत्तरे लिहा :**

7. राष्ट्रकूटांचा राज्यकारभार कसा होता?
8. राष्ट्रकूटांच्या शिक्षणपद्धतीचे वर्णन करा?
9. एलोरा येथील कैलास मंदिरा बद्दल माहिती लिहा.
10. कल्याणच्या चालुक्यांनी साहित्याला कसे उत्तेजन दिले?

**III. उपक्रम :**

1. राष्ट्रकूटकालीन मंदिराना भेट दिलेल्या शिक्षक किंवा विद्यार्थ्यांशी चर्चा करून तुमच्या कल्पना सांगा.
2. मान्यखेट किंवा वेरूळला सहल काढा.

**IV. प्रकल्प :**

1. चौघांचा गट करून वेरूळ देवालयाबद्दल चर्चा करून निबंध लिहा.
2. मान्यखेटांची चित्रे गोळा करा.
3. बसवण्णांच्या जीवनावर आधारित निबंध लिहा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण - 21

# चोळ आणि द्वारसमुद्राचे होयसळ

Q5D2E1

**या प्रकरणाच्या अभ्यासाने आपण खालील गोष्टी जाणून घेऊया.**

- *चोळ साम्राज्याचा विस्तार आणि वेगवेगळ्या क्षेत्रातील त्यांची कामगिरी समजुन घेणे.*
- *होयसळ घराण्याची स्थापना आणि त्यांचे धार्मिक, साहित्य, कला व शिल्पकला या क्षेत्रातील योगदान.*

## चोळ (सा.श. 850 ते सा.श.1279)

पल्लवानंतर चोळवंशाने 9व्या ते 13व्या शतकापर्यंत तामिळनाडू, आंध्र आणि कर्नाटकाच्या बऱ्याच भागावर आपले वर्चस्व स्थापन केले. विदेशात भारतीय संस्कृतीचा विस्तार करण्याचे श्रेय चोळांना जाते. त्यांनी भव्य देवळांची निर्मिती केली. बृहदेश्वर मंदिर हे त्यातीलच एक होय. तामिळ साहित्याला उत्तेजन दिल्याने ते नावारूपाला आले.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



बृहदेश्वर मंदिर, तंजावर

चोळ बराच काळ पल्लवांच्या वर्चस्वाखाली होते व नंतर ते स्वतंत्र झाले. संगम साहित्यानुसार करीकल चोळ हा या घराण्याचा संस्थापक होय. विजयालय चोळ याने राज्यांची पुनर्रचना करून तंजावर ही आपली राजधानी केली.

पहिला राजराजा हा या घराण्यातील महत्वाचा राजा होता. तो शूर योद्धा आणि कुशल राज्यकर्ता होता. त्याने चोळ साम्राज्याचा विस्तार करून ते बलाढ्य बनविले. त्याने चेर, गंग, पांड्य यांच्यावर वर्चस्व मिळविले. बलाढ्य आरमारांची बांधणी करून श्रीलंका जिंकली. आजदेखील मलेशिया आणि सिंगापूर येथे तामिळ लोकांचे प्राबल्य दिसून येते. तेथील राजकारण, अर्थकारण आणि सांस्कृतिक उपक्रमामध्ये तामिळीचा प्रभाव दिसून येतो. या काळात समुद्रमार्गे चालणारा व्यापार आजदेखील सुरु आहे. पहिल्या राजराजा चोळांने बांधलेले तंजावर येथील बृहदेश्वर मंदीर खूप प्रसिद्ध आहे. तिसऱ्या राजेंद्र चोळाच्या कारकिर्दी दरम्यान चोळसाम्राज्य दुबळे झाल्याने त्यांच्यावर पांड्यांचे वर्चस्व वाढले.

**चोळांचे योगदान :**

चोळांनी समर्थ आणि योग्य राज्यकारभार केला. मंडल, कोटवंगी, नाडू, कुर्रम किंवा ग्रामसमुदाय आणि तरकुर्रम असे साम्राज्याचे वेगवेगळे भाग पाडले होते. प्रत्येक गावात उर नावाची लोकांची समिती असे.

खेड्यांचा स्वतंत्र कारभार हे चोळ राज्यव्यवस्थेचे वैशिष्ट्य होते. ग्रामसभा या प्रथम सभा असत. तर कुर्रम म्हणजे खेडे. प्रत्येक कुर्रमला ग्रामसभा असे. त्याला महासभा म्हटले जात असे. याला पेरंगुरी असेही म्हटले जात असे. त्यातील सभासदांना पेरुमक्कल असे म्हटले जात असे. सभासदांची निवड निवडणूक प्रक्रियेतून होत असे. संस्कृत विद्वान आणि श्रीमंतानाच निवडणुकांना उभे रहाण्याचा अधिकार असे.

जमीनीचे उत्पन्न हेच राज्याचे मुख्य उत्पन्न होते. महसूल वसूल केला जात असे. पाणी पुरवठा पद्धतीवर विशेष लक्ष दिले जात असे. चोळांनी अनेक तलावांची बांधकामे केली. बेंगलोर जवळील बल्लंदूर तलाव हा त्यापैकी एक होय. त्यानी गंगैकोंडा चोळापूर येथे विशाल तळे बांधले.

चोळ शैवधर्मीय होते. त्यानी अनेक शिवमंदिरे निर्माण केली. तंजावर मधील बृहदेश्वर मंदिर 500 फूट उंच आहे. समोर 250 फूट रुंदीचे पटांगण आहे. या मंदिराचा कळस 200 फूट उंच आहे. पहिल्या राजेंद्रने चोळेश्वर मंदिर बांधविले.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

गंगाईकोंड चोळपूरम, चन्नपटनाजवळील अप्रमेय मंदिर, बेंगळूरजवळील बेगुरमधील चोळेश्वर मंदिर बिण्णमंगलाजवळील मुक्तेश्वर मंदिर ही कर्नाटकातील देवळे चोळांनी बांधली. मंदिराचा उपयोग आर्थिक आणि सांस्कृतिक केंद्रे म्हणून केला जात असे. या काळातील शिव, गणपती, विष्णू, दुर्गा आणि कार्तिकेयच्या मूर्त्या विशेष प्रसिद्ध आहेत.

चोळांनी शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी अनेक अग्रहारांची निर्मिती केली. उत्तर मेरूर अग्रहार हा त्यापैकी प्रसिद्ध आहे. मंदिरे ही शैक्षणिक केंद्रे होती. त्याचबरोबर धार्मिक उपक्रमांची केंद्रे देखील होती. या काळात तामिळ साहित्याचा सर्वांगीण विकास झाला. या काळात कंबाने लिहिलेले रामायण, सिक्कीलरने रचलेले पेरीयपुराण आणि तिरुक्कदेवाचे जिवीका चिंतामणी या महत्वपूर्ण साहित्यकृती होय.

## द्वारसमुद्राचे होयसळ (सा.श. 984 ते सा.श.1346)

कर्नाटकामध्ये चालुक्य दुबळे झाल्यानंतर होयसळ बलाढ्य बनले. चिक्कमंगळूर जिल्ह्यातील मुडगेरी तालुक्यातील सोसेउर (आजची अंगडी) गावात या वंशाचा संस्थापक सल याला जैनमुनी सुदत्त याने वाघाबरोबर लढून त्यालाठार मारण्याची आज्ञा केली. पोयसल (सल वाघाला मार) त्यामुळे होयसळ असे नाव मिळाले. होयसळ राजांनी साहित्य, शिक्षण, कला, शिल्पकला आणि पाणीपुरवठा या क्षेत्रात भरीव कामगिरी केली.



होयसळाची सिंहमुद्रा



रामानुजाचार्य

नृपकाम, येरेयंगा आणि बल्लाळानंतर आलेला विष्णुवर्धन हा महत्वाचा होयसळ राजा होता. त्याने चोळाकडून गंगावती जिंकून घेऊन तलकाडू गोंड ही पदवी मिळविली. आपल्या विजयाच्या स्मरणार्थ त्याने तलकाडूमधील कीर्तीनारायण मंदिर आणि बेलूर येथे चन्नकेशव (विजयनारायण) ही मंदिरे बांधली. त्याने आपल्या राज्याचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला. पण त्याला चालुक्य राजा सहाव्या विक्रमादित्याकडून पराभूत व्हावे लागले.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

रामानुजाचार्य विशिष्टाद्वैत तत्त्वज्ञानाचा प्रसार चोळ साम्राज्यात करू शकले नाहीत. म्हणून ते बिट्टीदेव (विष्णुवर्धन) च्या दरबारात आले आणि त्याच्या आश्रयाने या तत्त्वज्ञानाचा प्रसार संपूर्ण कर्नाटकात केला. तिसऱ्या बल्लाळच्या कारकिर्दीत या साम्राज्याचा ऱ्हास झाला. याच काळात विजयनगर साम्राज्य उदयाला आले.

**होयसळांचे योगदान :**

होयसळांनी राज्यकारभारात प्रांत पद्धती अस्तित्वात आणली. राज्यकारभाराचे अधिकार राजकुमार, राणी आणि राजघराण्यांना होते. नाडू आणि विषयांचा कारभार पहाण्यासाठी अधिकारी नेमले होते. खेड्यामधे गौडा, शानभाग, तळवार यासारखे सरकारी प्रतिनिधी नेमलेले असत.

शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी होयसळांनी शांतीसागर, बल्लाळरायसमुद्र, विष्णुसमुद्र या सारख्या अनेक तलावांची निर्मिती केली. शहरामध्ये कारागीर आणि विजेते, व्यापारी अशा श्रेणी होत्या. जमीन महसूल हे राज्याचे मुख्य उत्पन्न होते. समाजाचे वैशिष्ट्ये म्हणजे राजाकडे गरूड नावाचे खास अंगरक्षक होते. राजाच्या मृत्यूनंतर ते स्वतः प्राणत्याग करत असत.

होयसळांच्या काळात जैन, बौद्ध, शैव, वैष्णव, वीरशैव, श्रीवैष्णव, इत्यादी धर्म अस्तित्वात होते.

सर्व धर्म समानतेची भावना बेलूर देवालयातील खालील पद्यात समजावली आहे.



ಯಂ ಶೈವಾಸ್ಸಮುಪಾಸತೇ ಶಿವ ಇತಿ ಬ್ರಹ್ಮೇತಿ ವೇದಾಂತಿನೋ
ಬೌದ್ಧಾ ಬುದ್ಧ ಇತಿ ಪ್ರಮಾಣಪಟವಃ ಕರ್ತೇತಿ ನೈಯಾಯಿಕಾಃ
ಅರ್ಹಶ್ಚೇತಿ ಹ ಜೈನಶಾಸನಮತಿಃ ಕರ್ಮೇತಿ ಮೀಮಾಂಸಕಾಃ
ಸೋಽಯಂ ವೋ ವಿದಧಾತು ವಾಂಛಿತಫಲಂ ಶ್ರೀ ಕೇಶವೇಶಸ್ಸದಾ ॥

ಶೈವರು ಶಿವನೆಂದು, ವೇದಾಂತಿಗಳು ಬ್ರಹ್ಮವೆಂದು, ಬೌದ್ಧರು ಬುದ್ಧನೆಂದು, ಪ್ರಮಾಣದಲ್ಲಿ ಸಮರ್ಥರಾದ ನೈಯಾಯಿಕರು ಕರ್ತೃವೆಂದು, ಜೈನರು ಅರ್ಹನೆಂದು, ಮೀಮಾಂಸಕರು ಕರ್ಮವೆಂದು ಯಾವನನ್ನು ಉಪಾಸನೆ ಮಾಡುವರೋ ಅವನೇ ಆದ—ಈ ಶ್ರೀ ಕೇಶವನೆಂಬ ಈಶನು ನಿಮಗೆ ಇಷ್ಟಾರ್ಥವನ್ನು ಪಾಲಿಸಲಿ.

शैव लोक ज्यांना शिव म्हणून, वेदांतांना ब्रह्मा म्हणून, बौद्धांना बुद्ध म्हणून, नैय्यांना निर्माता म्हणून. जैनांना अर्हत म्हणून आणि मीमांसकांना कर्म म्हणून पुजतात. भगवान केशव तुमच्या इच्छा पूर्ण करोत.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

अग्रहार, मठ आणि देवळे ही शैक्षणिक केंद्रे होती. मेलूकोटे, सालगाम, अर्सीकेरे इत्यादी ठिकाणी शैक्षणिक संस्था होत्या. याठिकाणी वेद, वेदशास्त्र, कन्नड आणि संस्कृतचा अभ्यास केला जात असे.

या काळात कन्नड साहित्याची भरभराट झाली. रुद्रभट्टाने 'जगन्नाथ विजय' लिहिले. सुप्रसिद्ध कवी जन्नाने यशोधराचरित्र लिहिले. हरिहराने 'चंपूकविता', 'गिरीजा कल्याण' लिहिली. राघवांकाने हरिचंद्रकाव्य, केशिराजाने 'शब्दमणी दर्पण' लिहिले. संस्कृतमध्ये देखील अविस्मरणीय साहित्यकृती निर्माण झाल्या. रामानुजाचार्यांनी लिहिलेले 'श्रीभाष्य' आणि पराशर भट्टाने लिहिलेला श्री गुण रत्नकोष ही त्यापैकी काही उदाहरणे आहेत.

होयसळांची शिल्पकला जगप्रसिद्ध आहे, होयसळांनी मृदू दगडात (Soap stone) असंख्य मंदिराची निर्मिती केली. त्यांच्या देवळात दिसून येणारी पाच वैशिष्ट्ये म्हणजे नक्षत्राकृती गर्भगृह, उपपीठे, सुशोभित भिंती, कळस आणि खांब इत्यादी.



**बेलूर येथील चन्नकेशव मंदिर**

बेलूर येथील चन्नकेशव मंदिरातील खांबावर अनेक सुंदर नर्तिकांचे, पुतळे उभे केले आहेत. केटमल्ल हा सैन्याधिकारी होता. त्याने हळेबीडू येथील होयसळेश्वर मंदिर बांधले. सोम दंड नायकाने सोमनाथपूर येथे बांधलेले केशवमंदिर फार प्रसिद्ध आहे. अर्सिकेरी, गोविंदनहळ्ळी, दोड्डगड्डावळी आणि भद्रावती येथे अनेक मंदिरे आणि बस्ती बांधविल्या. नाजूक कोरीव काम ासाठी या कलाकृती प्रसिद्ध आहेत. दासोजा, चव्हाण, जकनाचार्य आणि डंकन हे त्या काळातील प्रमुख शिल्पकार होते.



**शिलाबालिका**

NOT TO BE PUBLISHED

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा:**

1. चोळांची राजधानी ________ ही होती.
2. चोळांच्या काळातील प्रत्येक खेड्यातील ग्रामसभेला ________ असे म्हटले जात असे.
3. चोळांच्या काळातील अग्रहार असलेले प्रसिद्ध शैक्षणिक केंद्र ________
4. बेंगळूरजवळील बेगूर येथे चोळांनी ________ हे मंदिर बांधविले.
5. होयसळ राजाच्या अंगरक्षक दलाला ________ म्हटले जायचे.
6. राघवांकाने ________ ही कविता लिहिली

**II. थोडक्यात उत्तरे लिहा:**

7. चोळ साम्राज्याचा संस्थापक कोण?
8. चोळांच्या काळात ग्राम स्वराज्य व्यवस्था कशी होती ?
9. होयसळांनी साहित्याला कसे प्रोत्साहन दिले त्याचे वर्णन करा.

**III. उपक्रम:**

1. होयसळांच्या काळातील देवालयांची चित्रे गोळा करून संग्रह बनवा.
2. बेलूर येथील शिलाबालिकेच्या शिल्पाबद्दल तुमच्या शिक्षकांकडून अधिक माहिती घ्या.

**IV. प्रकल्प:**

1. बेलूर आणि हळेयबीडूला भेट देऊन त्यावर प्रबंध तयार करा.
2. होयसळांच्या कलेविषयी सविस्तर माहिती मिळवा.

***

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

G6C4K8

## राज्यशास्त्र

## प्रकरण - 22

# लोकशाही

**या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हाला पुढील मुद्दे शिकायला मिळतील.**

- *लोकशाहीचा अर्थ जाणून घेणे.*
- *लोकशाहीचे प्रकार ओळखा आणि त्याच्यांत फरक करा.*
- *लोकशाहीची वैशिष्ट्ये, यशाचे घटक, आणि लोकशाहीचे फायदे व तोटे ओळखणे*
- *भारतात लागू असलेल्या सार्वत्रिक प्रौढ मतदान प्रणाली निवडणूक प्रणालीबद्दल जाणून घेणे.*
- *लोकशाही व्यवस्थेतील राजकीय पक्षाचे कर्तव्य जाणून घेणे.*
- *लोकशाहीत प्रसार माध्यमे (Mass Media) जबाबदारीचे विश्लेषण व माहिती देते.*
- *2005 च्या माहिती हक्क कायदा समजून घेणे.*

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

लोकशाही हे शासनाच्या सर्वात जुन्या पद्धतीपैकी एक आहे. प्राचीन भारतातही लोकशाही शासन असल्याचे पाहायला मिळते. उदाहरणार्थ वेदकालीन काळात सभा आणि समिती होत्या. लोकशाही स्वरूपाचे सरकार स्थापन करण्यासाठी जगातील अनेक देशात दंगे क्रांती घडल्या आहेत. लोकशाही(Democracy) हा शब्द डेमोक्रेटिया (Democratia) या ग्रीक शब्दापासून आला आहे. 'लोकशाही' (Democracy) हा शब्द ग्रीक शब्द (Demos & cratia) डेमोक्रेटियां (Demokratia) पासून आला आहे. ज्याचा अर्थ' लोकांचे प्रशासन आहे. लोकशाही व्यवस्थेत निवडणूका महत्वाची भूमिका बजावतात निवडणुकांमुळे लोकांना स्वताचे सरकार बनवण्याची संधी मिळते. निवडणुकामध्ये एक व्यक्ती एक मत ''या तत्वावर निवडणुका चालतात. सरकार हे लोकांचे बनलेले आहे आणि जनता निर्णय घेणारे प्रमुख आहेत. लोकशाहीची व्याख्या अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी'' लोकांनी लोकांचे आणि लोकांसाठी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही अशी केली आहे. लोकशाहीत सार्वभौम व्यक्तीला नागरिक होण्याचा अधिकार आहे.



अब्राहम लिंकन

**लोकशाहीच्या व्याख्या :**

**1. लॉर्ड ब्रेझ :** लोकशाही हे असे सरकारचे स्वरूप आहे ज्यामध्ये राज्याची प्रशासकीय सत्ता कायदेशीर रित्या कोणत्याही एका वर्गाच्या किंवा वर्गांच्या हातात नाही तर संपूर्ण समाजाच्या सदस्याकडे आहे.

**2. हर्मन फायनर :** लोकशाही हे केवळ तत्वज्ञान आणि सरकारचे स्वरूप नाही तर जीवन पद्धती देखील आहे.

**लोकशाहीचे प्रकार** लोकशाहीचे 2 प्रकार आहेत.

1) प्रत्यक्ष लोकशाही 2) अप्रत्यक्ष लोकशाही

**प्रत्यक्ष लोकशाही (Direct Democracy) :** या प्रकारच्या सरकारामध्ये लोक निवडणूकीद्वारे स्वतःचे सरकार बनवितात आणि त्यांच्या प्रगती साठी आणि विकासासाठी निती, नियम आणि कायदे तयार करण्यासाठी सहभागी होतात. थेट आदर्श लोकशाही सरकार सामान्यता लोकसंख्येने आणि आकाराने लहान असलेल्या देशात अशी पद्धत असते. प्राचीन ग्रीस आणि सध्याच्या स्विझरलँड या देशात अशी प्रचलित पद्धत अस्तित्वात आहे. लोकशाही आणि नेतृत्वाच्या आधारावरच थेट लोकशाही प्रभावी होऊ शकते. भारतातील या प्रकारच्या सरकारची रचना म्हणजे त्यांचा भौगोलिक व्याप्ती आणि लोसंख्येच्या आकारामुळे हे निर्धारीत करणे अशक्य आहे.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**अप्रत्यक्ष लोकशाही (Indirect Democracy) :** या प्रकारची लोकशाही भारत, अमेरिकेची संयुक्त संस्थाने आणि इतर अशाच मोठ्या राष्ट्रात अप्रत्यक्ष लोकशाही योग्य आहे. नियमित काळांने होणाऱ्या निवडणुकांमधून लोक त्यांचे प्रतिनिधी निवडतात आणि कायदे मंडळावर पाठवतात. हे प्रतिनिधी कायदे तयार करण्याच्या प्रक्रियेत भाग घेतात आणि व्यवस्था नियंत्रित करतात. वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या निवडणुकामधुन प्रतिनिधी निवडून त्यांच्यापासून सरकार निवडणे म्हणजे लोकशाही. हे निवडून आलेले प्रतिनिधी आपल्यातील एकाला नेता निवडतात आणि तो देशाचा सर्वोच्च अध्यक्ष असतो.

**लोकशाहीची वैशिष्ट्ये:**

1. लोकशाही लोकांच्या मान्यतेवर अवलंबून असते. हे लोकांचे सरकार असते.
2. लोक आपले प्रतिनिधी निवडतात, त्यांचे सरकार बनते. तेच प्रतिनिधी लोकांसाठी कायदे बनवितात.

3. हे सार्वत्रिक प्रौढ मतदानाच्या तत्त्वावर आधारित आहे.

4. येथे मुक्त आणि नि:पक्षपाती वातावरणात ठराविक कालावधीत निवडणुका घेतल्या जातात.

5. नागरिक कोणताही भेदभाव न करता मुक्त आणि स्वातंत्र्यपणे मूलभूत हक्क उपभोगतो. त्यामुळे तेथे व्यक्ति विकासाला वाव असतो.

6. लोकशाही सरकार हे जनतेला प्रतिसाद देणारे सरकार असते.

7. जर सरकार जनतेच्या आकांक्षांना प्रतिसाद देत नसेल तर अशा सरकारला शांततापूर्ण आणि घटनात्मक मार्गाने बदलण्याचा अधिकार जनतेला आहे.

8. या सरकारमध्ये सर्व नागरिक समान असल्याचा कायदा करून कायद्याने राज्य चालते. सरकारचे अधिकार घटनात्मक नियमांद्वारे मर्यादित असतात.

9. राजकीय पक्षांचे अस्तित्व हे लोकशाहीचे आणखी एक वैशिष्ट्ये आहे. लोकशाहीत लोकांना स्वतःचे पक्ष काढण्याची संधी असते.

10. लोकशाही प्रत्येक व्यक्तीचा सन्मान राखते.

11. समानता आणि स्वातंत्र्य ही लोकशाहीची प्रमुख तत्वे आहेत, जात, धर्म, लिंग आणि स्थितीच्या आधारावर लोकांमध्ये भेदभाव केला जाऊ शकत नाही.

12. लोकशाहीमध्ये लोक सर्वसत्ताधीश (सार्वभौम) असतात. कारण सरकारला त्यांच्याकडुनच हे अधिकार प्राप्त झालेले असतात. या उद्देशाने ठराविक काळात निवडणूका घेतल्या जातात. भारतामध्ये निवडणूकीचा कालावधी पाच वर्षाचा असतो.

13. लोकशाही हे कल्याणकारी राज्य असून ते सर्व लोकांच्या सर्वांगीण अभिवृद्धीकडे विशेष लक्ष दिले जाते.

14. लोकशाही व्यक्ती पूजेच्या विरोधात आहे.

**लोकशाही यशस्वी होण्यासाठी आवश्यक घटक :**

1. लोकांमध्ये लोकशाहीचे रक्षण करण्याची वृत्ती असली पाहिजे.

2. लोकांनी नेहमीच जागरूक राहिले पाहिजे.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

3. लोकशाहीचे यश नेहमीच सहिष्णुतेवर अवलंबून असते. लोकांनी देणे आणि घेणे हे तत्व असणे आवश्यक आहे.

4. लोकशाहीचे यश सुयोग्य नेतृत्वावर अवलंबून असते. नेत्यामध्ये सामान्य जनतेच्या समस्या जाणून घेण्याची क्षमता असली पाहिजे. त्यांचे निराकरण करणारे, सेवावृती देशभक्ती आणि त्याग करण्याची वृत्ती त्यांच्यात असली पाहिजे.

5. सत्ताधारी पक्षाच्या कृतींबद्दल विरोधी पक्षाने नेहमी जागरूक असले पाहिजे. आणि त्यांच्या हुकूमशाही कृतीवर नियंत्रण ठेवले पाहिजे.

6. सुशिक्षित आणि जागरूक मतदार लोकशाहीच्या यशाकडे नेऊ शकतो.

7. लोकशाहीचे यश लोकावर अवलंबून आहे. जनतेने मतदान केलेच पाहिजे आणि लोकांनी भ्रष्ट आणि वाईट मार्ग स्विकारूनये. जनतेने त्यांच्या समस्यांना उत्तर देणारे आणि भ्रष्ट नसणारे योग्य उमेदवार निवडले पाहिजे.

8. मुक्त, निर्भय आणि नि:पक्षपाती वृत्तपत्रामुळे लोकशाही यशस्वी होते.

9. सुसंघटित कार्यक्षम आणि जबाबदार स्थानिक स्वराज्य संस्था लोकशाही बळकट बनवतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**लोकशाहीचे फायदे:**

जगभरातील बहुतेक देशांनी लोकशाही शासन व्यवस्था अत्यंत अनुकूल असल्याने ते स्वीकारले आहेत. लोकशाहीचे फायदे खालीलप्रमाणे आहेत.

1. लोकशाही स्वतंत्र न्यायव्यवस्थेच्या अंतर्गत नागरिकांच्या हक्कांचे आणि स्वातंत्र्याचे रक्षण करते.

2. लोकशाही हे समानतेचे तत्व आहे.

3. लोकशाहीत, लोकांना निर्णय घेताना स्वत:साठी कायदे तयार करण्याची संधी असते.

4. लोक स्वत:चे प्रतिनिधी आणि आवडीचे सरकार निवडू शकतात.

5. लोकशाहीत निर्णय घेणे हे जनमत आणि वादविवादाने ठरवले जाते.

6. विरोधी पक्षाला सत्ताधारी पक्षाचे गैरवर्तन तपासण्याची आणि रोखण्याची संधी चर्चा, टीका, निषेध या द्वारे मिळते.

7. व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासासाठी मुलभूत हक्क दिले आहेत.

8. लोकशाहीत निवडणुकीद्वारे शांतपणे सरकार बदलता येते आणि क्रांतीचा धोका टाळला जातो.

9. लोकशाही विविध मार्गांनी राष्ट्रवाद, देशभक्ती आणि नागरी ऐक्य विकसित करते.

**लोकशाहीचे तोटे :**

लोकशाहीचे काही तोटे अथवा दोष आहेत ते खालील प्रमाणे.

1. शैक्षणिक पात्रता, व्यवस्थापन कौशल्ये, नेतृत्वगुण, सामाजिक, आर्थिक, राजकीय ज्ञानाचा अभाव, किंवा अज्ञान आणि स्वार्थी दृष्टीकोन यामुळे लोकशाही कमकुवत होते.

2. सत्तेसाठी राजकीय पक्षांमधील स्पर्धा पक्षपात आणि भ्रष्टाचाराला मदत करते.

3. राष्ट्रीय हितापेक्षा पक्षाचे हित महत्वाचे आहे.

4. एका राजकीय पक्षातून दुसऱ्या राजकीय पक्षात गेल्याने सरकारला अस्थिर करते.

5. लोकशाही व्यवस्थेत, निवडणुकांमध्ये जातीय घटक, धार्मिक घटक, पैसा आणि बळाचा वापर यांच्या मुक्त वापरामुळे सरकार अशक्त बनते.

6. लोकशाहीत कायदे करण्याची पद्धत फार काळ चालणारी आहे.

7. निवडणुका घेणे हे फार खर्चिक आणि वेळखाऊ काम आहे.

8. बहुमत असलेला सत्ताधारी पक्ष हुकूमशाही वृत्तीने वागू शकतो. विरोधी किंवा इतर अल्पसंख्याक राजकीय पक्षांचे विचार दुर्लक्षीत करत असतो.

9. अशिक्षित किंवा अशिक्षित गरीबांचे नोकरशाही सदस्यांकडून शोषण होण्याची शक्यता जास्त असते.

10. समाजविघातक शक्ती संघटना त्यांच्या पैशाने आणि बलशक्तीचा वापर करून सरकारवर दबाव आणला जाऊ शकतो.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**सार्वत्रिक प्रौढ, मतदान पद्धत :** भारतामध्ये प्रतिनिधिक लोकशाही प्रणाली आहे आणि या संदर्भात निवडणुका मुख्य भूमिका बजावतात. लोकांना निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार आहे. जात, वर्ण, पंथ, धर्म, भाषा आणि लिंग याकडे लक्ष न देता 18 वर्षा वरील व्यक्तीला भारतात मत देण्याचा अधिकार पुरवला आहे.

*'भारतात 1989 पूर्वी मतदान करण्यासाठीचे किमान वय 21 वर्ष होते. पण 61 व्या घटना दुरुस्तीने 1989 पासून मतदाराचे किमान वय 21 वर्षावरून 18 वर्षे करण्यात आले आहे.*

उत्तम सरकारची रचना जागरूक मतदारावर अवलंबून असते. त्यामुळे समंजस मतदाराने जात, वर्ण, पैसा, इत्यादी यांचा परिणाम मतदारावर होऊ नये, म्हणून मतदाराने उमेदवाराची निवड काळजीपूर्वक केली पाहिजे. निवडताना खालील घटकांचा विचार केला पाहिजे.

1. उमेदवाराकडे सामाजिक कार्य करण्याची इच्छा आणि आवड असली पाहिजे.
2. उमेदवाराला सार्वजनिक काळजी असली पाहिजे आणि लोकांनी त्याला सहज भेटले पाहिजे.
3. उमेदवार शिक्षित, निष्ठावान, प्रामाणिक, सेवाभावी आणि वचनबद्ध असणे आवश्यक आहे.
4. उमेदवार हा भ्रष्ट असू नये आणि तो नि:स्वार्थी, सत्वगुणी आणि कार्याने इतरांसमोर आदर्श असायलाच हवा.
5. न्यायालयाने त्याला अथवा तिला गुन्हेगार म्हणून जाहीर केलेले नसावे आणि तो किंवा ती गुन्हेगारी कार्यात सहभागी होता कामा नये.
6. उमेदवाराने समाजविघातक आणि देशद्रोहाच्या कृत्यांमध्ये सहभागी होता कामा नये.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**निवडणुका :**

लोकशाही व्यवस्थेत वेळोवेळी निवडणुकांना फार महत्व असते. भारतात दर पाच वर्षांनी आणि इतर देशांमध्ये वेगवेगळ्या वेळी सार्वत्रिक निवडणुका होतात. पाच वर्षातून एकदा घेण्यात येणाऱ्या नेहमीच्या निवडणुकांना सार्वत्रिक किंवा सर्वसाधारण निवडणुक असे म्हणतात. पाच वर्षापुर्वी जर एखादी रिकामी जागा भरण्यासाठी निवडणुक घेतली जात असेल तर त्या निवडणुकीस पोट निवडणुक म्हणतात. निवडणुका घेण्यासाठी भारत सरकारने निवडणुक आयोगाची स्थापना केली आहे. (ECI - इलेक्शन कमिशन ऑफ इंडिया) त्याचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे. या आयोगामध्ये सध्या एक मुख्य निवडणूक अधिकारी आणि राष्ट्रपतींनी नियुक्त केलेले इतर दोन निवडणूक अधिकारी असतात. निवडणुक अधिकारी कोण असावा हे ठरवण्याचा अधिकार संसदेला आहे. राज्य पातळीवर राज्य निवडणूक आयोग आहेत. यामध्ये पंचायत राज्याच्या निवडणुका होतात.

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागा योग्य शब्दानी भरा :**

1. डेमॉक्रशी हा शब्द _____ आणि _____ या शब्दापासून बनला आहे.
2. भारतात दर पाच वर्षातून एकदा निवडणूका घेतल्या जातात त्याला ________ असे म्हणतात.
3. भारतात मतदान करण्यासाठी किमान वय ________ वर्षे आहे.
4. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणारी संस्था ________ होय.

**II. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या :**

5. लोकशाहीचे फायदे काय आहेत ?
6. प्रत्यक्ष लोकशाही अप्रत्यक्ष लोकशाहीपेक्षा वेगळी कशी आहे?
7. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार म्हणजे काय?

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

8. लोकशाहीच्या यशात योगदान देणाऱ्या आवश्यक घटकांची यादी करा.

9. लोकशाहीत सक्षम विरोधी पक्षाची गरज का असते?

10. लोकशाहीचे पाच गुण सांगा.

11. लोकशाहीत नियमीत निवडणुका का आवश्यक आहेत ?

12. लोकशाहीचे यश हे मतदारावर अवलंबून असते. चर्चा करा.

**III. उपक्रम :**

1. लोकशाही हा सरकारचा सर्वोत्तम प्रकार आहे. चर्चा करा.

2. चांगले नेतृत्व लोकशाहीच्या यशात योगदान देऊ शकते या विषयावर व्याख्यान आयोजित करा आणि त्यावर चर्चा करा.

**IV. प्रकल्प :**

1. तुमच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्विझरलँड मध्ये प्रचलित असलेल्या प्रत्यक्ष लोकशाहीचा अहवाल तयार करा.

2. भ्रष्टाचाराविरुद्धच्या लढ्यात कर्नाटक लोकायुक्त संस्थेच्या भूमिकेचा अहवाल तयार करा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण - 23

# स्थानिक स्वराज्य संस्था

Y4W9B6

***या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर पुढील मुद्दे शिकायला मिळतील.***

- *स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निर्मितीची पार्श्वभूमी जाणून घेऊया.*
- *स्थानिक स्वराज्य संस्थांची उद्दिष्टे व कार्य जाणून घेऊया.*
- *विविध स्थानिक स्वराज्य संस्थाची रचना, प्रशासन, जबाबदारी आणि कर्तव्ये जाणून घेऊया.*

भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था ही संकल्पना फार जुनी आहे. अनेक महाराजानी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निर्मितीला आणि विकासाला महत्व दिल्याचे इतिहासावरून कळते. सरकार आणि जनता यांच्यामधील दुवा म्हणून स्थानिक स्वराज्य संस्था काम करते. स्थानिक लोकांच्या समस्या मोकळेपणाने मांडण्यासाठी ही संस्था मदत करते. लोकांच्या सहभागाने आणि सहकार्याने या स्थानिक संस्था स्थानिक पातळीवर लोकांच्या समस्या सोडविण्याचे काम करतात. अगदी खालच्या पातळी वरील लोकशाहीचे व्यवस्थापन, लोकाच्या प्रत्यक्ष सहभागाने मूळ धरु लागते. लोक या स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या हातात सत्ता सोपवतात. सत्तेच्या विक्रेंदीकरणासाठी या स्थानिक स्वराज्य संस्था आवश्यक आहेत. भारतात ब्रिटिशांनी 1919 आणि 1935 साली कायदा करून स्थानिक स्वराज्य संस्थाना पुष्कळ अधिकार दिले होते. भारत हे रामराज्य व्हावे असे राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे स्वप्न होते. त्यांचे हे रामराज्याचे स्वप्न फक्त ग्रामस्वराज्यामुळेच प्रत्यक्षात येऊ शकते. यासाठी भारत स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने अनेक समित्या, ठराव आणि कायदे तयार केले.

घटनेने राज्याना ग्रामपंचायतीचे आयोजन करण्यासाठी आणि त्यांच्या प्रभावी कामकाजासाठी योग्य अधिकार प्रधान करण्यांचे स्पष्ट निर्देश दिले आहेत 1993 मध्ये संविधानातील 73 वी आणि 74 वी दुरुस्ती करण्यात आली, ती पंचायत राजव्यवस्थेच्या इतिहासातील एक मैलाचा दगड बनली.

स्वातंत्र्यापूर्वी पासूनच कर्नाटकात स्थानिक स्वराज्य संस्था कार्यरत आहेत. स्वातंत्र्यानंतर आमच्या राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण व्हाव्यात आणि त्यांना बळकटी यावी म्हणून आमच्या राज्य सरकारने अनेक समित्या स्थापन केल्या आहेत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

आपल्या राज्य सरकारने 1983 मध्ये पंचायत राजकायदा आणला आणि 1985 पासून तो लागू केला. या कायद्यानुसार निवडणूकीद्वारे जिल्हा स्तरावर जिल्हा पंचायत, तालुका स्तरावर तालुका पंचायत तर गाव पातळीवर ग्राम पंचायत निर्माण केल्या. नंतर 1983 च्या पंचायत राज कायद्याला बळकटी मिळावी म्हणून 1993 मध्ये एक घटना दुरुस्ती करण्यात आली. या दुरुस्तीत ग्राम सभांचे आयोजन करावे असे ठरवण्यात आले. आधुनिक पद्धतीचा विकास व्हावा यासाठी कर्नाटक पंचायत राज कायद्यात अनेक दुरुस्त्या करण्यात आल्या.

**स्थानिक स्वराज्य संस्थांचे उद्दिष्ट्ये :**

- स्थानिक लोकांना सहभागी करून घेऊन त्यांच्या समस्या स्थानिक पातळीवर सोडवणे.
- स्थानिक सामान्य लोकांना व्यवस्थापनाचे ज्ञान पुरवणे.
- सत्तेचे विकेंद्रीकरण आणि व्यवस्थापन अधिक प्रभावी व्हावे यासाठी मदत करणे.
- लोकांच्यातील नेतृत्व गुणांचा विकास व्हावा यासाठी प्रयत्न करणे.

**स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्ये :** ग्राम पंचायत, तालुका पंचायत, जिल्हा पंचायतीची कार्ये निरनिराळी आहेत व भरपूर आहेत. त्यातील महत्त्वाची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

- पंचायतीची मालमत्ता सुव्यवस्थित आणि सुरक्षित ठेवणे.
- स्थानिक संस्थांचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे.
- आरोग्य आणि कुटुंब कल्याण कार्यक्रम आखणे.
- रस्त्यांची दुरुस्ती, सुरळीत वीजपुरवठा, घरे आणि पिण्याच्या पाण्याची सोय इ. विकासात्मक कामे करणे.
- प्राथमिक, माध्यमिक, प्रौढ आणि अनौपचारिक शिक्षण पद्धतीला प्रोत्साहन देणे.
- जागेची स्वच्छता करणे आणि आरोग्य सुविधा पुरविणे.
- सर्व प्रकारचे प्रदुषण टाळणे
- आवश्यक उपयोगी वस्तू म्हणजे अन्नधान्य, केरोसीन इ. वितरणाच्या सुविधा व सवलती पुरवणे.
- जन्म मृत्यूची नोंद ठेवणे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

- शेती, पशुपालन, खादी आणि हस्तकला उद्योगांना प्रोत्साहन देणे.
- माती, पाणी आणि जंगलाचे संरक्षण व्हावे म्हणून कार्यक्रम आखणे.
- शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शेतकी विकास कार्यक्रमाचे प्रसारण अंमलात आणणे.
- अनुसूचित जाती, जमाती, अशक्त स्त्रिया व मुले यांच्या फायद्याच्या कल्याणकारी योजना आखणे आणि त्या अंमलात आणणे.
- बाजार, रस्त्यावरील दिवे, वाचनालये इ सेवा पुरवणे.
- कर आणि दंड गोळा करणे.
- सरकारच्या विविध  कल्याणकारी योजना साठी मुक्तपणे लाभार्थ्यांची ओळख पटवणे व निवड करणे.

**उत्पन्नाचे मार्ग :** स्थानिक स्वराज्य संस्थाना विविध योजनांच्या अमलबजावणीसाठी आर्थीक निधी किंवा भांडवलाची आवश्यकता असते. या संस्थांचे मुख्य उत्पन्नाचे स्त्रोत पुढे दिले आहेत.

- पाणी, आरोग्य, शिक्षण, ग्रंथालय आणि वाचनालयावरील कर गोळा करणे.
- इमारत, रिकामी जागा, व्यापारी संस्था बाजार, करमणूक, घरे आणि जाहिरात संस्थांवरील कर गोळा करणे.
- प्रवासी स्थळापासून मिळालेला कर.
- पंचायत मालमत्तेचे भाडे अथवा खंडाची रक्कम.
- राज्य सरकारची आर्थिक मदत.

**स्थानिक स्वराज संस्थांची रचना (Composition of Local Self  Governing Bodies):**

**ग्राम सभा :** ग्रामसभा ही ग्रामीण स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थांची मूलभूत सभा असते. ते थेट लोकशाहीशी सुसंगत आहे. ग्रामपंचायतीचे सर्व मतदार हे त्याचे सदस्य आहेत. त्या गावातील 18 वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याही व्यक्तिस भाग घेता येतो. ग्राम पंचायतीचा अध्यक्ष हाच त्या सभेचा अध्यक्ष असतो आणि इतर सदस्य सुद्धा सभेस हजर असतात. सहा महिन्यातून एकदा ग्राम सभेचे आयोजन केलेच पाहिजे. ग्रामसभेत त्या खेड्यातील समस्यांवर चर्चा होते ग्रामस्तरावर सल्ला देण्याची संधी असते. विविध सरकारी योजनांचे लाभार्थी व त्यांची नावे सुचविण्याची जबाबदारी या सभेला असते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



**ग्राम सभा**

**ग्राम पंचायत:** ग्राम पंचायत राज संस्थांचा पाया असल्याने खालच्या स्तरावर अस्तित्वात असलेली संस्था आहे. ग्रामपंचायतीची रचना लोक संख्येवर आधारित असते. एकूण 5000 ते 7000 लोकसंख्या असलेल्या दोन किंवा तीन गावासह एक ग्रामपंचायत तयार केली जाते. पण उत्तर कन्नड, दक्षिण कन्नड आणि मलनाडू या भागात फक्त 2,000 लोकसंख्या असूनही तेथे ग्रामपंचायत केली आहे. पंचायत विभागातील प्रौढ लोकसंख्या या ग्राम पंचायतीतील उमेदवार निवडते. 400 मतदार एका प्रतिनिर्धीला निवडतात. अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय आणि स्त्रीयांसाठी काही जागा राखीव असतात. ग्रामपंचायतीचा कार्य काळ पहिल्या सभेच्या दिवसापासून सुरु होतो आणि पूर्ण पाच वर्षांचा असतो.

*2000 च्या पंचायत राज कायद्यातील दुसऱ्या दुरुस्तीनंतर, पंचायत सदस्याच्या घरी शौचालय असणे आवश्यक आहे. ते जर नसेल तर निवडून आल्यानंतर एका वर्षांच्या आत शौचालय बांधले पाहिजे.*

कमीतकमी दोन महिन्यातून एकदा पंचायतीची सभा बोलवली जाते. निर्णय घेण्यासाठी कमीत कमी एक तृतीयांश सदस्य हजर असलेच पाहिजे. 30 महिन्यांच्या कालावधीसाठी ग्राम पंचायतीतील निवडून गेलेले सदस्य अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची निवड करतात. ग्राम पंचायतींच्या सभेचे आयोजन अध्यक्षांच्या अधिकाराखाली केले जाते. त्याच्या गैरहजेरीत कामकाज उपाध्यक्ष पाहतो. अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या जागेसाठी आरक्षणाचे नियम असतात. ग्राम पंचायतीच्या सक्षम व्यवस्थापनासाठी स्थायी समिती नेमली जाते.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

ग्राम पंचायतीचे कामकाज पाहण्यासाठी एक पूर्णवेळ अधिकारी म्हणून सचिव नेमलेला असतो. अलिकडेच कर्नाटक राज्य सरकारने कर्नाटक लोकसेवा आयोगामार्फत प्रत्येक पंचायतीसाठी एक पंचायत विकास अधिकारी (PDO - Panchayat Development Officer) नियुक्त केला आहे.

**कर्नाटक पंचायत राज तक्ता :**

कर्नाटक सरकार

↓

ग्रामीण विकास आणि पंचायत राज्य सचिवालय

↓

जिल्हा पंचायत (31)

↓

तालुका पंचायत (239)

↓

ग्रामपंचायत(5954)

↓

अध्यक्ष

↓

उपाध्यक्ष

} ग्रामपंचायत सदस्याद्वारे निवडले जाते.

↓

सदस्य } मतदारांनी निवडले जाते

↓

पंचायत विकास अधिकारी (PDO) } राज्य सरकार नियुक्त करते.

↓

ग्रामपंचायत सचिव

श्रेणी – I / श्रेणी – II

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

*कर्नाटक आर्थिक सर्वेक्षण 2022-23 मधील आकडेवारीच्या आधारे वरील नकाशा मध्ये जिल्हा पंचायती, तालुका पंचायती आणि ग्रामपंचायतींची संख्या दिली आहे.*

**तालुका पंचायत :** तालुका पंचायत ही पंचायतराज संस्थांचा मध्यम स्तर आहे. 1993 च्या पंचायत राज्य कायद्यानुसार तालुका पातळीवर, तालुका पंचायतीच्या स्थापनेची संधी देण्यात आली आहे. यात तालुका पंचायतीच्या निवडून आलेल्या सदस्यांचा समावेश असतो. निवडून आलेले सदस्य प्रत्यक्ष निवडणूकीच्या माध्यम ातून मतदारांकडून निवडले जातात. तालुक्याच्या लोकसंख्येच्या आधारावर तालुका पंचायतीच्या सदस्यांची संख्या ठरवली जाते. प्रत्येक 10,000 मतदारांमागे एक तालुका पंचायत सदस्य असतो. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मागासवर्ग आणि म हिला आरक्षण देखील सदस्यत्वासाठी आवश्यक असते. शिवाय ग्रामपंचायतीतील एक पंचमांश अध्यक्ष सुद्धा तालुका पंचायतीचे सदस्य असतात. हे अध्यक्ष सोडत पद्धतीने निवडले जातात. एका वर्षासाठी आळीपाळीने (Rotation Basis) ने निवडले जातात. तालुका पंचायत सदस्यांचा कालावधी पाच वर्षाचा असतो. त्यांना राजीनामा देण्याचा हक्क असतो. किंवा सरकार त्यांना काढू शकते. विधानसभा, विधान परिषद आणि लोकसभा, राज्यसभा सदस्यांना आपापल्या मतदार संघातील तालुका पंचायतीच्या सभेला उपस्थित राहण्याची संधी असते.

दोन महिन्यातून एकदा तालुका पंचायतीची सभा बोलावली जाते. फारच महत्वाचा एखादा निर्णय घ्यायचा असेल तरीही सभा घेतली जाते. तालुका पंचायतीचा अध्यक्ष या सभेचा अध्यक्ष असतो. त्यांच्या अनुपास्थितित उपाध्यक्ष त्यांचे कार्य पार पाडतात. 20 महिन्यांच्या कालावधीसाठी अध्यक्ष आणि उपाध्यक्षाची निवड तालुका पंचायतीचे सदस्य करतात. सक्षम व्यवस्थापनासाठी स्थायी समिती नेमली जाते. तालुका पंचायतीच्या कायदेशीर बाबी हाताळण्यासाठी सरकारतर्फे एक अधिकारी नेमला जातो. (EO-Executive Officer) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यापेक्षा अधिक कार्ये तालुका पंचायतीला करावी लागतात. ती कार्ये खालील प्रमाणे :

- ग्राम पंचायतींच्या वार्षिक योजनांच्या बेतांचे दृढीकरण करून ते जिल्हा पंचायतीला सादर केले जातात.
- जिल्हा पंचायत किंवा राज्य सरकारने सुचवलेले किंवा हुकूम दिलेले सर्व कल्याणकारी कार्यक्रम राबवणे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**जिल्हा पंचायत :** जिल्हा पंचायत ही पंचायत राज्य व्यवस्थेची सर्वोच्च पातळी आहे. जिल्ह्याचा राज्यकारभार पाहण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा पंचायतीची स्थापना केली आहे. यापूर्वी जिल्हयाला जिल्हा मंडळे किंवा समित्या म्हणून ओळखले जात असे. जिल्हा पंचायतीचे सदस्य प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे त्या जिल्हयातील जनतेद्वारे निवडले जातात. लोकसंख्येनुसार जिल्हा पंचायतीच्या सदस्यांची संख्या निरनिराळी असते. दक्षिण कन्नड, उत्तर कन्नड आणि चिक्कमंगळूर जिल्हयात 30,000 लोकसंख्येमागे एक प्रतिनिधी कोडगू जिल्हयात 18000 लोकसंख्येमागे एक प्रतिनिधी, इतर ठिकाणी 40,000 लोकसंख्येमागे एक प्रतिनिधी निवडला जातो. निवडून आलेले जिल्हा पंचायतीचे सदस्य याशिवाय त्या जिल्हयातील सर्व तालुका पंचायतीचे अध्यक्ष विधानसभा व विधान परिषदेचे शासक आणि त्या जिल्ह्यातील लोकसभा सदस्य हे सुध्दा जिल्हा पंचायतीचे सदस्य असतात. ते सभेला हजर राहतात मतदान करतात, जिल्हा पंचायतीच्या नियमानुसार अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि स्त्रियांना जागा राखीव असतात.

जिल्हा पंचायतीच्या सदस्यांचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो जिल्हा पंचायतीसाठी 30 महिन्यांकरता एक अध्यक्ष आणि एक उपाध्यक्षाची निवड केली जाते. जिल्हा पंचायतीच्या अध्यक्षाला जिल्हाध्यक्ष म्हणतात. जिल्हा पंचायतीचीकमीत कमी दोन महिन्यातून एकदा सभा बोलविली जाते. या सभेचे अध्यक्ष जिल्हाध्यक्ष असतात. त्यांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष त्यांची जबाबदारी पार पाडतात. विपत्ती काळात संकटग्रस्तांच्या मदतीसाठी एक लाख रुपयांच्या मंजूरीचा अधिकार जिल्हाध्यक्षांना असतो. जिल्हा पंचायतीच्या सक्षम कारभारासाठी पाच स्थायी समित्या असतात. जिल्हा पंचायतीचे कायदेशीर कामकाज पाहण्यासाठी एका मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची (CEO-Chief Execution Officer) सरकारकडून नियुक्ती होते. हा अधिकारी जिल्हाधिकाऱ्याच्या समकक्ष असतो. तो जिल्हा पंचायतीच्या सभेत आणि चर्चेत भाग घेतो. पण त्याला मतदानाचा अधिकार नसतो. ते जिल्हा पंचायतीचे कार्यनिर्वाह म्हणून काम करतात.

जिल्हा पंचायत म्हणजे जिल्ह्याचे सरकार असते. जिल्ह्यात विकासात्मक कार्यक्रम आणि कल्याणकारी योजना राबवण्यासाठी भरपूर सत्ता दिलेली असते. जिल्हा पंचायत सरकारच्या सर्व विकासात्मक कार्य आणि योजनांचे मूळ असते. याशिवाय आणखी कार्ये अशी.

- सरकारच्या योजना आणि कार्यक्रम यांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी ग्राम पंचायत, तालुका पंचायत, जिल्हा पंचायतीमध्ये परस्पर विश्वास, खात्री आणि सहकार्याचे वातावरण निर्माण करणे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

- कार्यक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व विभागामध्ये ताळमेळ राखणे आणि या विकासात्मक कार्यक्रमांवर देखरेख ठेवणे.
- सहकारी संस्था, सहकारी बँका आणि इतर अशाच सहकारी संस्थांना प्रोत्साहन व पाठिंबा देणे.
- राज्य सरकारने निर्देशित केलेली कामे अंमलात आणणे.

***राज्य निवडणूक आयोग:*** *संविधानाच्या 73 व्या घटना दुरुस्ती कायद्याद्वारे आणि 74 व्या दुरुस्ती कायद्याने घटनेत समाविष्ट केलेल्या कलम 243K नुसार राज्यघटनेत समाविष्ट केलेल्या कलम 243ZA आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्यस्तरावर स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. अशा प्रकारे कर्नाटक राज्य निवडणूक आयोगाची स्थापना झाली असून ग्रामपंचायत, तालुका पंचायत, जिल्हा पंचायत आणि नगरपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका यासारख्या स्थानिक शहरी स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी या आयोगाची असते.*

**नागरी स्थानिक संस्था :** राज्यात अनेक शहरे आणि नगरे आहेत. नगरे आणि शहरानांच नगर म्हणतात. शिक्षण, आरोग्य, वाहतुक, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि करमणुकीच्या चांगल्या सोयी येथे असतात. त्याचबरोबर पुष्कळ समस्याही असतात. या समस्या सोडवण्यासाठी आणि चांगले सरकार पुरवण्यासाठी नागरी स्थानिक संस्था उभारल्या आहेत. 74 व्या घटना दुरुस्ती कायद्याने शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्रदान केला. नगरपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि महानगरपालिका या कर्नाटकातील प्रमुख शहरी स्थानिक स्वराज्य संस्था आहेत.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**नागरी स्थानिक संस्थेचे 3 प्रकार आहेत :**

1. महानगरपालिका - मोठ्या शहरात
2. नगरपालिका - नगरे आणि शहरात
3. छावणी केंद्रे - संरक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली

एखादा विशिष्ट भाग, शहर किंवा नगर आहे असे घोषित करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. लोक संख्या, उत्पन्न यासारख्या घटकांचा त्यासाठी विचार केला जातो. त्यांची पुष्कळ कार्ये आहेत. त्यातील प्रमुख म्हणजे.

- अंदाजपत्रक तयार करणे आणि मंडळाची संमती घेणे.
- नगराचे किंवा शहराचे सर्व व्यवस्थापन बघणे.
- चांगल्या नगर नियोजन पद्धतीची रचना करणे व अंमलबजावणी करणे.
- चांगले रस्ते, वाहतूक, पाणी पुरवठा, वीज, शिक्षण, बाजार आणि आरोग्य सुविधा पुरवणे.
- स्वच्छता राखण्यासाठी चांगली सांडपाणी व्यवस्था पद्धत पुरवणे आणि नागरी कचऱ्याची विल्हेवाट लावणे.
- इमारती बांधण्यासाठी परवानगी देणे, स्थानिक इमारती आणि मालमत्तांची व्यवस्था पाहणे.
- जन्म मृत्यूची नोंद ठेवणे.
- उद्याने, खेळ आणि करमणुकीच्या सुविधा पुरवणे.
- झोपडपट्टीतील राहणीमान सुधारण्यासाठी सुविधा पुरवणे.
- अनाथालये, वृद्धाश्रम, भिकाऱ्यांची वसतिस्थाने, बालन्यायालये आणि मुलांची कल्याण केंद्रे स्थापन करणे.
- पोहण्याचा तलाव, क्रीडांगण, वस्तु संग्रहालये, बस स्टँड, वाचनालये, ग्रंथालये, जनावरांचा दवाखाना, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी सभागृहे, बाजार, आणि क्रिमॅटोरियम्सची (स्मशानभूमी) उभारणी करणे.
- पावसाचे पाणी साठण्यासाठी योजना आखणे.
- सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देणे.
- मागासलेल्या जाती आणि दुर्बलांना त्यांच्या प्रगतीसाठी काही उपाय करणे.
- नगराचे किंवा शहराचे सौंदर्य वाढवण्यासाठी हिरवळ वाढवणे व स्वच्छतेचे उपाय करणे आणि प्रोत्साहन देणे.

**उत्पन्नाचे मार्ग :**

या सर्वांचा विकास आणि प्रगतीसाठी, निरनिराळ्या योजना राबवण्यासाठी नागरी स्थानिक संस्थांना निधीची आवश्यकता असते. उत्पन्नाचे महत्वाचे मार्ग म्हणजे कर बसवणे आणि इमारती, रिकाम्या जागा, दुकाने आणि गाड्या विक्री इ. तून कर जमवणे. याशिवाय कार्यालये भाड्याने देणे, बाजार, दुकाने सभागृहे पाणी पट्टी, बाजारकर, मनोरंजन कर इ.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

महसूल मिळवणे. राज्य सरकारने पुरवलेल्या निधीमुळे या स्थानिक संस्थांना कल्याणकारी उपयोजना करता येतात.

**नागरी स्थानिक संस्थांची रचना :**

**नगरपालिका :** (नगरपंचायत, नगरपालिका आणि नगरपरिषद) लोकसंख्येच्या प्रमाणावरून नागरी भागांचे नगर किंवा शहर असे विभाग पडतात. 20,000 ते 50,000 दरम्यान असणाऱ्या लोकसंख्येला नगर म्हणतात. त्याठिकाणी नगर परिषद असते. त्याचप्रमाणे, 50,000 ते 3 लाख लोकसंख्या असणाऱ्या प्रदेशाला शहर म्हणतात. त्याला नगरपालिका म्हणतात. नगर परिषद आणि नगर पालिकांच्या प्रशासकीय मंडळांनी निवडून दिलेले प्रतिनिधी आहेत. (councillor) नगरसेवक थेट त्या नगरातील किंवा शहरांतील लोकाद्वारे निवडले जातात. त्या भागातील लोकसंख्येनुसार नगरसेवकांची संख्या ठरते नगरपरिषदेत 23 ते 27 च्या दरम्यान तर नगरपालिकेत 31 ते 37च्या दरम्यान सदस्य संख्या असते. याशिवाय सरकारकडून चांगला अनुभव आणि स्थानिक स्वराज्य संस्था व्यवस्थापनाचे ज्ञान असणाऱ्या 5 जणांची नियुक्ती केली जाते. या नियुक्त केलेल्या सदस्यांना चर्चेत सहभागी होता येते पण मतदान करता येत नाही आमदार, खासदार या सभेत भाग घेतात व मतदान करतात. या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एससी, एसटी, मागासवर्गीय आणि महिलांना नियमानुसार आरक्षण दिले जाते. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष हे स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रमुख असतात.

ते मंत्रीमंडळकडून निवडले जातात या संस्थेच्या सभेचे अध्यक्ष स्थान अध्यक्ष निभावतात आणि या संस्थांचे कार्य सुरळीत चालावे म्हणून मदत करतात. अध्यक्षांच्या गैरहजेरीत उपाध्यक्ष काम पाहतात. या संस्थांचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. काही विशेष परिस्थितीत सरकार त्यांचा कार्यकाल वाढवू शकते. या स्थानिक संस्थांचे काम सुरळीत व्हावे म्हणून चार स्थायी समित्या नेमलेल्या असतात. नगरपालिकेत मुख्य अधिकारी हा व्यवस्थापन अधिकारी असतो. त्याची नियुक्ती सरकार करते. तो नगरपालिकेतील कार्यकारी कामे पाहतो. शिवाय, कार्यकारी मंडळाला आवश्यक माहिती पुरवतो.

**महानगर पालिका :**

1976 च्या कर्नाटक नगरपालिका संस्था कायद्यांतर्गत महानगरपालिकेची रचना केलेली आहे. जेथे दोन लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असते व जेथील उत्पन्न एक कोटी रु. पेक्षा जास्त असते. अशा ठिकाणी महानगरपालिका अस्तित्वात असते. महानगरपालिकेतील सदस्यांना नगर सेवक (Corporator) म्हणतात. 30 पेक्षा जास्त व 100 पेक्षा कमी या सदस्यांची संख्या असते. राज्य सरकार महानगरपालिकेचा आकार ठरवते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

*कर्नाटकात एकूण 11 महानगरपालिका, बृहद बेंगळुरू, बृहद बेंगळुरू महानगरपालिकेमध्ये 225 सदस्य आहेत.*

महानगर क्षेत्रातील प्रतिनिधित्व करणारे लोकसभा, विधानसभा, राज्यसभा आणि विधान परिषदेचे सदस्य यांना सभांमध्ये भाग घेण्याचा आणि मतदान करण्याचा अधिकार असतो. शहराचे निवडणुकीसाठी लहान लहान विभाग केलेले असतात. त्यांना वॉर्ड किंवा विभाग म्हणतात. प्रत्येक विभागातून एक सदस्य निवडला जातो. त्या शहरातील लोक आपला प्रतिनिधी निवडतात. अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय, स्त्रिया यांना काही जागा राखीव ठेवलेल्या असतात. शहर नियोजन, आरोग्य, शिक्षण, नगरपालिका व्यवस्थेचे ज्ञान असणाऱ्या आणखी 5 सदस्यांची निवड राज्य सरकारने या महानगर पालिकेत केलेली असते. ते सर्व चर्चेत भाग घेऊ शकतात, महानगरपालिकेच्या व्याप्तीमध्ये येणाऱ्या क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकसभा, विधानसभा, राज्यसभा आणि विधान परिषदेच्या सदस्यांना सभांमध्ये भाग घेण्याचा आणि मतदान करण्याचा अधिकार आहे. यांचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. पण काही खास परिस्थितीत राज्य सरकार एक वर्षाने कार्यकाल वाढवू शकते.

महापौर (मेअर) हे शहराचे प्रथम नागरिक म्हणून ओळखले जातात. महापौर आणि उपमहापौर हे या महानगरपालिकेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष असतात. त्यांची निवड तेथील सदस्य करतात. त्यांचा कार्यकाल एक वर्षाचा असतो. सभांच्या वेळी अध्यक्षस्थानी महापौर असतात. सभेत घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी महापौर करतात. त्यांचे सर्व कामकाजावर नियंत्रण असते. सक्षम व्यवस्थापन आणि महापौरांना मदत व्हावी यासाठी स्थायी समिती नियुक्त केलेली असते.

*कर्नाटक महानगरपालिका अधिनियम 1976 नुसार 2011 मध्ये सुधारणा करण्यात आली. ही घटना दुरुस्ती बृहद बेंगळुरू महानगरपालिकेसह कर्नाटकातील सर्व 11 महानगरपालिकांना लागू आहे. या दुरुस्तीमुळे महानगरपालिकांच्या उपक्रमांमध्ये समाजाला सहभागी होण्याची संधी मिळते.*

सरकारी मुख्य अधिकारी हा महानगरपालिकेचा खरा प्रमुख असतो. सामान्यतः तो भारतीय प्रशासक सेवा (IAS Indian Administrative Service) अधिकारी असतो.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

त्याची तीन वर्षासाठी राज्य सरकार नियुक्ती करते. तो पालिकेच्या सभांना उपस्थित राहून आवश्यक माहिती पुरवतो. या सभेत घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करतो. महापौरांना आर्थिक अहवाल तयार करण्यासाठी आणि महानगरपालिकेच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी हा अधिकारी मदत करतो.

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. कर्नाटकात पंचायत राज्य कायदा आंमलात आलेले वर्ष ________
2. गावातील सर्व मतदार सहभागी होवू शकतात त्या सभेला ________ म्हणतात.
3. तालुका पंचायतीला ग्रामपंचायतच्या अध्यक्षाची निवड करताना ________ नियम पाळावे लागतात.
4. जिल्हा पंचायतीचे नियमित कामकाज पांहण्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला ________ म्हणतात.
5. बृहद बेंगळूर सह कर्नाटकामध्ये एकूण महांनगरपालिका संख्या ______ आहे.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा :**

6. स्थानिक स्वराज्य संस्थेची उद्दिष्टे कोणती ?
7. तुम्ही ग्रामीण किंवा शहरी स्थानिक स्वराज्य संस्थापैकी कोणत्या भागात राहता?
8. ग्रामपंचायतीची रचना सांगा.
9. स्थानिक स्वराज्य संस्थेचे उत्पन्नाचे स्त्रोत कोणते?
10. स्थानिक स्वराज्य संस्थेत स्थाही समितीची निर्मिती करणे आवश्यक आहे. स्पष्ट करा.
11. स्थानिक स्वराज्य संस्थेत आरक्षण मिळालेल्या सदस्याची यादी बनवा.
12. एका प्रदेशाचे तालुका आणि नगर म्हणून वर्गीकरण करण्यास किती लोकसंख्या असावी लागते?
13. कर्नाटकातील पंचायत राज्य संस्थेतील तीन टप्पे कोणते ?

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**III. उपक्रम :**

1. तुमच्या परिसरातील स्थानिक संस्थेतील एखाद्या प्रतिनिधीस शाळेत बोलवा आणि त्या परिसरातील समस्यांवर चर्चा करा व त्या समस्यावर कोणत्या उपाययोजना आखण्यात आल्या आहेत हे जाणून घ्या.
2. तुम्ही तुमच्या स्थानिक संस्थेचे सदस्य असाल तर तेथील समस्या सोडवण्यासाठी तुम्ही कोणती पावले उचलू शकता ?
3. कोणत्याही ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत सहभागी होवून अहवाल तयार करा.

**V. प्रकल्प :**

1. प्राचीन भारतात कार्यरत असलेल्या स्थानिक संस्थांचा अभ्यास करा आणि माहिती गोळा करा.
2. तुम्ही रहाता त्या क्षेत्राचे सर्वेक्षण करा आणि सरकार प्रायोजित लाभांची यादी तयार करा आणि लोकांना कसा फायदा होईल यांचा अहवाल द्या.
3. स्थानिक संस्थेच्या पाच किवा सहा सदस्यांशी संपर्क साधा आणि ते प्रतिनिधित्व करत असलेल्या क्षेत्राचा विकास करण्यासाठी केलेल्या उपाययोजनाची माहिती गोळा करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

***

## प्रकरण - 24

# दैनंदिन जीवनात समाजशास्त्र

U1E5Z6

***या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर पुढील मुद्देशिकायला मिळतील :***

- *दैनंदिन जीवनातील सामाजिक सहवास जाणून घेणे.*
- *सामाजिक जीवनातील व्यक्तीची भूमिका चेतना समजून घेणे.*
- *सामाजिक व्यवसायात प्रासंगिक संवादाचे महत्व समजून घेणे.*

**दैनंदिन जीवन :**

काही लोक स्त्रियां बद्दल बोलताना स्त्रियांना फारशे कळत नाही. अशी शंका व्यक्त करतात. या विधानात पुरुषापेक्षा स्त्रियांची अहवेलना होते. आणि त्यांना शक्तीहीन वाटते हे उघड आहे. पण ही महिलाबद्दलची सामान्य विचार पूर्वग्रह दुषितपणा दाखवून देत नसून एक वैज्ञानिक सत्य आहे. ज्ञान स्त्री आणि पुरुषांमध्ये भेद करत नाही.

वरिल उदाहरणाचा अर्थ असा आहे. की, सामान्य ज्ञान काही महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देण्यास अपयशी ठरले, जरी ते आपल्या दैनंदिन जीवनात मदत करत असले तरीही अशावेळी समाजशास्त्र आपल्याला मदत करते. समाजशास्त्रज्ञानी स्त्री जातीचा अभ्यास करून त्या शास्त्रीयदृष्ट्या पुरुषां इतक्याच खंबीर आणि कर्तृत्वान आहेत हे सिद्ध केले आहे.

वरील उदाहरणावरून असे स्पष्ट होते की, दैनंदिन जीवनाला आवश्यक असणारी माहिती समाजशास्त्रातून प्राप्त होते. कोणत्याही विषयाचा अभ्यास करताना त्याबद्दल शंका कुशंका असू नयेत.

**व्यक्ति, प्रारंभिक भाषा आणि संवाद :**

आपण आपल्या दैनदिन जीवनात अनेक लोकांशी भेटतो या सामाजिक जीवनाला सामाजिक संवाद म्हणतात. सामाजिक संवाद म्हणजे भाषा आणि खाणाखूणांचा वापर करून एकमेकांशी संभाषण केले जाते. संभाषणाद्वारे एकमेकांच्या विचार आणि वर्तणुकीवर प्रभाव पड़तो आपले दैनदिन जीवन संवादा शिवाय आपण पुढे जाऊ शकत नाही. आपण जी भाषा बोलतो ती आपण ज्या भागात राहतो त्यावर अवलंबून असते.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

त्यानुसार आपण आपली भाषा स्विकारतो. भाषेशिवाय संभाषण साधने कठिण आहे. कधी कधी आपण आपल्या मागण्यापूर्ण करण्यासाठी विविध माध्यमांचा वापर करतो. जर भाषा येत नसेल तर तुम्ही संभाषण करू शकत नाही. अशा वेळी आपण देहबोली किंवा चेहऱ्यावरील हावभावातून आपल्या भावना व्यक्त करतो.

**कर्तव्याची जाण :**

जेंव्हा तुम्ही हॉस्पिटलला भेट देता तेंव्हा तुम्ही डॉक्टर आणि नर्सेसना पाहिले असेल. शरीर तपासणीनंतर डॉक्टर आवश्यक औषध उपचारांचा सल्ला देतात. नर्स रुग्णाला औषध देऊन डॉक्टरांच्या सुचनेनुसार त्यांची देखभाल करतात. शिक्षक वर्गात येताच तुम्हाला वेगवेगळे प्रश्न विचारतात. या प्रश्नातून तुम्ही घरी अभ्यास केला आहे अथवा नाही हे ते जाणून घेतात. आणि तुम्हाला न समजलेले घटक शिक्षकाना विचारून निवारण करू शकता.

तथापी तुम्ही हॉस्पीटल मध्ये शाळेत झालेल्या पाठाबद्दल किंवा शिक्षकाना तुमच्या आजारावर औषधाविषयी प्रश्न विचारू शकत नाही आपण हे असे का करतो डॉक्टराचे कर्तव्य आरोग्याशी, शिक्षकांचे शिकविण्याशी, परिचारीकांचे सुश्रृतेशी निगडीत असते. यालाच कर्तव्याची जाण असे म्हटले जाते. आपणही कौटुंबिक जीवनात वगवेगळया भूमिका पार पाडत असतो. जसे की भाऊ-बहीण, मातापिता, आजीआजोबा इ. माणसे त्याच्या वयानुसार आणि ऋतुनुसार आशा अनेक भूमिका बजावत असतो.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागा योग्य शब्दानी भरा :**

1. आपण आपल्या भावना ________ तून व्यक्त करतो.
2. समाजशास्त्र कोणत्याही विषयाचा अभ्यास _____ शिवाय करण्यास मदत करते.
3. दैनंदिन जीवनात आपला एकमेकांशी संबंध येतो. त्याला ________ समाज जीवन असे म्हणतात.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे द्या :**

4. दैनंदिन जीवनात समाजाचे स्थान काय हे जाणून घेण्यासाठी समाजशास्त्राचा आपल्याला कसा उपयोग होतो.

5. भाषेचे महत्व सांगणारी उदाहरणे द्या ?

6. कर्तव्याची जाण म्हणजे काय?

**III. खालील प्रश्नांची चार ते पाच वाक्यात उत्तरे द्या :**

7. भाषा आणि समाज यामधील संबंध स्पष्ट करा.

8. कर्तव्याची जाण उदाहरणासहित स्पष्ट करा.

**IV. उपक्रम :**

1. तुम्ही आतापर्यंत भाऊ-बहिण, म्हणून बजावलेल्या भूमिकेवर एक निबंध लिहा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

***

प्रकरण - 25

# समाजाचे प्रकार

A6Q9Z2

***या पाठाच्या अभ्यासाने तुम्ही पुढील गोष्टी शिकाल.***

- *वेगवेगळ्या समाजातील प्रकार जाणून घेणे.*
- *विविध सामाजिक प्रकारांची वैशिष्ट्ये जाणून घेणे.*

आपल्याला सर्वत्र एकाच प्रकारचा समाज दिसून येत नाही. जीवन पद्धती आणि संस्कृती यांसारखे घटक रुढी आणि परंपरा, व्यवसाय इत्यादी प्रत्येक प्रदेशानुसार बदलतात. पशुपालक समुदायातील लोक अजूनही शिकारीचे जीवन आणि कंदमुळे गोळा करताना पाहू शकता. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात गेल्यावर शेकडो मेंढ्या, गुरेढोरे आणि इतर पाळीव प्राणी तसेच शेतीचे लांबलचक पट्टे पाहतो. काही ठिकाणी घराचा समूह तर काही ठिकाणी अलिप्त घरे, नांगर वाहून नेणारे शेतकरी, विहिरीवर पाणी भरणाऱ्या स्त्रीया असे चित्र दिसते.

तसेच बेंगळूरू, हुब्बळी, मुंबई, दिल्ली यासारख्या शहरामध्ये रहदारी, गर्दीचा गोंगाट विस्तिर्ण जागा आणि झोपड्या पहायला मिळतात. आपण विभिन्न पोषाखातील लोक, धूर सोडणारे कारखाने, उंच इमारती विद्यापीठे आणि मोठमोठी रूग्णालये शहरात पाहतो.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

सर्वत्र सारखाच समाज नसतो. तर तो वेगवेगळ्या प्रकारचा असतो. म्हणूनच आपण समाजाचे वर्गीकरण अनेक प्रकारात करतो. ते खालील प्रमाणे.

1. शिकार आणि अन्न गोळाकरणारा समाज
2. पशुपालन समाज
3. शेतकरी समाज
4. कामगार समाज

**1. शिकार आणि अन्न गोळा करणारा समाज :**

हा मानवी समाजातील सर्वात जुना आणि साधा समाज आहे. हा समाज खुपच लहान, कमीत कमी लोकांचा समावेश असलेला आणि भटके जीवन जगणारा समाज आहे. ते दगडापासून बनविलेली कुऱ्हाड, भाले आणि चाकू इ. शस्त्रे वापरतात. हे लोक त्यांच्या अस्तित्वासाठी जंगली प्राण्यांची शिकार करतात. या शिवाय रानात उपलब्ध असलेली फळे, बी. बियाने, मुळे, कंदमुळे आणि भाजीपाला गोळा करतात. संपत्ती मिळविण्याकडे त्यांचा कल नसतो. आपापसात वाटून खाणे ही त्यांची जीवनपद्धती आहे.

**या समाजाची वैशिष्ट्ये :**

1. या समाजात अत्यंत लहान आणि विखुरलेले मानवी गट आहेत. यातील एकूण सदस्य संख्या 49-50 पेक्षा जास्त राहू शक्त नाही.
2. हा समाज अन्नाच्या शोधात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सतत फिरत असल्याने एका भागातील अन्न दुसऱ्या भागाला घेऊन जातात.
3. येथे संपत्ती जमा करण्याची इच्छा राहत नाही. संपत्तीची कल्पना या समाजात आढळत नाही. ते उपलब्ध अन्न इतरासोबत वाटून घेतात.
4. संपूर्ण समाज नातेसंबंधानी जोडला आहे. वैयक्तिक जीवनाला वाव नाही. कुटुंब आणि नाते संबंध परस्परांशी जोडली आहेत.
5. इथे राजकीय संस्था नसल्यामुळे राज्यकर्ते व राज्यकर्त्यांचा वर्ग नाही.

**2. पशुपालन करणारा समाज :**

हा समाज स्वतःचा चरितार्थ चालविण्यासाठी गुरांचे कळप राखतो. आपल्या गरजा भागविण्याकरीता गुरे चारणे, शिकार करणे, अन्न गोळा करणे आणि ठराविक धान्यासाठी शेती हे व्यवसाय तो करतो. आफ्रिका आणि मध्य आशियाच्या काहि भागामध्ये पशूपालन समाज अजूनही अस्तित्वात आहेत.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**या समाजाची वैशिष्ट्ये :**

1. हा समाज आकाराने मोठा आहे. आणि काही वेळा शेकडो आणि हजारो लोकांचा समावेश होता. उदा. आजही भक्तीयारी जमाती मध्ये 5000 ते 150,000 (दिड लाख) लोकांचा समावेश असतो.
2. हा समाज बहुदा गवताळ कुरणे, डोंगराळ प्रदेश, वाळवंटे आणि शेतीला अयोग्य असलेल्या प्रदेशात दिसतो. पशुपालन करण्यासाठी हा प्रदेश सोयीचा आहे. म्हणूनच पशुपालन हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे.
3. या समाजात ज्याच्याकडे जास्त गुरेढोरे आहेत तो इतरापेक्षा जास्त प्रभावशाली असा त्यांच्या समाजाचा रिवाज आहे. तो श्रीमंत आणि समूदायाचा प्रमुख मानला जातो.

## 3. शेतकरी समाज :

शेतकरी समाज उपजिविकेसाठी खुप मोठ्या जमिनीवर मशागत करणारा हा समाज आहे. जमिन नांगरण्यासाठी लोक प्राण्यांचा वापर करतात.

**या समाजाची वैशिष्ट्ये :**

1. तीन हजार (3000) वर्षापूर्वी नांगराच्या शोधामुळे शेतीव्यवसायात क्रांती झाली. त्यामुळे अन्नधान्याचे उत्पादनही वाढले शेती नांगरण्यासाठी जनावरांचा उपयोग केल्यामुळे धान्योत्पादन वाढले.
2. शेती करणे हा या समाजातील मुख्य व्यवसाय आहे. त्यामुळे लोक त्याच ठिकाणी कायमस्वरूपी वसाहतीतून गावे आकाराला आली.
3. जसे शेतात धान्योत्पादन वाढले तसे प्रत्येकाची दिवसभर राबण्याची आवश्यकता कमी झाली. त्यामुळे बुहुसंख्य लोक इतर कामात गुंतले. याचा परिणाम असा झाला की, शहरे विकसित झाली. त्यांची लोकसंख्या ही लक्षणीय वाढली.

## 4. कामगार समाज :

कारखान्यात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने वस्तुंची निर्मिती होऊ लागली. या निर्मितीच्या प्रक्रीयेमध्ये गुंतलेला हा समाज कामगारवर्ग होय.

**या समाजाची वैशिष्ट्ये :**

1. नवीन संशोधनामुळे समाज परिवर्तन झाले. वाफेचे इंजिन, आंतर ज्वाला ग्रही इंजिन, विद्युतशक्ती, अणूभट्टी आणि इतर गोष्टीमुळे व्यापक स्वरूपात सामाजिक तसेच आर्थिक परिवर्तन झाले आणि होत आहे.
2. रोजगार शोधण्यासाठी आणि औद्योगिकरणामुळे लोक शहरात स्थलांतर करू लागले. त्यामुळे शहरात लोकसंख्या वाढू लागली.
3. कारखाने चालविण्या करिता वेगवेगळ्या कामगार वर्गाची गरज भासू लागली. कामगारांच्या कौशल्यावर आधारित श्रमाची आणि कार्यपद्धतीची विभागणी झाली. या औद्यागिक समाजातील सर्वच क्षेत्रात श्रम विभागणी पहायला मिळते.
4. एका दृष्टीकोनातून हे मानवी समाज्याच्या उत्क्रांतीचे टप्पे आहेत असे वर्गीकरण देणे शक्य आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागा योग्य शब्दानी भरा :**

1. शिकारी समाजातील लोक ________ ही शस्त्रे वापरतात.
2. शेतकरी समाज शेतीच्या मशागतीकरीता ________ चा वापर करतात.
3. कार्यकुशलतेवर आधारित असलेल्या कार्यपद्धतीला ________ असे म्हणतात.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे द्या :**

4. पशुपालन समाज म्हणजे काय ?
5. शेतकरी समाज म्हणजे काय?
6. कामगार समाज म्हणजे काय?
7. समाजाचे प्रकार कोणते ?

**III. खालील प्रश्नांची उत्तरे चार ते पाच वाक्यात लिहा :**

8. शिकार आणि अन्न गोळा करणाऱ्या लोकांच्या जीवन पध्दतीचे वर्णन करा.
9. पशुपालन करणाऱ्या समाजाची वैशिष्ट्ये लिहा.
10. शेतकरी समाजाचे वैशिष्ट्ये सांगा.
11. कामगार समाजाचे वैशिष्ट्ये वर्णन करा.

**IV. उपक्रम :**

1. शहरी व ग्रामीण जीवनशैली मधील फरक तुमच्या शिक्षकांच्या मदतीने जाणून घ्या.
2. आदर्श समाज कसा असावा यांची समूहाने चर्चा करा.

***

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# भूगोलशास्त्र

## प्रकरण - 26

# जलावरण

Q7G4S7

**प्रस्तुत प्रकरणात खालील मुद्दे अभ्यासणार आहोत.**

- *विविध प्रकारच्या जलसाठ्यांची ओळख.*
- *सागरतळाची रचना समजून घेणे.*
- *सागरी प्रवाह व त्याचे प्रकार आणि महासागरांचे संरक्षण.*
- *भारताच्या नकाशात महासागर, समुद्र, आखात, खाडी आणि सामुद्रधुनी यांची ओळख करून देणे.*

**पाणी :** सागरी जीवांचे स्त्रोत आणि सामुद्रिक हवामान.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**पाण्याची विभागणी :**

पृथ्वीला 'नीलग्रह' आणि 'जलग्रह' असेही म्हणतात. कारण पृथ्वीच्या क्षेत्रफळापैकी 70.78% भाग किंवा 361 दशलक्ष चौरस कि.मी. भाग जलाशयांनी व्यापलेला आहे. यालाच जलावरण म्हणतात. जगातील प्रमुख जलाशयाचे साठे म्हणजे पॅसिफिक महासागर, अटलांटिक महासागर, हिन्दू महासागर आणि आर्क्टिक महासागर.




**महासागर (Oceans):** खंडांच्यामध्ये विभागलेला खोल आणि विशाल क्षारयुक्त पाण्याचा साठा म्हणजे महासागर. उदा. भारताच्या दक्षिणेकडील हिंदू महासागर.

**समुद्र (Sea) :** हे महासागराचेच भाग असून ते भूखंडाच्या खूप आतपर्यंत पसरलेले असतात. महासागराच्या तुलनेत हे विस्ताराने खूप लहान असतात. उदा. अरबी समुद्र, कॅस्पियन समुद्र, तांबडा समुद्र वगैरे.

**आखात (Gulf)** : हा महासागर किंवा समुद्राचाच भाग असून तो जमिनीच्या आतमध्ये शिरलेला असतो. हे समुद्रापेक्षाही लहान असतात. प्रत्येक आखाताचा विस्तार, आकार आणि खोली यात परस्पर भिन्नता असते. उदा. मन्नारचे आखात, पर्शियाचे आखात, मेक्सिकोचे आखात इत्यादी.

**खाडी (Bay)** : अंशतः जमिनीने वेढलेला अर्धवर्तुळाकार लहान जलाशय म्हणजे खाडी. प्रत्येक खाडीचा विस्तार, खोली व आकार यात तफावत दिसून येते. उदा. बंगालची खाडी, बिस्कोची खाडी, फंडीची खाडी, हडसन खाडी इत्यादी.

**सामुद्रधुनी (Strait)** : दोन महासागरांना किंवा समुद्रांना जोडणारा अरुंद किंवा चिंचोळा सागरी जलाचा पट्टा म्हणजे समुद्रधुनी, उदा. पाल्कची समुद्रधुनी, जिब्राल्टरची समुद्रधुनी, बेरिंगची समुद्रधुनी.

**संयोगभूमी (Isthmus)** : याला 'भूकंठ' असे सुद्धा म्हणतात. हे सामुद्रधुनीच्या वर्णनाच्या विरुद्ध असते. यामध्ये एक अरुंद जमिनीचा पसरलेला तुकडा दोन मोठ्या भूखंडांना जोडतो. महासागरी कालवे बांधण्यासाठी संयोगभूमी हे अत्यंत महत्त्वाचे ठिकाण आहे. उदा - आशिया आणि आफ्रिका खंडांना जोडणारा सुवेझ कालवा आणि दक्षिण व उत्तर अमेरिका खंडांना जोडणारा पनामा कालवा.

**सागरतळ रचना (Relief of the Ocean Floor) :**




**महासागरचा तळ**

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

पृथ्वीच्या पृष्ठ भागावरील वेगवेगळ्या प्रकारच्या भूस्वरूपाप्रमाणेच महासागर किंवा समुद्राच्या तळाशी सुद्धा पुष्कळ भूस्वरूपे आढळतात. महासागराचे महत्त्व समजून घेण्यासाठी महासागराच्या तळाशी असणारी भू-स्वरूपे अत्यंत महत्त्वाची आहेत. भूस्वरूपाच्या गुणवैशिष्ट्यांच्या आधारे महासागराचा तळ चार प्रमुख विभागात विभागण्यात येतो. भूखंड मंच (समुद्रबुड जमीन), भूखंड उतारा, सागरी मैदान (अगाध मैदान) सागरी डोह (गर्ता)

**1) भूखंडमंच (समुद्रबुड जमीन) (Continental Shelf)** : हे समुद्र किनाऱ्यालगतचे उथळ क्षेत्र असून हा भाग एका बाजूला सागरी किनारा आणि दुसऱ्या बाजूला खंडीय उताराचा भाग असतो. भूखंड मंचाची सरासरी खोली 100 फॅदम (1 फॅदम = 6 फूट) इतकी असते. या विभागात समुद्राची खोली हळूहळू वाढत जाते. भूखंड मंच हा मासेमारी, जलचर, नौकायाना आणि कच्च्यातेलाचे उत्पादन यासाठी खूप महत्त्वाचा आहे.

**2) भूखंड उतार (Continental Slope)** : हा महासागराच्या तळाचा दुसरा भाग आहे. हा अत्यंत तीव्र उताराचा भाग असून भूखंड मंच आणि खोल सागरी मैदान यांना जोडणारा भाग आहे. या विभागात सागरी घळई (दऱ्या) मोठ्या प्रमाणात दिसून येतात.

**3) खोल सागरी मैदान (Deep Sea Plain)** :हे समुद्राच्या तळाशी असणारे विस्तीर्ण मैदान आहे. यालाच खोल सागरी मैदान किंवा 'ॲबिसल मैदान' (अगाध मैदान) म्हणतात. सागर तळाच्या भूस्वरूपाचे विस्तारलेले मोठे क्षेत्र आहे. या मैदानाचा आकार ओबड धोबड रचनांचा छोट्या चढ-उतारांचा व टेकड्यांनी व्यापलेला असतो. या भागात सागरी पर्वत. गाईऑट (Guyots) (सपाट माथ्याचा सागरी पर्वत) दिसून येतात.

**4) सागरी डोह (Ocean Deep and Trenches)** : सागर डोहांना 'सागरी गर्ता' असेही म्हणतात. महासागराच्या तळाच्या पृष्ठभागावर असणारा हा सर्वात खोल भाग आहे. उदा. पॅसिफिक महासागरातील चॅलेंजर डोहातील मरियाना गर्ता हा 10,929 मीटर खोल आहे. हा जगातील सर्वात खोल असलेला सागरी गर्ता आहे. टोंगा गर्ता, कुरेल गर्ता इतर काही सागरी डोह आहेत.

**सागरी जलाचे तापमान आणि क्षारता (Temperature and Salinity of Ocean Water)**

**तापमान :** समुद्र किंवा महासागराच्या पाण्याचे तापमान विविध अक्षांश आणि महासागराच्या खोलीनुसार भिन्न भिन्न असते. विषुववृत्ताजवळील महासागराच्या पाण्याचे

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

तापमान अर्क्टिक आणि अंटार्टिक वृताजवळील तापमानापेक्षा अधिक असते. अशाच प्रकारे महासागराच्या पाण्यामध्ये अतिखोलवर गेल्यास तापमान कमी होते. याचे कारण म्हणजे सूर्यकिरण महासागरातील पाण्यात फक्त 200 मीटर खोलीपर्यंतच पोहचू शकतात. या भागामध्येच विविधप्रकारच्या वनस्पती. प्राणीजीव दिसून येतात.

**क्षारता (लवणता) :** महासागर किंवा समुद्राच्या पाण्यात विरघळलेल्या क्षारांच्या प्रमाणास क्षारता किंवा लवणता म्हणतात. पाण्यामध्ये क्षारतेचे प्रमाण जास्त असल्यामुळेच महासागर किंवा समुद्राचे पाणी खारट असते. महासागरातील क्षारतेचे प्रमाण 35/$^{000}$ PPT (1000 ग्रॅम मध्ये 35 ग्रॅम) असे सांगतात. महासागराच्या पाण्याचे बाष्पीभवन होते. त्यामुळे क्षार तेथेच राहतात म्हणूनच ते पाणी कायमचे खारट बनते. उष्णकटिबंधाजवळ क्षारतेचे प्रमाण सर्वाधिक असते तर ध्रुव प्रदेशाजवळ ते अत्यंत कमी असते. विषुववृत्तीय प्रदेशात अधिक बाष्पीभवन आणि पाऊस यामुळे क्षारतेचे प्रमाण सामान्य असते.

***समुद्राचे पाणी खारट का असते?***

*भूप्रदेशावरून वाहत येणारे पाणी (नदी) महासागर किंवा समुद्राला मिळते तेंव्हा. अनेक प्रकारचे क्षार द्रावण रूपात येतात आणि समुद्रात साठले जातात. महासागर व समुद्रातील पाण्याचे बाष्पीभवन होऊन निघून जाते. पण त्यातील क्षार मात्र समुद्रातच साठत राहतात. ही प्रक्रिया कोट्यावधी वर्षापासून चालू आहे. अशा तऱ्हेने महासागर आणि समुद्रात क्षारांशाचा संग्रह होऊन समुद्राचे पाणी खारट बनले आहे.*

***जगातील अत्याधिक क्षारयुक्त जलाशय***

1) *व्हेन सरोवर (तुर्की) -330/$^{000}$ PPT*
2) *मृत समुद्र (इस्राईल व जॉर्डन मधील) -300/$^{000}$ PPT*
3) *सांभर सरोवर (भारत)-265/$^{000}$ PPT*
4) *तांबडा समुद्र (आशिया व आफ्रिका)-240/$^{000}$ PPT*

**सागरी प्रवाह (Ocean Currents):**

महासागरातील पाण्याची हालचाल मुख्य तीन प्रकारामुळे होत असते. ते प्रकार म्हणजे लाटा, समुद्र प्रवाह आणि भरती ओहोटी, समुद्राचे पाणी समुद्राच्या पृष्ठ भागावरून ठराविक दिशेने सतत वाहत असते त्याला 'सागरी प्रवाह' असे म्हणतात. सागरी प्रवाहाचे दोन प्रकार आहेत.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**उष्ण सागरी प्रवाह :** हे विषुववृत्तीय प्रदेशात उगम पावून ध्रुव प्रदेशाकडे वाहतात.

**शीत सागरी प्रवाह :** शीतकटिबंधाकडून विषुववृत्तीय प्रदेशाकडे वाहतात. सागरी प्रवाहावर परिणाम करणारे घटक म्हणजे पृथ्वीची दैनंदिनगती (पृथ्वीचे परिवलन), तापमान, वारे, क्षारता आणि भूप्रदेशाचा आकार इत्यादी.

### पॅसिफिक महासागरातील प्रवाह

**उत्तर पॅसिफिक महासागरातील प्रवाह**

| **उष्ण प्रवाह** | **शीत प्रवाह** |
|---|---|
| उत्तर विषुववृतीय प्रवाह | ओयाशिवो प्रवाह |
| क्युरोशिवो प्रवाह | कॅलिफोर्निया प्रवाह |

**दक्षिण पॅसिफिक सागरी प्रवाह**

| **उष्ण प्रवाह** | **शीत प्रवाह** |
|---|---|
| दक्षिण विषुववृत्तीय प्रवाह | पेरू किंवा हंबोल्ट |
| पूर्व ऑस्ट्रेलियन प्रवाह | पश्चिम वाऱ्यांचा प्रवाह |

### अट्लांटिक महासागरातील प्रवाह

**उत्तर अटलांटिक सागरी प्रवाह**

| **उष्ण प्रवाह** | **शीत प्रवाह** |
|---|---|
| उत्तर विषुववृत्तीय प्रवाह | लॅब्रेडोर प्रवाह |
| गल्फ स्ट्रीम उष्ण आखात प्रवाह | नॉर्वेजियन प्रवाह |
| उत्तर अटलांटिक प्रवाह | कॅनरी प्रवाह |

**दक्षिण अटलांटिक सागरी प्रवाह**

| **उष्ण प्रवाह** | **शीत प्रवाह** |
|---|---|
| दक्षिण विषुववृत्तीय प्रवाह | बेंग्वुला प्रवाह |
| ब्राझीलचा प्रवाह | फॉकलंड प्रवाह |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**हिंदू महासागरातील प्रवाह :** उत्तर हिंदू महासागरातील प्रवाह ऋतुमानानुसार आपली दिशा बदलतात. हा बदल मान्सून वाऱ्यांच्या दिशानुसार असतो. उन्हाळ्यामध्ये हे नैर्ऋत्येकडून ईशान्येकडे आणि हिवाळ्यात ईशान्येकडून नैर्ऋत्येकडे वाहतात.

**हिंदू महासागरातील मुख्य प्रवाह :** मोझांबिक प्रवाह, मादागास्कार प्रवाह, अगुल्हास प्रवाह हे उष्ण प्रवाह व पश्चिम ऑस्ट्रेलियन प्रवाह हा शीत प्रवाह इत्यादी.




जगातील प्रमुख महासागरी प्रवाह

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

***तुम्हाला माहिती आहे का ?***

***प्रमुख मासेमारीसाठीचे प्रदेश***

1) ***होन्शू हौकैडो मासेमारी प्रदेश -*** *क्युरोसिवो उष्ण प्रवाह आणि ओयाशिवोचा शीत प्रवाह एकत्र येण्याचे ठिकाण (जपान)*

2) ***भव्यकिनारा (Grand Bank)*** *गल्फ स्ट्रीमचा उष्णप्रवाह आणि लॅब्रॅडोरचा शीतप्रवाह एकत्र येण्याचे ठिकाण (न्यू फौंडलंड USA)*

3) ***डॉगर किनारा -*** *अटलांटिक महासागर (उत्तर समुद्र युरोप)*

**भरती - ओहोटी :** समुद्राच्या पाण्याच्या पातळीत नियमितपणे होणारी चढ-उतार म्हणजेच भरती-ओहोटी होय. भरती ओहोटीची मुख्य कारणे म्हणजे चंद्राची गुरुत्वाकर्षण शक्ती, सूर्याची गुरुत्वाकर्षण शक्ती आणि पृथ्वीची केंद्रोत्सरी प्रेरणा (centrifugal force)

**भरती-ओहोटीचे प्रकार :** भरती-ओहोटीचे प्रमुख दोन प्रकार आहेत.

**1) मोठी भरती (High tide) :** महासागर किंवा समुद्राचे पाणी दर 12 तास 26 मिनिटांनी किनाऱ्याच्या दिशेने चढते किंवा कमाल उंची गाठते यालाच मोठी भरती किंवा प्रवाहाची भरती म्हणतात.

**2) ओहोटी (Low tide) :** दर 12 तास 26 मिनिटांनी भरतीच्या प्रमाणाइतकीच पाण्याची पातळी खाली उतरते म्हणजेच सागराचे पाणी किनाऱ्यापासून दूर जाताना दिसते यालाच ओहोटी (ebb tide) म्हणतात. भरती व ओहोटी या एकामागून एक अशा सुमारे 6 तासांनी दिसून येतात. पहिली मोठी भरती असेल तर नंतरची कमी भरती किंवा ओहोटी असते. त्याच्या नंतरची पुन्हा मोठी भरती. अशी ही प्रक्रिया पुढे चालूच राहते.

**सूर्य आणि चंद्र यांच्या स्थितीच्या आधारे भरती-ओहोटीचे दोन प्रकार :**

**उधाणाची भरती (Spring Tide) :** जेव्हा पृथ्वी, चंद्र आणि सूर्य हे एकाच सरळ रेषेमध्ये येतात तेव्हा ही भरती येते. उदा. अमावस्या, पौर्णिमा, सूर्यग्रहण, चंद्रग्रहण. या दिवशी उधाणाची भरती येते. तसेच पृथ्वीच्या एकाच बाजूला चंद्र व सूर्य यांच्या एकत्रित प्रभावी गुरुत्वाकर्षन शक्तीमुळे उधाणाची मोठी भरती प्रमाणेच ओहोटीचे प्रमाण सुद्धा सर्वात जास्त असते.

**भांग भरती (Neap Tide) :** उधाण भरतीच्या नंतर पंधरा दिवसांनी चंद्र व सूर्य यांनी पृथ्वीशी काटकोन केलेला असतो. यामुळे सूर्य व चंद्र यांच्या गुरुत्वाकर्षण शक्तित समतोल राहून भरतीचे प्रमाण अत्यंत कमी असते. याला भांग भरती म्हणतात. यामध्ये ओहोटीचे प्रमाण सुद्धा कमी असते.




**उधाण भरती व भांग भरती**

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

**भरती-ओहोटी उपयोग :** भरती ओहोटी मनुष्याला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या उपयुक्त होतात. ते म्हणजे 1) यांचा नौकापर्यटनासाठी उपयोग होतो. 2) बंदरे किंवा धक्का निर्मितीसाठी सहाय्य करतात. 3) बंदरांची स्वच्छता आणि गाळ काढण्यास मदत होते. 4) समुद्राजवळील सखल भागात पाणीसाठवून मीठ तयार करण्यास सुलभ होतो. 5) भरती-ओहोटीमुळे पाण्याची नित्य हालचाल होते याचा उपयोग करून वीज निर्मिती सुद्धा करता येते. (लाटांची उर्जा)

**महासागरांचे संरक्षण :** अलिकडील काळात महासागरांचे संरक्षण ही महत्त्वाची बाब बनली आहे. महासागर मानवाला विविध प्रकारे सहाय्यक असून, त्यामध्ये असंख्य प्रकारचे जीवजंतू वनस्पती यांचा अधिवास असतो. महासागर आज प्रदूषणापासून मुक्त राहिले नाहीत. त्यामुळे भविष्यकाळात महासागराचे भवितव्य धोक्यात आहे. म्हणून सागरांचे सरक्षण करणे अत्यावशक बनले आहे. यासाठी सागराचे संरक्षण करण्याच्या उपाययोजना खालील प्रमाणे आहेत.

1. तेलाची वाहतुक जहाजातून न करता नळ मार्गाचा अवलंब करावा.
2. अणु इंधनातील कचरा, टाकावू पदार्थ महासागरात टाकले जाऊ नयेत.
3. किनारपट्टी भागात असणाऱ्या पेट्रो-केमिकल उद्योगानी सांडपाणी महासागरात टाकणे टाळावे.
4. कोणत्याही स्वरूपाच्या टाकाऊ वस्तू बंदर किंवा बंदरांच्या जवळ टाकल्या जातात यावर नियंत्रण आणावे.
5. समुद्र किनाऱ्यालगत लोहखनिज-मॅगनिज यांचे साठे करण्यावर नियंत्रण आणले पाहिजे.
6. किनाऱ्यांचे शोषण नियंत्रित करणे आवश्यक आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. योग्य शब्दासह रिकाम्या जागा भरा :**

1. भूखंडमंचाची सरासरी खोली ________ इतकी आहे.
2. एक फॅदम म्हणजे ________ फूट.
3. जगातील अत्यंत खोल गर्ता ________ हा आहे.

4. महासागरातील क्षारतेचे सरासरी प्रमाण ________ इतके असते.

5. अमावस्या आणि पौर्णिमेच्या दिवसी दिसुन येणारी ________ भरती होय.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे द्या :**

6. 'जलावरण' म्हणजे काय?

7. महासागरी तळाच्या भूस्वरूपाचे चार प्रमुख भाग कोणते?

8. सागरी प्रवाह आणि भरती ओहोटी यातील फरक सांगा.

9. उधानाची भरती आणि भांग भरती यामधील फरक लिहा.

10. महासागराचे संरक्षण आम्ही कसे केले पाहिजे?

**III. जोड्या जुळवा :**

| | अ | ब |
|---|---|---|
| i. | फॅदम | अ. खोल सागरी मैदान |
| ii. | ओयाशिवो | ब. अमेरिकेचा पूर्व किनारा |
| iii. | गल्फ स्ट्रीम | क. शीत प्रवाह |
| iv. | सागरी पर्वत | ड. हिंदू महासागर प्रवाह |
| v. | अगुल्हास प्रवाह | इ. महासागराची खोली मोजणारे साधन |

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**IV. खालील पदांचा अर्थ स्पष्ट करा :**

11. भूखंड उतार (Continental slope)

12. क्षारता

13. उष्ण आणि शीतप्रवाह

14. जास्त भरती आणि कमी भरती

15. बेंग्वुला प्रवाह

16. भरती ओहोटी

**V. लक्षात ठेवण्याचे मुद्दे :**

1. गल्फचा प्रवाह
2. क्षारता
3. उष्ण प्रवाह
4. कुरोसीवो प्रवाह
5. उधाणाची भरती
6. भरती-ओहोटीची शक्ती

**VI. उपक्रम :**

1. ॲटलांटीक महासागरातील उष्ण व शीत प्रवाहांची यादी करा.

***

प्रकरण – 27

# जीवावरण

D4B6V5

**या प्रस्तुत प्रकरणात खालील मुद्दे अभ्यासणार आहोत :**

- *जीवावरणाचा अर्थ आणि महत्व.*
- *पर्यावरणाचा अर्थ, पर्यावरणाचे प्रदूषण, प्रदूषणाचे प्रकार आणि ते रोखण्याचे उपाय.*

*पृथ्वीने आम्हाला काय काय दिले ? त्या बदल्यात आम्ही पृथ्वीला काय देतो ? हे तुम्हाला माहित आहे का ?*

**अर्थ :** आपल्याला माहित आहे की 'आपली पृथ्वी हा एकमेव असा ग्रह आहे जेथे विविध प्रकारचे जीवजंतू आहेत'. जीवावरण हा सजीवांचे अस्तित्व असलेला पृथ्वीचा चौथा घटक आहे.

**जीव परिसर शास्त्र (Ecology) :** जीव परिसर शास्त्र हे जीव आणि त्यांच्यातील भौतिक रासायनिक आणि जैविक अंतरिक सहसंबधाचा अभ्यास करणारी एक विज्ञानाची शाखा आहे. जीव आणि भौतिक परिसर तसेच विविध प्रकारचे प्राणी यांच्यामध्ये योग्य समतोल आहे. यालाच जैविक परिसर समतोल म्हणून ओळखतात.

प्राणी आणि वनस्पती यांच्या सभोवताली असलेले सजीव तसेच निर्जिव यांच्यामधील परस्पर संबंध याला जीव परिसर व्यवस्था असे म्हणतात. म्हणजेच जीव परिस्थितितील समस्त घटक एकमेकाला जुळवून घेतो व याचे विवरण करतो.

जीवावरणामध्ये जीव परिसर व्यवस्था किंवा जीव परिसरात किंवा असमतोल असेल तर, वनस्पती, प्राणी आणि अति सुक्ष्मजीव समुह हे जिवंत रहाणे असाध्य आहे प्रत्येक प्राणी पर्यावरणाशी समतोल साधून जगत असतो.

**पर्यावरण (Environment) :** मानव जिथे राहतो आणि कार्य करतो त्याच्या सभोवतालच्या परिसर वैशिष्ट्यांना 'पर्यावरण' असे म्हणतात. हे सर्व प्रकारच्या सजीवांच्या अस्तित्वासाठी आणि विकासासाठी अनुकूल वातावरण निर्माण करीत असतो.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**पर्यावरण हे दोन प्रकारचे असते :**

1. नैसर्गिक किंवा भौगोलिक

2. सांस्कृतिक किंवा मानव निर्मित

**पर्यावरणाचे प्रदूषण :**

मानवाच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हस्तक्षेपामुळे आपल्या सभोवतालच्या परिसरात पूर्णपणे किंवा अंशतः होणारा प्रतिकूल बदल म्हणजे पर्यावरणाचे प्रदूषण होय. याचा वनस्पती, प्राणी आणि मानव जीवन पद्धतीवर जबरदस्त (हानिकारक) परिणाम झालेला आहे.

प्रदूषण होण्यासाठी कारणीभूत ठरणारे पदार्थ म्हणजे प्रदूषक. प्रदूषक हे नैसर्गिक आणि मानव निर्मित असतात. नैसर्गिक प्रदूषकापेक्षा मानवनिर्मित प्रदूषक हे जास्त भयानक व संकटकारी असतात. हे प्रदूषक दृश्य स्वरूपात असू शकतात. उदाहरणार्थ धूर, वायू, धूळ, उघड्यावर टाकलेले अन्नपदार्थ, मैला वगैरे, तसेच काही प्रदूषक अदृश्य असू शकतात. उदा. सूक्ष्म जीवजंतू, पाणी, अन्नपदार्थ, माती यात मिसळणारी विषारी रसायने वगैरे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्रदूषणाचे प्रकार :**

पर्यावरणाच्या प्रदूषणाचे विविध प्रकार आहेत. प्रदूषक आणि प्रदूषणाचे माध्यम यांच्या आधारे त्यांचे पुढील प्रकार केले जाऊ शकतात. ते म्हणजे 1. वायू प्रदूषण, 2. जलप्रदूषण, 3. मृदा प्रदूषण, 4. ध्वनी प्रदूषण.

**1) वायू प्रदूषण :** जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) : वायूप्रदूषणाची पुढील प्रमाणे व्याख्या केली आहे. ''मानवाच्या सामूहिक उद्योगातून त्यांने हवेमध्ये सोडलेल्या पदार्थांमुळे त्याच्या आरोग्यावर तसेच वनस्पतीवर आणि इतर मालमत्तेवर होणारा अपायकारक परिणाम म्हणजे वायू प्रदूषण होय.'' वायू प्रदूषणाचे महत्त्वाचे स्त्रोत म्हणजे

**1. नैसर्गिक प्रदूषण :** ज्वालामुखीचा उद्रेक, अरण्यातील वणवा व प्रचंड धूळ वगैरे.

**2. मनुष्यनिर्मित प्रदूषण :** मानव निर्मित कारखान्यातून, घरगुती वापरातून, वाहनातून, खाणीतून तसेच अणू ऊर्जा केंद्रातून अण्वस्त्र चाचणीतून बाहेर पडणारे विषारी वायू म्हणजेच मानव निर्मित प्रदूषण होय.

**महत्त्वाचे वायू प्रदूषक :** म्हणजे कार्बनडाय ऑक्साईड, कार्बन मोनॉक्साइड, सल्फर डाय ऑक्साइड, नैट्रोजन ऑक्साईड, क्लोरो फ्लुरो कार्बन्स (CFC) हैड्रोकार्बन्स वगैरे याचे होणारे महत्त्वाचे परिणाम म्हणजे हवा आणि हवामानातील बदल. ओझोनचा थर पातळ होणे, हरित गृह परिणाम, वैश्विक तापमान वाढ, मानवी आरोग्यावर परिणाम, श्वसन संस्थेचे विकार, वनस्पती व प्राणी जीवनावर परिणाम.

**वायू प्रदूषण रोखण्यासाठी उपाय :** वायू प्रदूषण रोखण्यासाठी उपाय म्हणजे वायू प्रदूषकांवर नियंत्रण, वाहनातून बाहेर पडणाऱ्या उत्सर्जकवायूंवर नियंत्रण, जादा वृक्षांची लागवड, अपारंपरिक ऊर्जा साधनांचा वापर, लोक जागृतीचे कार्यक्रम आखणे, कायदेशीर नियंत्रण आणणे, साक्षरतेचा प्रसार व शिक्षण वगैरे.

**2) जल प्रदूषण :** ज्यामुळे मानव आणि जलचर यांच्यावर हानिकारक परिणाम होऊ शकतात असे पाण्याच्या लक्षणात होणारे भौतिक रासायनिक आणि जैविक बदल म्हणजे जलप्रदूषण होय.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

जलप्रदूषणाचे मुलभूत स्त्रोत म्हणजे -

**नैसर्गिक :** भूमीची होणारी झीज, डोंगर उतारावरून वाहणारी माती, दगड, यांची धूप, ज्वालामुखींचा उद्रेक, वनस्पती आणि प्राण्यांचे कुजणे व त्यांचे विघटन होणे.

**मानव निर्मित :** कारखान्यातून बाहेर पडणारी अशुद्ध रासायनिक द्रव्ये, शहरातील केरकचरा, घरगुती कचरा, शेतीतून निघणारे टाकावू पदार्थ, (खते, कीटकनाशके) उष्ण टाकावू पदार्थ, तेलवाहू जहाज व समुद्रातील तेलविहिरीतून होणारी तेलगळती, अणवस्त्र चाचणीतील टाकावू पदार्थ इ. ऊर्जानिर्मिती स्त्रोत.

**जलप्रदूषणाचे विविध प्रकार :** सागरी किंवा महासागर जलप्रदूषण, भूजलप्रदूषण, नद्यांमधील जलप्रदूषण, तलावातील जलप्रदूषण वगैरे.

**जलप्रदूषणाचे प्रमुख परिणाम :** पाण्यामुळे निर्माण होणारे आणि फैलावणारे रोग म्हणजे कॉलरा, टायफाईड, अतिसार, कावीळ वगैरे, जलचर प्राण्यांचा मृत्यू, कालव्यातून होणाऱ्या पाणी पुरवठ्यावर व शेतीतील पिकांवर होणारा परिणाम, निसर्ग आणि पाण्याच्या स्वरूपावर होणारा परिणाम वगैरे.

**जलप्रदूषण रोखण्यासाठी उपाय :** कारखान्यातून बाहेर पडणारी अशुद्ध रासायनिक द्रव्ये पाण्यात मिसळणार नाहीत याची काळजी घेणे, पिण्याच्या पाण्याची स्वच्छता राखणे, मैला, सांडपाणी वाहून नेणाऱ्या पाईपलाईन नदीत मिसळणार नाही तसेच टाकावू पदार्थ, केरकचरा, जलाशयात मिसळण्यावर नियंत्रण आणले पाहिजे.

**3) मृदा प्रदूषण :** मानवी स्त्रोतांमुळे किंवा नैसर्गिक स्त्रोतांमुळे किंवा दोन्ही घटकांमुळे मृदेचा दर्जा घसरतो यालाच मृदा प्रदूषण म्हणतात. याचा परिणाम म्हणजे मृदेची झीज वाढते, कस कमी होतो, मातीतील सूक्ष्म जीवजंतू व रोपातील हरित द्रव्य कमी होते. मृदेच्या प्रदूषणाचे प्रमुख स्त्रोत म्हणजे कारखाने आणि खाणकामातून टाकलेले निरुपयोगी पदार्थ, घरगुती व शहरातील केरकचरा, शेतीतून टाकलेला कचरा, अणुचाचणीतून बाहेर टाकलेले पदार्थ वगैरे.

**मृदा प्रदूषणाचे परिणाम म्हणजे :** मातीची सुपीकता कमी होते, एखाद्या प्रदेशाचे ओसाड जमिनीत रूपांतर होत, मातीतील सूक्ष्म जीवजंतू नष्ट होतात.

**मृदा प्रदूषण रोखण्यास उपाय :**

1) रासायनिक खते व कीटकनाशके यांचा समंजसपणाने व नियंत्रित वापर करावा. 2) औद्योगिक आणि शहरातील कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावावी, 3) जमिनीचा योग्य प्रकारे वापर आणि पिक व्यवस्थापन करावे, 4) जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करावे, 5) मातीचा योग्य प्रकारे उपयोग करून निगा राखावी.

**4) ध्वनी प्रदूषण :**

वातावरणामध्ये फेकलेला आणि मानवी आरोग्याला हानिकारक असणारा कोणताही अनिष्ट ध्वनी म्हणजे ध्वनी प्रदूषण होय. ध्वनीप्रदूषणाचे प्रमुख स्त्रोत खालील प्रमाणे.

**नैसर्गिक स्त्रोत :** ढगांचा गडगडाट, चक्रीवादळे, अतिवृष्टी, मोठ्या आवाजाची वादळे, विजांचा कडकडाट, धबधबे, सागरी लाटांचा आवाज वगैरे.

**मानव निर्मित स्त्रोत :** कारखाण्यातील यंत्रांचा आवाज, वाहनांचे कर्कशहॉर्न, विमानांचा आवाज, खाणकाम, घरातील टी.व्ही. लाऊडस्पीकर यांचे आवाज, डॉल्बी सिस्टीम वगैरे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**ध्वनीप्रदूषणाचे परिणाम :** ध्वनीप्रदूषणाचे परिणाम म्हणजे तात्पुरते किंवा कायमचे कर्ण बधिरत्व, डोकेदुखी, अस्वस्थता, मानसिक असंतुलन, वर्तणुकीत बदल, एकाग्रतेचा अभाव, हृदय व मज्ज्ञासंस्थेचे विकार वगैरे.

ध्वनी प्रदूषण रोखण्यास उपाय : मोठे उद्योगधंदे मानववस्तीपासून दूर असावेत. कारखान्यांमध्ये आवाजाला अभेद्य भिंती बांधाव्यात. अनावश्यक भोगे, हॉर्नचा आवाज, लाऊडस्पीकर यावर बंदी घालावी. मानवी वस्तीपासून विमानतळ दूर असावेत. कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांना कर्ण संरक्षक उपकरणे पुरवावीत. कर्कश आवाज करणाऱ्या वाहनांची तपासणी केलीच पाहिजे वगैरे.

**जागतिक तापमान वाढ (Global Warming) :**

पृथ्वीचे तापमान दिवसेंदिवस हळूहळू वाढत आहे. अलिकडील काही वर्षात वातावरणातील तापमान मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यालाच 'जागतिक तापमान वाढ' (Global Warming) असे म्हणतात. वातावरणातील तापमान वाढीचे कारण म्हणजे हरितगृह परिणाम आणि वातावरणाने धरून ठेवलेली उष्णता. त्यामुळेच वातावरणातील थरांमध्ये बदल होत आहेत. जग तापत आहे, तसेच हिमनद्यावितळत आहेत आणि समुद्राच्या पाण्याची पातळी सुद्धा वाढत आहे. उदा. हिमालय, अंटार्टिका, आर्क्टिक प्रदेशामधील मोठ्या प्रमाणात बर्फाचे वितळणे.

**हरित गृह परिणाम (Green House Effect) :**

पृथ्वीला सूर्यापासून मिळणारी उर्जा ही सूर्यकिरणांच्या रूपात मिळते. त्याचप्रमाणे पृथ्वीच्या पृष्ठभागापासूनही उर्जा बाहेर पडते. या क्रियेमुळेच जमिनीला मिळणाऱ्या आणि जमिनीतून बाहेर पडणाऱ्या शक्तिमध्ये संतुलन असते. अलिकडे जीवाश्म इंधनाच्या वापरामुळे हरितगृह वायू बाहेर पडण्याचे प्रमाण सतत वाढत आहे. कार्बनडाय ऑक्साईड आणि इतर हरित गृह वायू भूमीपासून बाहेर पडणारी उष्णता शोषून घेतात व साठवून ठेवतात. त्यामुळे वातावरणातील तापमानाचे प्रमाण अधिक वाढले. यालाच 'हरित गृह परिणाम' असे म्हणतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**ओझोनचा थर पातळ होणे (Ozone depletion) :**

वातावरणातील स्थितांबरामध्ये पातळ असलेला ओझोनवायूचा थर आहे. हा थर सूर्यापासून येणाऱ्या व अत्यंत अपायकारक असलेल्या अल्ट्रा व्हायोलेट (U.V.) किरणांना शोषून घेऊन पृथ्वीवरील सर्वप्रकारच्या सजीवांचे रक्षण करत आहे. अलिकडील कांही वर्षात हवानियंत्रक (एअरकंडिशनर) रेफ्रिजरेटर, स्प्रे आणि डिओड्रंट इत्यांदिच्या अतिवापरामुळे क्लोरोफ्लुरो कार्बन (CFC) बाहेर पडून वातावरणातील ओझोन थराचा नाश करत आहे. नुकताच अंटार्टिका जवळील वातावरणातील ओझोन थराचा नाश झाल्याचा शोध लागला आहे. ओझोनला छिद्र पडण्याचे थांबले तरच पुढील पिढी पृथ्वीवर आरामात राहू शकेल.

**आम्लीय पाऊस (Acid rain) :** पावसाच्या पाण्यामध्ये सल्फ्युरिक आम्ल आणि कार्बन मोनॉक्साईड वगैरे आम्लांचे प्रमाण जास्त असल्यास त्यांना 'आम्लीय पाऊस' म्हणतात. या प्रकारचा पाऊस अत्यंत विषारी असून तो जलचरांच्या नाशाला कारणीभूत होतो. शिवाय आम्लीय पावसामुळे अरण्ये, शेतीतील पिके, इमारती, ऐतिहासिक स्मारके वगैरेंचाही नाश होतो.

ॲसिड पावसाला 'लेक किलर' (Lake Killer) म्हणतात. युरोप पोलंड, झेक गणराज्य आणि जर्मनीचा आग्नेय भागला 'काळा त्रिकोण' (Black Triangle) म्हणून ओळकले जाते. कारण ते जगातील आम्लीय पावसाचा प्रतिकूल परिणाम झालेले प्रदेश आहेत.

**जैव - विविधता (Bio-diversity) :**

एकाच भूप्रदेशात दिसून येणाऱ्या सर्व प्रकारच्या वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजातींना 'जैव-विविधता' असे म्हणतात. एकाच प्रदेशात वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पती व प्राणी प्रजाती यांचे वर्गीकरण हे समृद्ध जैव-विविधता दर्शविते. जैव विविधतेची निगा राखणे अत्यंत महत्वाचे आहे कारण तिच्यामुळे पर्यावरणाची



**'पृथ्वी वाचवा', 'मातृग्रहाचे रक्षण करा'**

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

गुणात्मक पातळी तर वाढतेच शिवाय मानवाला जगण्यासाठीही याची आवश्यकता आहे. दुर्मिळ वनस्पती आणि प्राणी प्रजातींचे रक्षण करणे, त्यांना वाचवणे हे जैव-विविधतेच्या संरक्षणाच्या दृष्टीने अतिमहत्वाचे आहे. त्यांना जगण्यासाठी चांगली पर्यावरणाची स्थिती उपलब्ध करून देणे हाच त्यांच्या रक्षणाचा उत्तममार्ग आहे.

सूर्यमालेमध्ये पृथ्वी हा एकमेव ग्रह असा आहे की जेथे जीवसृष्टी अस्तित्वात आहे. परंतु सध्या मोठे बदल, अस्वस्थता, नैसर्गिक संकटे या गोष्टी पृथ्वीवर वाढत आहे. त्यामुळे नजिकच्या भविष्यकाळात कदाचित पृथ्वीचा दर्जा खालावण्याची शक्यता आहे.

आपली पृथ्वी, मातृग्रह वाचविण्यासाठी लोकशिक्षण, जागृती कार्यक्रमांचे आयोजन, नैसर्गिक स्त्रोतांचा समंजसपणाने वापर, प्रदूषण नियंत्रण वगैरे उपाय केले पाहिजेत. आपल्या मातृग्रहाला वाचविण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून जागृती, चर्चासत्रे, परिषदा, प्रहसने, चित्रपट, राष्ट्रप्रमुखांच्या चर्चा यांचे वारंवार आयोजन केले पाहिजे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

1. 'जीवावरण' म्हणजे काय?
2. जीव परिसर शास्त्र म्हणजे काय?
3. पर्यावरण प्रदूषणाच्या विविध प्रकारांची नावे लिहा.
4. जलप्रदूषण रोखण्यासाठी कोणते उपाय योजावेत?
5. जैव-विविधता म्हणजे काय?

**II. खालील पदांचा अर्थ लिहा :**

6. जीवावरण (Biosphere)
7. जीव परिसर असंतुलन (Ecologiecal imbalance)

8. जगातिक तापमान वाढ (Global Warming)

9. हरित गृह परिणाम (Green house effect)

10. ओझोनचा विरळपणा (Ozone depletion)

11. आम्लीय पाऊस (Acid Rain)

**III. लक्षात ठेवण्याचे मुद्दे :**

1. परिसर प्रदूषण (Environmental Pollution)

2. पर्यावरणदिन (Environmental Day)

3. सी.एफ.सी. (क्लोरो फ्लुरो कार्बन) (Chloro fluoro carbons)

4. पृथ्वीचे रक्षण (Save Earth)

**IV. उपक्रम :**

1. 'जागतिक तापमान वाढीचे परिणाम' याबद्दल माहिती गोळा करा. तसेच जागतिक तापमान वाढ रोखण्याचे उपायांची यादी तयार करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

***

प्रकरण - 28

# अर्थशास्त्राच्या मूलभूत संकल्पना

**या प्रकरणाच्या अभ्यासाने आपण खालील गोष्टी जाणून घ्याल.**

- *अर्थशास्त्राच्या मूलभूत संकल्पनांचा अर्थ समजून घ्याल.*
- *मागणी, पुरवठा, वितरण, उत्पादन यांच्या अंतर्गत संबंधाबद्दल जाणून ध्याल.*
- *राष्ट्राची आर्थिक अभिवृद्धी.*
- *श्रम.*

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

अर्थशास्त्राचा सुलभ अर्थ समजून घेण्यासाठी अर्थशास्त्रामधील वापरातील पदांचा अर्थ समजून घेणे महत्वाचे आहे. हे आपल्या रोजच्या वापरातील असतात. पण अर्थशास्त्रामध्ये त्याला विशिष्ठ अर्थ आणि व्याप्ती आहे. त्यामुळे कांही निवडक संकल्पनांचा थोडक्यात परिचय आवश्यक आहे.

**मागणी :** मागणीच्या इच्छेमध्ये, इच्छे बरोबर जाण्याची आवड आणि पैसे खर्च करण्याची शक्ती असेल तरच त्याला मागणी असे म्हणतात. योग्य किमतीत योग्य वस्तू व सेवा पैसे देवून खरेदी करणे याला मागणी म्हणतात.

साधारणपणे जेंव्हा वस्तूची किंमत वाढते तेंव्हा त्याची मागणी कमी होते.

उत्पादन क्षेत्रात मागणीचा मोठा प्रभाव आहे. जेंव्हा मागणी जास्त असते. तेंव्हा उत्पादन रोजगार उत्पन्न व पूरवठा वाढतो. व लोकाचे जिवणमान सुधारते देश प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असतो. जेंव्हा मागणी कमी होते. तेव्हा सर्वसाधारणपणे उत्पादन, उत्पन्न आणि पुरवठा देखिल कमी होतो. लोकांचे जीवनमान घसरते. तसेच राष्ट्रीय प्रगतीही कमी होते. त्यामुळे मागणी हां राष्ट्राच्या प्रगतीचा निर्देशांक मानला जातो.

**पुरवठा (Supply) :** पुरवठा म्हणजे दिलेल्या किंमतीला बाजारात विक्रीसाठी सहज उपलब्ध असलेल्या वस्तू आणि सेवांचे प्रमाण, सामान्यतः वस्तू आणि सेंवाच्या किंमती वाढल्यास बाजारपेठेत वस्तू आणि सेवांचा प्रवाह देखील वाढतो, तसेच लोकांचे राहणीमान सुधारते व राष्ट्र प्रगतीच्या दिशेने वाटचाल करते. वस्तूंच्या किंमती कमी झाल्यास बाजारपेठेत वस्तू आणि सेवांच्या प्रमाणात विक्री कमी होते. पण काही संदर्भामध्ये या नियमाचे उल्लंघन करून किंमत काहीही असो पुरवठा सारखाच असतो.

मागणी आणि पुरवठा दोन्ही परस्परावलंबी, एकातील बदल तात्काळ असतो आणि दुसरा किंमतीमध्ये व्यक्त केला जातो. उदाहरणार्थ :- मागणी कमी झाल्यास पुरवठा कमी होतो आणि किंमती कमी होतात. मागणी वाढली तर पुरवठा सुद्धा वाढतो आणि किंमतही वाढते. थोडक्यात सांगायचे तर मागणी आणि पुरवठा या मानवाच्या आर्थिक क्रियांचे आधार स्तंभ आहेत.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**उत्पादन :**

अर्थशास्त्रात उत्पादन या शब्दाचा व्यापक अर्थ आहे. यामध्ये वस्तूंचे उत्पादन तसेच सेवांचे उत्पादन समाविष्ट होते. जे वरवर पाहता उत्पादनातून संपत्तीची निर्मिती म्हणून पाहिले जात होते. तो केवळ निसर्गाच्या संपत्तीमध्ये उपयुक्ता जोडण्याचे काम करू शकतो. जी मानवाने निर्माण केली नाही. म्हणून उत्पादन केवळ विशेष उपयुक्तेची निर्मिती म्हणून समजले पाहिजे. अशा प्रकारे उत्पादित केलेल्या मालाचे मूल्य असणे आवश्यक आहे.

उत्पादन प्रक्रियेमध्ये रसद, वाहतूक, व्यापार इ क्रिया समाविष्ट असतात. जेव्हा तयार वस्तू व सेवा ग्राहकापर्यंत पोहचतात तेव्हाच उत्पादन प्रक्रिया पूर्ण होते. हे काम सुरु होण्यासाठी आणि समाप्त होण्यासाठी काही सांधन संपत्ती आवश्यक आहे. अर्थशास्त्र, संपत्ती, श्रम, भांडवल आणि उद्योगधंदे ज्याला अर्थशास्त्रज्ञ उत्पादकता म्हणतात. त्याशिवाय उत्पादन शक्य नाही. हे चार घटक एका विशिष्ट प्रमाणात जेव्हा सहकार्य करतात तेव्हाच

हे शक्य आहे. कोट्यावधी लोक उत्पादन प्रक्रियेमध्ये आपल्या क्षमतेनुसार वेगवेगळ्या पद्धतीने सहभागी झाले आहेत.

**वितरण :**

वितरण ही एक महत्वाची आर्थिक क्रिया आहे. जी राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण करण्याची गुरुकिल्ली आहे. वितरणाचे महत्वाचे कार्य म्हणजे उत्पादनाच्या घटकांच्या परस्पर संवादासह उत्पादित वस्तूंचे वितरण करणे. जमीन, मजूर, भांडवल, आणि संस्था यांच्यात वाटप केलेल्या राष्ट्रीय उत्पन्नाला अनुक्रमे भाडे, मजुरी, व्याज आणि नफा असे म्हणतात. हे वितरण उत्पादनाच्या प्रत्येक घटकाने बजावलेल्या भूमिकेच्या दरानुसार होते. त्याशिवाय मागणी आणि पुरवठा यांच्यात समतोल राखला पाहिजे, उत्पादनाना अडथळा आणणे, उत्पादनाच्या कोणत्याही घटकांना विशेष महत्व दिले जाऊ न देणे किंवा त्यापैकी कोणत्याही घटकाकडे दुर्लक्ष केले जाऊ नये. संपूर्ण आर्थिक व्यवस्थेत समतोल राखण्यासाठी हे आवश्यक आहे. वितरणावर उत्पादन मागणी, पुरवठा, उपभोग, किंमत निश्चिती इत्यादी अनेक घटकांचा प्रभाव पडतो.

**उपभोग :**

गरजापूर्ण करण्यासाठी वस्तू आणि सेवांचा वापर करणे म्हणजे उपभोग. उपभोगलेल्या वस्तू चांगल्या असू शकतात किंवा वाईट असू शकतात जोपर्यंत मानवाच्या इच्छा पूर्ण होत नाहीत तोपर्यंत तो त्याचा उपभोग घेत राहील. आधुनिक अर्थशास्त्रात उपभोगाला अत्यंत महत्वाचे स्थान दिले आहे.

उपभोगाचे दोन प्रकार आहेत.

1. उत्पादनासाठी वस्तू व सेवांचा उपयोग करणे.

2. इच्छा पूर्ण करण्यासाठी तयार वस्तू व सेवा वापरणे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**सामान्यपणे उपभोग म्हणजे इच्छेचे समाधान :**

एखाद्या राष्ट्राचे समाधानी जीवन आणि रोजगाराची स्थिती त्या देशाच्या उपभोगाच्या पातळीवर अवलंबून असते. कारण लोकांची इच्छा पूर्ण करण्यासाठी अर्थव्यवस्था असते. इच्छा हाच शेवटचा उपाय बनतो. उपभोग घेण्यासाठी उत्पादन आणि देवाणघेवाण करणे आवश्यक आहे. उत्पादन मानवाच्या गरजा पूर्ण करतो. जेंव्हा उपभोगाचे प्रमाण वाढते तेंव्हा उत्पादन आणि उत्पन्नसुद्धा वाढते. यामुळे रोजगाराची उपलब्धताही वाढते. जेंव्हा उपभोग कमी होतो तेंव्हा उत्पादन उत्पन्न आणि किंमत कमी होते. त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढते. त्यामुळे उपभोग व उत्पादन यांचे जवळचे संबंध आहेत. या दोन्हींचा एकत्रितपणे राष्ट्रीय उत्पन्नावर मोठा प्रभाव पडतो.

**उपयुक्तता :**

उपयुक्तात हा अर्थशास्त्रात मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या शब्दांपैकी एक आहे. मानवाच्या इच्छा पूर्ण करणारी शक्ती म्हणजे उपयुक्तता. यामध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मानवी इच्छा पूर्ण करणाऱ्या सर्व वस्तू आणि सेवांचा समावेश होतो. पण ते मोजता येत नाही. हे व्यक्तीनुसार बदलते. एकेका व्यक्तीमध्ये वेळोवेळी वेगवेगळ्या पद्धतीचा बदल होऊ शकतो. त्या मुळे आवडीमध्ये व उपयुक्ततेमध्ये फरक पडू शकतो.

उपयुक्तता म्हणजे समाधान नाही, तर ती समाधान देण्याची शक्ती आहे. समाधान हा उपयुक्ततेचा परिणाम आहे. याचा अर्थ असा की ज्या वस्तूंची उपयुक्तता आहे अशा सेवा आपल्याला समाधान देतात. उपयुक्ततेसाठी प्रयोजनाचा संबंध येत नाही. सामान्यपणे हे दोन्ही शब्द एकाच अर्थाने वापरणे योग्य नाही. उदा : मादक पदार्थांचे सेवन केल्यानंतर त्याचा काही उपयोग होत नाही तरी त्याचे सेवन करतात.

अर्थशास्त्रज्ञानी उपयक्ततेची चार श्रेणीमध्ये विभागणी केली आहे.

1. मूलभूत उपयुक्तता

2. आकाररूप उपयुक्तता

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

3. वेळेची उपयुक्तता

4. स्थान उपयुक्तता

**1) मूलभूत उपयुक्तता :** मूळ स्वरूपात वापरल्या जाऊ शकणाऱ्या बहुतेक वस्तू, सेवेमध्ये उदा. पाणी, फळे, अंडी इ. गोष्टी येतात.

**2) आकाररूप उपयुक्तता :** निसर्ग आपल्याला निश्चित आकार दिलेल्या वस्तू देतो व वापरण्यासाठी योग्य बनवतो. उदा. शिल्पी दगडाला मुर्तीचा आकार देतो, सुतार लाकडाला खुर्चीचा आकार देता किंवा बाकाचे रूप देतो.

**3) वेळेची उपयुक्तता :** ज्या गोष्टी मुबलक प्रमाणात उपलब्ध असताना संग्रहित केल्या जातात आणि जेव्हा त्या उपलब्ध नसताना वापरल्या जातात तेव्हा त्याचे मूल्य वाढते. उदा. आंब्याचे लोणचे तयार करणे आणि आंबे उपलब्ध नसताना वापरणे.

**4) स्थान उपयुक्तता :** एकाच ठिकाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेल्या गोष्टीना अधिक महत्व व मूल्य असते जेव्हा त्या अशा ठिकाणी नेल्या जातात की, तेथे त्या उपलब्ध नसतात. याला स्थान उपयुक्तता म्हणतात उदा. शिमल्यात पिकणारी सफरचंदे किंवा कोडगुमध्ये पिकणारी संत्री बेंगळूरूमध्ये मिळतील असे करणे.

**किंमत :**

किंमत म्हणजे पैशाच्या रूपात व्यक्त केलेले मूल्य, वस्तू किंवा सेवेसाठी भरावी लागणारी किमत. किमतीच्या अभ्यासाला अर्थशास्त्रात महत्वाचे स्थान आहे. प्रचंड मागणी असताना मोठ्या संख्येने ग्राहकाना मालवाहतूक सेवांचे वितरण करणे ही एक समस्या आहे. किंमत येथे महत्वाची भूमिका बजावते. किमतीचे मुख्य कार्य म्हणजे मागणी आणि पुरवठा यांचे समिकरण करणे. अशा समतोल किमती समांतर असतात मग मागणी बरोबर पुरवठा होतो वस्तू आणि सेवांची कमतरता होणार नाही. मागणी आणि पुरवठ्यात तफावत असल्यास वस्तू आणि सेवांच्या किमती बदलतात. परंतू कालांतराने किमतीची समान पातळी निश्चित केली जाईल.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

मागणी पुरवठा आणि किंमती समान होतात तेव्हा किंमत ठरवण्यात मागणी आणि पुरवठ्याची भूमिका महत्वाची असते.

**नफा :**

सामान्यतः उत्पादनाच्या उत्पन्नातून खर्च वजा केल्यावर जी रक्कम शिल्लक राहते त्याला नफा म्हणतात. अर्थव्यवस्थेनुसार उत्पादकाला उत्पादनासाठी मिळणाऱ्या सेवांचा लाभ म्हणजेच नफा होय. ही रक्कम भाडे, मजूरी, व्याज दिल्यानंतर उरते, जे उत्पादन प्रक्रियेस मदत करते. शिल्लक राहिलेली रक्कम कमी किंवा जास्त असू शकते कधी कधी अजिबात रहात नाही. उत्पादनाच्या नफा किंवा तोट्याला उत्पादनाची कार्यक्षमता जबाबदार असते.

अर्थशास्त्राच्या क्षेत्रात नफ्याला खूप महत्व आहे. नफा हे सर्व आर्थिक क्रियांचे मुख्य स्रोत आहे. जसा नफा वाढतो तशा आर्थिक क्रिया वाढतात आणि राष्ट्रीय प्रगती झपाट्याने होते. जसा नफा कमी होतो तशा आर्थीक क्रिया कमी होतात आणि राष्ट्रीय प्रगती खुंटते. त्यामुळे आर्थिक संकट निर्माण होते.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**सहकार :**

अर्थशास्त्रात सहकारला मोठे स्थान आहे. ही एक उद्योगी व्यवस्था आहे, जी जीवनाचा एक मार्ग मानली जाते. सहकार हा एक प्रकाश आहे. जो दुर्लक्षित, मर्यादित कर्तृत्वाच्या प्रभाव नसलेल्या लोकाना प्रज्वलित करते. सहकार प्रणालीने हे दाखवून दिले आहे की, सहकारी प्रयत्नामुळे सामान्य माणसाला लाभ मिळण्यास मदत होते. जी फक्त श्रीमंत व प्रभावशाली लोकांसाठी राखीव आहे. ही पद्धत कोणाचेही शोषण करत नाही.

सहकार ही एक असाधारण प्रणाली आहे. ज्यामध्ये लोक स्वेच्छेने सहयोग करतात आणि समानतेवर आधारित त्यांच्या आर्थिक हितांसाठी कार्य करतात. इथे स्पर्धेला जागा नाही. सभासदाना खरेदी केलेल्या वस्तूच्या किमतीवर आधारित सर्व व्यवहार सभासदांकडून केले जातात. नफा शेअर्सना दिला जातो. दलालाना येथे प्रवेश नाही. शोषणाला संधी

नाही. निवडून आलेले संचालक संस्थेचा कारभार पहातात. येथील सदस्य मालकही आहेत आणि कामगारही आहेत.

प्रत्येकासाठी सर्वजण, सर्वांसाठी प्रत्येकजण हा सहकाराचा मंत्र आहे. प्रत्येक भागधारकाचे कितीही शेअर्स असले तरीही सहकाराचा मंत्र आहेच. तसेच एखाद्या व्यक्तीला मिळू शकणाऱ्या शेअर्सच्या संख्येला मर्यादा आहे. हवेतर सदस्यत्व सोडण्याचे स्वतंत्र्य असते.

**राष्ट्रीय उत्पन्न :**

देशाच्या एकूण उत्पन्नाला राष्ट्रीय उत्पन्न म्हणतात. राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एका वर्षात देशात उत्पादित केलेल्या सर्व वस्तू आणि सेवांची एकूण किंमत, मूल्य होय. हे उत्पादनाच्या सर्व स्त्रोतांमधून एका वर्षात मिळालेले एकूण उत्पन्न आहे. राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करणे कठीण आहे. विशेषतः विकसनशील देशामध्ये ही एक मोठी समस्या आहे.

राष्ट्रीय उत्पन्नाचा आकार उत्पादनावर अवलंबून असतो. उत्पादनातील वाढीमुळे राष्ट्रीय उत्पन्न (लोकसंख्येच्या आधारित) वाढल्यास राष्ट्रीय उत्पन्न वाढल्याने राष्ट्राचा विकास आणि लोकांचे जीवनमान दिसून येते. राष्ट्रीय उत्पन्न वाढणे हे देशाच्या आर्थिक प्रगतीचे लक्षण आहे. घसरलेले राष्ट्रीय उत्पन्न देशाची आर्थिक दुर्दशा आणि लोकांचे खालावलेले जीवनमान दर्शवते. त्यामुळे सर्व राष्ट्रे आपले राष्ट्रीय उत्पन्न वाढवण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात.

**दरडोई उत्पन्न :**

राष्ट्रीय उत्पन्नाला राष्ट्राच्या एकूण लोक संख्येने भागल्यास दरडोई उत्पन्न मिळते. जर राष्ट्रीय उत्पन्न जास्त असेल तर दरडोई उत्पन्न देखील जास्त असेल (लोकसंख्येच्या वाढीवर अवलबून) आणि लोकांचे जीवनमान उंचावेल परिणामी लोक समाधानी जीवन जगतील.

जर राष्ट्रीय उत्पन्न कमी झाले तर दरडोई उत्पन्नही घटते (लोकसंख्येच्या वाढीनुसार) राहणीमानातही घट होते. गरिबी आणि रोगराई वाढली तर लोकांचे जीवन अडचणीत

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

येते. वेगवेगळ्या राष्ट्रांच्या दरडोई उत्पन्नाची तुलना केल्यास त्या राष्ट्राची आर्थिक स्थिती आणि त्या देशाची आर्थिक प्रगती दिसून येते.

**श्रम :**

कष्ट करणे आणि जीवनमान उंचावणे हा मनुष्याचा जन्मजात गुण आहे. प्रयत्न शारीरिक किंवा मानसिक असू शकतात. खोदणे, नांगरणी आणि उचलणे किंवा भार वाहून नेणे ही शारीरिक श्रमाची काही उदाहरणे आहेत. शिक्षक, वैज्ञानिक, वकील, तंत्रज्ञानी, कारकून इत्यादीचे कार्य हे मानसिक श्रमाची उदाहरणे आहेत. शारीरिक श्रमाला शारीरिक शक्ती लागते त्याच प्रमाणे मानसिक श्रमाला बुद्धीची आवश्यकता असते. प्रगतशील देशामध्ये शिक्षण घेणाऱ्याची संख्या जास्त आहे आणि ते खूप मेहनत करतात.

श्रम शारीरिक किंवा बौद्धीक असो त्यामध्ये भेदभाव करू नये दोन्ही वर्गातील काम गाराना समान सन्मान दिला पाहिजे. महात्मागांधीजींचा श्रमाच्या प्रतिष्ठेवर प्रचंड विश्वास होता. राष्ट्रीय अध्यक्षांशी बोलणे जितके महत्वाचे आहे तितकेच, अस्वच्छ व्यवसायात गुंतलेल्या कामगारांशी बोलणेही महत्वाचे आहे. हे त्यांनी प्रत्यक्ष दाखवून दिले.

अनेक सुशिक्षित लोक अशा नोकऱ्या शोधतात ज्यात बौद्धिक श्रम असतात. परंतु सर्वासाठी पुरेशा रोजगाराच्या संधी उपलब्ध नसतात. शारीरिक श्रमात रोजगाराच्या संधी अधिक आहेत एखाद्या व्यक्तीने उच्च आणि नीच्च भावना सोडल्या पाहिजेत आणि मिळेल ती नोकरी स्वीकारण्याची तयारी केली पाहिजे तेव्हाच त्याला श्रमाचे महत्त्व कळते त्यांच्यात समानतेची भावना निर्माण होते आणि राष्ट्राची उभारणी सुलभ होते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. मागणी असताना उत्पादन कमी होते ________

2. गरजा पूर्ण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तू व सेवा ________

3. राष्ट्रीय उत्पन्नाला देशाच्या एकूण लोकसंख्येने भागले तर आपल्याला मिळते ________ मिळते.

4. माल वाहून नेणे आणि माल उतरवणे यात सहभागी कामगाराना __________ श्रम म्हणतात.

5. शाळेत मुलांना शिकवणारे शिक्षक हे या श्रमाचे उदाहरण आहे ________

**II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

6. अर्थशास्त्रात मागणी म्हणजे काय ?

7. उत्पादन क्षेत्रात मागणीचा प्रभाव काय आहे ?

8. वितरण म्हणजे काय ?

9. वितरण प्रभावीपणे कसे केले जाऊ शकते ?

10. राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई उत्पन्न यातील फरक सांगा

11. श्रमाचे महत्व काय आहे ?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**III. उपक्रम :**

1. तुमच्या जवळच्या बाजाराला भेट द्या आणि किमती बदलत असताना गरजा कशा बदलतात ते पहा.

2. शाळेतील वाचनालयात येणारी वृत्तपत्रे वाचून आर्थिक क्षेत्रातील दैनंदिन बदल लक्षात घ्या.

***

## व्यवहार अध्ययन

## प्रकरण 29

# विविध व्यापारी संघटनांचा उदय

C7Y2J9

**या पाठातून आपण खालील घटक जाणून घेणार आहोत.**

- *व्यापारी संघटनांचे प्रकार समजावून घेणे.*
- *भागीदारी व्यवसायाची वैशिष्ट्ये, फायदे आणि तोटे.*
- *भागीदारी व्यवसायाची नोंदणी प्रक्रिया.*
- *हिंदू अविभक्त कुटुंबातील व्यवसाय.*

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

आज आपल्याला विविध व्यापारी संघटना दिसून येतात. त्यांचे पुढील चार प्रकारात वर्गीकरण होते.

1. खासगी क्षेत्रातील व्यापारी संघटना. (Private sector Business organisations)
2. सार्वजनिक क्षेत्रातील व्यापारी संघटना. (Public sector Business organisations)
3. संयुक्त व्यापारी संघटना. (Joint Sector Business organisations)
4. लोकोपयोगी संघटना. (Public Utilities)

या प्रकरणातून आपण खासगी क्षेत्रात येणाऱ्या लहानमोठ्या व्यापारी संघटनांचा अभ्यास करणार आहोत. खाजगी क्षेत्रात येणारे लहान उद्योग तीन प्रकारात विभागले जातात.

1. वैयक्तिक मालकीच्या संस्था (Sole Trading Concerns)
2. भागीदारी व्यवसाय संस्था (Partnership Firms)
3. हिंदू अविभक्त कुटुंबातील व्यवसाय संघटना. (Hindu undivided Family Firms)

## 1) वैयक्तिक मालकीच्या संस्था :

या संस्था एकाच व्यक्ति कडून चालविल्या जातात. तोच मालक, व्यवस्थापक असतो. सगळ्या प्रकारच्या नफ्या तोट्याला तोच जबाबदार असतो. व्यवसायासाठी लागणारे भांडवल ही त्याची वैयक्तिक जबाबदारी असते.

**वैशिष्ट्ये :** वैयकतीक मालकीची व्यापारी संघटना ही अगदी प्राचीन काळापासूनची आहे. ही संघटना सुरू करणे अगदी सोपे आहे. एकच व्यक्ती येथे मालक असतो. मालक आपल्या फायद्यासाठी आपल्याकडील सारी कौशल्ये पणाला लावून, सगळ्या नफ्यातोट्याची जबाबदारी घेऊन व्यवसाय चालवीतो. व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा बदलण्यासाठी कोणतीही कायदेशीर बंधने नसतात. येथे निर्माण होणाऱ्या समस्यांना मालक स्वतः जबाबदार असतो. यामध्ये कुटूंबातील सदस्यांची किंवा नोकरांची व्यवसायात मदत घेतली जाते. काही वेळेला मदती साठी कामगारांचीही नेमणूक केली जाते. सामान्यपणे हे व्यवसाय लहान प्रमाणात असतात पण अलिकडच्या काळात हे व्यवसाय मोठ्या प्रम णातही चालवले जात आहेत.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**वैयक्तिक व्यापारी संस्थेचे फायदे :**

1. व्यवसाय सुरू करण्यासाठी कोणतीही कायदेशीर औपचारिकता आवश्यक नाही.
2. ते स्वतःच्या भांडवलाने व्यापार सुरू करू शकतात.
3. व्यवसाय दैनंदिन चालवताना कोणतीही अडचण येत नाही.
4. मालक सर्व नफा उपभोगतो आणि सर्व तोटा सहन करतो.
5. ते थेट ग्राहकांच्या संपर्कात येतात.
6. ते काही सामाजिक सेवा देखील देतात.
7. ते काही लोकांना रोजगार देतात.
8. ते संपत्तीच्या वितरणात मदत करतात.
9. ते ग्राहकांच्या आवडी-निवडी समजून घेतात आणि त्यानुसार वस्तूंचा पुरवठा करतात.
10. ते सरकारला कर भरतात.

**वैयक्तिक व्यापारी संस्थेचे तोटे:**

अशाप्रकारच्या संस्थानाही तोट्याला सामोरे जावे लागते. ते म्हणजे :

1. भांडवल मर्यादित असल्याने ते व्यवसाय वाढवू शकत नाहीत.
2. एकाच व्यक्तीकडून चालविण्यात येत असल्याने व्यवस्थापकीय क्षमता मर्यादित असते.

3. निर्णय घेण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीचे सहकार्य मिळत नाही.
4. सर्व नुकसान एकाच व्यक्तीने सहन करावे लागते.
5. एकमेव व्यापाऱ्याचा मृत्यू किंवा दिवाळखोरीमुळे व्यापार बंद करावा लागतो.

**2. भागीदारी व्यवसाय संस्था (Partnership Firms) :**

वैयक्तिक व्यापारी संघटनातील दोषामुळे भागीदारी व्यवसाय अस्तित्वात येतात. यामध्ये दोन किंवा अधिक व्यक्ति एकत्र येऊन व्यापार सुरु करतात. भागीदारी व्यवसाय सुरु करण्यासाठी 1932 मध्ये 'भागीदारी कायदा' अस्तित्वात आला. या कायद्यातील चौथ्या कलमानुसार भागीदारी व्यवसायातील सर्व भागीदारांनी होणांरा नफा-तोटा वाटून घेण्यास तयार असावे लागते. बँकासारख्या व्यवसायात जास्तीत जास्त दहा भागीदार आणि सामान्यपणे इतर व्यवसायात वीस भागीदार असावे लागतात. या संघटनेमध्ये भागीदारानां भागीधारक असे म्हटले जाते.

**भागीदारांचे प्रकार :** भागीदारांचे वेगवेगळे प्रकार पुढील प्रमाणे :

**1. क्रियाशिल किंवा सक्रीय भागीदार :** हा व्यवसायामध्ये एक निश्चित भांडवल गुंतवून आपल्या भागीदाराबरोबर नफा तोटा बरोबरीने वाटून घेतो आणि व्यवसायाच्या सर्व कार्यात क्रियाशिल असतो.

**2. तटस्थ भागीदार :** हा भागीदार भांडवल गुंतवितो, पण धंद्याच्या दैनंदिन व्यवहारात भाग घेत नाही . त्याने घातलेल्या भांडवलाच्या प्रमाणात त्याची नफ्या - तोट्याची वाटणी असते.

**3. नाममात्र भागीदार :** जे भागीदार धंद्यामध्ये भांडवलही गुंतवित नाहीत आणि कोणत्याही व्यवहारात भाग घेत नाहीत. व्यवहारातील नफा तोट्यामध्ये ही त्यांची वाटणी नसते. पण त्या क्षेत्रातील विश्वासावर किंवा त्यांच्या नावावर व्यवसाय चालतो.

**4. अल्पवयीन भागीदार :** ज्या भागीदारांनी वयाची 18 वर्षे पूर्ण केलेली नाहीत ते अल्पवयीन भागीदार होय. असे अल्पवयीन धंद्यात भागीदार होऊ शकत नाहीत. पण एकमेकांच्या संमतीने अल्पवयीनास भागीदार म्हणून सहभागी करुन घेता येते. अल्पवयीन भागीदार होणाऱ्या नफ्यास भागीदार असतात. पण होणाऱ्या नुकसानीस जबाबदार नसतात. नवीन व्यवसाय चालू करताना अल्पवयीनांना भागीदार करता येत नाही.

या प्रकारा व्यतीरीक्त सचिव, वित्तपुरवठादार, भागीदार केवळ नफ्यात भागीदार असतात.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**भागीदारीचा करार (Partnership Deed) :**

हे करार पत्र विशेषता स्टँपपेपरवर लिहून घेतले जाते. काही वेळेला तोंडी करारपत्रही तयार केले जाते. लिखीत करार स्टँपपेपरवर लिहून घेतले जातात हे करार वेगवेगळ्या संघटनांचे वेगवेगळे असतात. सामान्यपणे या करारात संघटनेचे नाव, भागीदारांची नावे आणि पत्ता, संघटनेचा पत्ता व्यवसायाचे स्वरूप, संघटनेच्या शाखांचे पत्ते, व्यवसाय सुरू केलेली तारीख, भांडवलदारानी घातलेले भांडवल, फायद्या-तोट्यातील हिस्याचे प्रमाण, भागीदारांचे कर्तव्य, कार्याची विभागणी, नवीन भागीदाराला सहभागी करून घेताना पाळावयाच्या अटी, एखाद्या भागदारक निवृत किंवा मृत पावला असेलतर नविन भागीदार घेण्यासाठी केलेला ठराव भागीदारात मतभेद उद्भवले तर त्यावरील उपाय इत्यादी गोष्टींचा उल्लेख या करारात केला जातो.

**भागीदारी व्यवसायाचे फायदे :**

1. **सहज प्रारंभ :** भागीदारी व्यवसाय करण्यास कोणत्याही कायदेशीर बाबींची गरज नसते, यामुळेच भागीदारी व्यवसाय प्रारंभ करणे सुलभ असते.
2. **अधिक भांडवल :** भागीदारी व्यवसायात दोन किंवा अधिक व्यक्ती सहभागी असल्याने भांडवलाची अधिक गुंतवणूक होऊ शकते.
3. **उत्तम क्षमता:** एकापेक्षा अधिक भागीदार असल्याने कामाचा व्याप विभागला जाऊन अधिक चांगल्या प्रकारे व्यवसायाचे व्यवस्थापन करण्याची क्षमता येते.
4. **विश्वासार्हता :** भागीदारांची क्षमता आणि संख्या अमर्यादित असल्यामुळे विश्वासार्हता वाढते.
5. **तोट्याची वाटणी :** व्यवसायात येणारे नुकसान किंवा फायदा सर्व भागीदारांनी समान वाटून घ्यावयाचा असतो. त्यामुळे जरी तोटा झाला तरी एकट्यावरच नुकसानीचा भार पडत नाही.
6. **व्यवसायातील गुप्तता :** भागीदारी व्यवसायात जरी अनेक भागीदार असले तरी ते आपले आर्थिक व्यवहार उघड करत नाहीत.
7. **सहज विसर्जन :** भागीदारीतील व्यवसाय सहजपणे विसर्जित केला जातो. कोणताही भागीदार 14 दिवसांची नोटीस देऊन किंवा इतर भागीदारांची अनुम ती घेऊन आपली भागीदारी रद्द करु शकतो.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**भागीदारी व्यवसायाचे तोटे :**

1. काही वेळा भागीदारांच्यामधील मतभेद किंवा भांडणे व्यवसायावर परिणाम करतात.
2. भागीदारांच्या मर्यादेनुसार गुंतविलेले भांडवल देखील मर्यादित असते.
3. भागीदारांच्या निष्काळजीपणा आणि मुर्खपणा चे निर्णय एकूण. व्यवसायाला नुकसान कारक ठरतात.
4. जास्त जबाबदारी असल्यामुळे बरेच लोक भागीदार म्हणून पुढे येण्यास कचरतात.
5. एखाद्या भागीदाराने काढलेले दिवाळे किंवा मृत्यूमुळे भागीदारी व्यवसाय चालू रहात नाही.
6. भागीदारी व्यवसायात भागीदाराचा हिस्सा - हस्तांतरीत करणे अवघड जाते.
7. सरकारी नियंत्रण नसल्यामुळे किंवा पारदर्शक हिशोब न ठेवल्यामुळे भागीदारी व्यवसायाला कायदेशीर पाठिंबा मिळू शकत नाही.
8. एक किंवा अधिक भागीदार असल्यामुळे व्यवसायातील गुप्तता पाळली जाऊ शकत नाही.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**भागीदारी व्यवसायची नोंदणी (Registration of Partnership Firms) :**

वैयक्तिक मालकीच्या व्यवसाय संघटनांची नोंदणी करण्याचा कायदा नाही. पण 1932 च्या भागीदारी कायद्यानुसार भागीदारी व्यवसायांची नोंदणी करण्याची तरतूद केली आहे. नोंदणी करणे न करणे भागीदरांच्या इच्छेचा प्रश्न ठरतो. त्यामुळे नोंदणी सक्तीची नसते. नोंदणी केव्हाही करता येते. नोंदणी करण्यासाठी निर्धारित अर्जात संपूर्ण तपशिल देऊन सरकारने नेमलेल्या नोंदणी अधिकाऱ्याला सादर करावयाचा असतो. यासाठी शुल्क निर्धारित केलेले असते. त्यानंतर नोंदणी अधिकारी सगळे तपशिल व्यवस्थित तपासून जर ते तपशिल बरोबर असतील तर ''नोंदणी प्रमाणपत्र'' (Certificate of Registration) देतात.

**संस्थाच्या नोंदणीकरणाचे फायदे :**

- नोंदणीकृत संस्था तिसऱ्या पक्षाबद्दल (Third Party ) न्यायालयात दावा दाखल करु शकतात, पण नोंदणीकृत नसलेल्या व्यवसायिक संस्थांना हे शक्य नाही.

- नोंदणीकृत संस्था कर्जाच्या वसूलीसाठी इतर भागीदारांच्या विरुद्द दावा दाखल करु शकतात.
- नोंदणीकृत नसलेल्या संस्थांच्या विरोधात तिसरा पक्ष कर्जाच्या वसूलीसाठी दावा दाखल करु शकतो.
- नोंदणीकृत संस्था किंवा त्यातील भागीदारांच्या विरुध्द यातील एखाद्या भागीदार संस्थेचे विसर्जन करण्यासाठी किंवा हिशोबातील सत्यता पडताळून पाहण्यासाठी न्यायालयात दावा दाखल करु शकतो.

**3. हिंदू अविभक्त कुटुंबातील व्यवसायिक संस्था :**

या संस्था बहुतेक करुन फक्त भारतात आढळून येतात. ज्या हिंदू कायद्यानुसार चालविल्या जातात. या संस्थामध्ये फक्त हिंदू एकत्र कुटुंबातील पुरुष असतात. ज्याम ध्ये तीन पिढ्यातील मुलगा, नातू व पणतू त्यांना जन्मानुसार हा हक्क प्राप्त झालेला असतो. कुटुंबातील सर्वात जेष्ठ व्यक्ती व्यवसाय सांभाळते त्याला 'कर्ता' असे म्हणतात. व्यवसायातील सर्व गोष्टी कर्ता सांभाळतो. कर्त्याचा अधिकार मोठा असतो, त्या मानाने इतरांचे हक्क मर्यादित असतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. एका व्यक्तिच्या मालकीच्या संस्थाना ________असे म्हटले जाते.
2. भारतीय भागीदारी व्यवसाय नोंदणी कायदा ________ या वर्षी अंमलात आला.
3. बँकिंग व्यवसायात भागीदारांची कमाल संख्या ________ इतकी असावी लागते.
4. भारतीय अविभक्त कुटुंब व्यवसायाच्या प्रमुख सदस्याला ________ असे म्हटले जाते.
5. फक्त भारतात आढळून येणारी वैयक्तिक व्यवसाय संघटना ________ ही होय.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे दोन-तीन वाक्यात लिहा :**

6. लघु उद्योगधंद्याच्या संघटना कोणत्या ?
7. लघु उद्योगधंदे ग्राहकांना कोणत्या सेवा पुरवितात ?

8. भागीदारी व्यवसाय म्हणजे काय ?

9. नाममात्र भागीदार म्हणजे काय ?

10. भागीदारी व्यवसायाचे विसर्जन कसे करता येते ?

**III. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

11. वैयक्तिक मालकीच्या व्यवसायाचे चार फायदे लिहा.

12. वैयक्तिक मालकीच्या व्यवसायाचे चार तोटे लिहा.

13. भागीदारी व्यवसाय कसा सुरु केला जाऊ शकतो ? थोडक्यात सांगा.

14. भागीदारांचे वेगवेगळे प्रकार कोणते ?

15. भागीदारी व्यवसायाचे चार फायदे सांगा.

16. भागीदारी व्यवसायाचे चार तोटे सांगा.

17. भागीदारी व्यवसायाची नोंदणी करण्याचे फायदे कोणते ?

18. हिंदू अविभक्त कुटुंबातील व्यवसायाबद्दल थोडक्यात लिहा.

**IV. उपक्रम :**

1. सर्वत्र लोकप्रीय असलेल्या दोन जाहीराती गोळा करा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## प्रकरण - 30

# मोठ्या व्यापारी संघटना

S3Q4F4

**या पाठाच्या अभ्यासाने तुम्ही खालील मुद्दे शिकाल.**

- *मोठ्या व्यापारी संघटनांचे महत्व व वैशिष्ठये ओळखणे.*
- *सहकारी संस्थांची तत्वे, प्रकार, फायदे आणि तोटे.*
- *समभाग मुल्य (Joint Stock) कंपण्यांची उभारणी, रचना, फायदे आणि तोटे.*
- *बहूराष्ट्रीय कंपण्यांची वैशिष्ट्ये, फायदे व तोटे यांचे अवलोकन.*

एक व्यक्ती मालकत्व, भागीदारी व्यवसाय, हिंदू अविभक्त कुटुंबातील व्यवसाय संघटना इत्यादीना अपूरे भांडवल (अर्थ पुरवठा) व्यवस्थापण कौशल्याची कमतरता. सातत्याचा अभाव, विश्वासार्हतेची उणीव इत्यादी समस्याना तोड द्यावे लागते. या सम स्यावर तोडगा म्हणून मोठ्या प्रमाणातील व्यापारी संघटना अस्तित्वात आल्या. या पैकी कांही महत्वाच्या व्यापारी संघटना पुढील प्रमाणे :

1. सहकारी संस्था (Co-operative Societies)
2. भागीदारी व्यवसाय संघटना (Joint Stock Campanies)
3. बहुराष्ट्रीय निगम (Multi National corporation )

**1. सहकारी संस्था (Co-operatives Societies) :**

सहकारी संस्था आपल्याला जगभर आढळून येतात. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाकडून स्वयंप्रेरणेने स्थापन केलेल्या संस्था म्हणजेच सहकारी संस्था होय. जगातील पहिली सहकारी संस्था 1844 मध्ये इंग्लंड मधील रोचडेल येथे रॉबर्ट ओवेन यांनी स्थापन केली. सामान्यता या संस्थामध्ये सहभागी झालेल्या लोकांचा समान आर्थिक विकास करण्याचा उद्देश असतो, यामध्ये सदस्यांची आर्थिक पिळवणूक केली जात नाही. उदा. अनेक शेतकरी एकत्र येऊन सहकारी पतपेढ्या स्थापन करतात. येथून त्यांना कमी व्याज दरात कर्ज उपलब्ध होऊन सावकारी पाशातून मुक्तता होते. लघु उत्पादकांनी स्थापन केलेले सहकारी खरेदी-विक्री संघ दलालाच्या तावडीतून उत्पादकांना सोडवून त्यांच्या उत्पादनांना योग्य भाव मिळवून देण्यास सहाय्यभूत ठरतात.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**सहकारी संघांची रचना :**

भारतातील सहकारी संघाची रचना, सहकारी संघ अधिनियम 1912 मधील तरतुदीनुसार किंवा राज्य सरकारच्या प्रसासनाद्वारे नियंत्रित केली जाते. सहकारी संघाची रचना राज्यानुसार बदलन जाते. सहकारी संस्थांची निर्मिती करण्यासाठी किमान 10 सदस्य असावे लागतात. जे त्याच प्रदेशात, वर्गात, व्यवसायात गुंतलेले असून त्यांच्या आर्थिक गरजा समान असतात त्यांना संस्थापक (Promoters) म्हटले जाते. हे संस्थापक लिखीत स्वरूपात सहकारी संस्थांच्या नोंदणी अधिकाऱ्याला नोंदणी शुल्क भरूण संस्थेच्या नोंदणीसाठी अर्ज करतात. लिखीत अर्जात खालील गोष्टींचा उल्लेख अनिवार्य असतो.

1. नियोजित संस्थेचे नाव
2. संस्थेचा पत्ता
3. संस्थेची ध्येय धोरणे
4. कार्यकरण्याचे क्षेत्र
5. भागभांडवलाचा तपशिल
6. सभासदांची जबाबदारी

वरील गोष्टीना संस्थेची नियमावली (Bye-laws) म्हटले जाते. ती सहकारी संस्थेच्या नोंदणी अधिकाऱ्याकडे सादर केली जाते. अर्जातील सर्व गोष्टींची छाननी करून जर त्या समाधानकारक असतील तर नोंदणी अधिकारी संस्था अधिकृत असल्याचे प्रमाणपत्र देतो.

**सहकारी संस्थांची सामान्य वैशिष्ट्ये :**

1. या संस्था स्वखुशीने अथवा ऐच्छीक असतात.
2. इथे जात, धर्म, वर्ग, लिंग हा भेद न मानता प्रौढाना सदस्यत्व दिले जाते.
3. सदस्यांची कमाल मर्यादा नसते.
4. या संस्थांचे कार्य लोकशाही तत्वानुसार चालते. सर्व सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहतात प्रत्येक सभासदाला एका मताचा अधिकार असतो.
5. फायद्याची विभागणी सर्व सदस्यामध्ये समान रितीने केली जाते (शेकडा 6.25 पेक्षा कमी असत नाही)
6. या संस्था नोंदणीकृत असून सरकारचे त्यांच्यावर नियंत्रण असते.
7. फायद्यातील एक भाग सामान्य निधीकडे हस्तांतरीत केला जातो.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**सहकारी संघांचे प्रकार :**

1. सहकारी पत संस्था (Credit Co-operative Society)
2. व्यापारी खरेदी-विक्री संघ (Co-operative marketing societies)
3. उत्पादक सहकारी संस्था (Producers co-operative Societies)
4. ग्राहक सहकारी संस्था (Consumers Co-operative societies)
5. शेतकरी सहकारी संस्था (Farmers Co-operative societies)
6. गृह निर्माण सहकारी संस्था (House building Co-operative societies)
7. विविध प्रकारांच्या सेवासाठी सहकारी संस्था (Co-opertive societies for different services) उदा : शैक्षणिक संस्थाची स्थापना, व्यवस्थापन, आणि पाणी पुरवठा संघ इत्यादी.

**सहकारी संस्थांचे फायदे :**

1. या संस्था तयार करणे सोपे आहे.
2. जास्त भांडवलाची गरज नाही.
3. सर्व सदस्यांना समान अधिकार असतात.
4. सभासदामध्ये भेदभाव केला जात नाही.
5. लोकशाहीपद्धतीने चालते.
6. प्रत्येक मतदाराला समान मतदानाचा हक्क असतो.
7. सदस्याचे दायित्व मर्यादीत असते.
8. या संस्था सभासदाना बचतीचे महत्व पटवून देतात.
9. या संस्था भांडवलशाही आणि समाजवादी प्रथा यांच्यातील सुरेख मांडणी आहे.
10. या संघटनांचे ब्रीद वाक्य म्हणजे 'सर्वासाठी एक आणि एकासाठी सर्वजन हा या संस्थेचा उद्देश आहे'.

**सहकारी संस्थाचे तोटे :**

1. भांडवलाची मर्यादा असल्याने मोठे व्यवहार करणे शक्य होत नाही.
2. योग्य कर्मचारी मिळणे कठिण होऊ शकते.
3. प्रशासनाचा गैरवापर होण्याची शक्यता असते.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

4. पैशांचा दुरुपयोग होण्याची शक्यता असते.

5. पक्षपात आणि भ्रष्टाचार या सारख्या समस्या उद्भवू शकतात.

**भारतातील सहकारी संस्थांची चळवळ :**

1904 मध्ये भारतात सहकारी संस्था कायदा लागू करून सहकारी संस्थाची सुरूवात झाली. 1912 मध्ये एक अध्यादेश काढण्यात आला आणि नोंदणी अनिवार्य करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजना अंतर्गत सहकारी संस्था मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या. आज आपल्या देशात जवळ जवळ 8 लाख सहकारी संस्था अस्तित्वात आहेत. कर्नाटकातील पहिली सहकारी संस्था सध्याच्या गदग जिल्हातील गदग तालुक्याच्या 'कनगिनहाळ' येथे सुरू झाली बेंगळूरू नगर केंद्रिय सहकारी संस्था 1905 मध्ये स्थापण्यात आली. आपल्या राज्यातील धारवाड जिल्ह्याने सहकारी संस्थाच्या स्थापनेला जास्त महत्व दिल्यामुळे धारवाड जिल्ह्याला 'सहकारी संस्थांचा पाळणा' असे म्हटले जाते.

**2. समभाग निगम (Joint Stock Corporations):**

या संस्थाची स्थापना कारभार, विस्तार, मान्यता आणि विसर्जन हे भारताच्या 1956 च्या कंपनी कायद्यानुसार नियंत्रित केले जाते. या कायद्यानुसार समभाग कंपनी म्हणजे जणू एखादी व्यक्ति जीला कायदेशीर अस्तित्व आहे व ती शाश्वत (कायम) चालणारी आहे. ज्याला सर्व सामान्यांचा पाठींबा असतो.

'हेणी' च्या मते ''एक संयुक्त उपक्रम ही व्यक्तींची स्वयंचलित अशी संस्था असते, ज्याचे भांडवल हस्तांतरीत समभागांच्या स्वरूपात असते. मालकी सदस्यत्वाद्वारे निर्धारित केली जाते.''

संयुक्त उपक्रमांचा व्यवसाय त्यांचे भागधारक चालवतात. भागधारक त्यांच्या भाग भांडवलानुसार समभागांच्या विक्री आणि खरेदीमध्ये भाग घेतात. गुंतवलेल्या भांडवलानुसार त्यांना मिळणाऱ्या नफ्याची टक्केवारी असते.

**3. बहूराष्ट्रीय निगम (Multi National Corporation) :**

अशा कंपन्याची सुरुवात 1860 ला करण्यात आली. पण त्याना महत्व मात्र दुसऱ्या जागतीक युद्धानंतर प्राप्त झाले. सुरुवातीच्या काळात अमेरीका हा देश अशा कंपन्यांचे माहेरघर होते. पण नंतरच्या काळात अनेक युरोपियन देशात आणि जपानमध्ये अशा

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

कंपन्या उदयाला आल्या. आलिकडेच विकसनशील देशातही अशा कंपन्या विकसीत होत आहेत. उदा. दक्षिण कोरीयामध्ये अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत. (भारतामध्ये टाटा बिर्ला, इन्फोसिस, विप्रो यासारख्या कंपन्या आहेत).

**बहुराष्ट्रीय कंपन्यांचा अर्थ आणि विवरण :** बहुराष्ट्रीय निगम दोन किंवा अधिक देशात आपला व्यवसाय करतात, अंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अनुमानानुसार या कंपन्यांचे केंद्र एका ठिकाणी असले तरी त्यांचा व्यवसाय अनेक देशात चालतो. उदा सोनी (जपान) कोकाकोला (USA), सॅमसँग (दक्षिण कोरिया), हिंदूस्थान लिव्हर (इंग्लंड), फिल्लिप्स (हॉलंड) ग्लॉक्सो (इंग्लंड) इत्यादी.

**वैशिष्ट्ये :**

1. या कंपन्या मोठ्या असून त्यांची आर्थीक उलाढाल मोठी असते.
2. ते आपला व्यवसाय कमीतकमी सहा देशात चालवतात.
3. ज्या देशात ते व्यवसाय चालवतात तेथे वस्तूचे उत्पादन करतात.
4. मुख्य कचेरी अथवा केंद्र कंपनी कडून त्यांचा व्यवसाय नियंत्रीत केला जातो.
5. त्यांचे उत्पादन, खरेदी विक्री आणि इतर सेवा बऱ्याचदेशामध्ये असतात.
6. आंतरराष्ट्रीय व्यापारात या कंपन्या महत्वपूर्ण भूमिका बजावतात.
7. त्यांच्या व्यवसायीक व्याप्तीत येणाऱ्या देशाना ते तांत्रीक सोयी पुरवतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**बहुराष्ट्रीय निगमंचा मायदेशाला फायदा :**

1. मुळ देशाला यजमान देशाकडून कच्चा माल उपलब्ध होतो.
2. यजमान देशाला तांत्रीक सहाय्य व व्यवस्थापन कौशल्याचे ज्ञान प्राप्त होते.
3. या कंपन्या कच्चा मालाबरोबर तयार वस्तू देखील यजमान देशाना निर्यात करतात, त्यामुळे त्यांच्या नफ्यात वाढ होते.
4. आश्रयदात्या देशाकडून लाभांशा बरोबर गौरवधन (Royalty) व्यवस्थापकीय करार यातून प्रचंड फायदा मिळू शकतो.
5. यजमान देशात या कंपन्या रोजगार उपलब्ध करतात. या कंपन्याच्या माध्यमातून उत्तम दर्जाची उत्पादने करणे शक्य आहे.

**यजमान किंवा आश्रय दात्या देशाना होणारा फायदा :**

1. यजमान देशात भांडवलाची गुंतवणूक वाढु शकते.
2. जर यजमान देश विकसनशील देश असेल तर कंपनीचा मायदेश सर्व प्रकाराचे तांत्रीकज्ञान आणि व्यवस्थापन कौशल्य पुरवीतो. ज्यामुळे उत्पादनात विक्रमी वाढ होते
3. अश्रयदात्या देशाची निर्यात वाढवून आयात कमी करण्यास सहाय्य करतात.
4. उत्तम दर्जाचे उत्पादन करणे शक्य होते.
5. आश्रयदात्या देशामध्ये उद्योगाच्या संधी निर्माण होतात, संशोधन आणि अभिवृद्धी, कौशल्यात वाढ होते.
6. अंतरराष्ट्रीय संसाधनाचा जास्तीत जास्त उपयोग होतो.

**बहुराष्ट्रीय निगम दोष :**

जास्तीत जास्त लाभ हा कंपनीच्या मायदेशाला मिळतो. त्यामूळे यजमान देशाचे अहित होण्याची शक्यता असते. स्थानिक कंपन्या बहुराष्ट्रीय निगम स्पर्धा करू न शकल्यामुळे त्यांचे अस्तित्व नाहीशे होते आणि बहुराष्ट्रीय निगमाचे वर्चस्व वाढते. अशा निगमांवर मानवी हक्कांची पायमल्ली केल्याचा आरोप बऱ्याच वेळा अढळून येतो. यजमान देशाची नैसर्गिक साधन संपती कमी होत जाते. या कंपन्या कर भरणा करताना बऱ्याच वेळ अवैध मार्गाचा अवलंब करतात. या कंपन्या काहीवेळा यजमान देशाच्या राजकारणात ढवळाढवळ करतात.

भारताच्या औद्योगिक धोरणानुसार अलिकडच्या काळापर्यंत विदेशी कंपन्याच्या भारतातील गुंतवनूकीवर निर्बंध लादलेले होते. पण 1991 पासून भारताने, मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण स्विकारल्यामूळे बऱ्याच विदेशी कंपन्यानी त्यांचा व्यवसाय भारतात सुरू केला आहे. याचबरोबर काही भारतीय कंपन्यानी देखील अनके देशात आपला विस्तार केला आहे. विप्रो इन्फोसिस इत्यादी सध्या सुमारे 40 बहुराष्ट्रीय निगम भारतात कार्य करत आहेत.

आतापर्यंत आपण एक मालकत्व, व्यवसाय भागीदारी, हिंदू अविभक्त कुटूंबातील

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

व्यवसाय, सहकारी संस्था, भाग भांडवल कंपन्या आणि बहुराष्ट्रीय निगम ज्या खाजगी क्षेत्रात येतात त्यांचा अभ्यास केला. याशिवाय आपल्याकडे सरकारी अस्थापने व लोकोपयोगी संस्था देखील आहेत.

- **सरकारी अस्थापने (Government Under Taking)**: सरकारी अस्थापने ही सार्वजनीक उदेशासाठी असली तरी त्याची मालकी सरकारकडे असते. त्याचे नियंत्रण आणि व्यवस्थापन सरकार करते. ही अस्थापने केंद्र सरकार, राज्यसरकार किंवा स्थानिक स्वराज्य संस्था सुरु करतात आणि त्यांच्या नियंत्रणाखाली ठेवतात. उदा. खाणउद्योग, धातुउद्योग, जहाज बांधणी, विमानबांधणी इत्यादी.

- **सार्वजनीक अस्थापने :** सरकार आणि जनता यांच्या नियंत्रणाखाली असतात उदा. गुजरात फर्टीलायझर, कोचीन रीफायनरीज इत्यादी.

- **लोकोपयोगी संस्था (Public utilities)** : या सरकारच्या आखत्यारीत असल्या तरी त्या लोकाना आवश्यक वस्तू आणि सेवा पुरवितात. त्यांचा फायदा मिळविण्याचा उद्देश नसतो. उदा. स्वयंपाकाचा गॅस, पाणी, विद्युतशक्ती रेल्वे, डाक विभाग, दुरध्वनी नियंत्रण इत्यादी.

**शेअर बाजार :** भाग भांडवल कंपन्यातील गुंतवणूक छोट्या छोट्या घटकात विभागलेली असते. त्याला भाग अथवा शेअर म्हटले जाते. भाग भांडवल कंपन्यावर अवलंबून असणाऱ्या भांडवलात वाढ करण्यासाठी कर्जरोखे (Debentures) जारी करतात. यामध्ये त्यांचा भाग केव्हाही विकू शकतात.

भारतात अशाप्रकारचा शेअरबाजार 1875 साली मुंबई येथे स्थापन करण्यात आला. तो जगातला एक उत्तम दर्जाचा शेअर बाजार आहे. अनेक ठिकाणी शेअर बाजार आहेत ते दुय्यम दर्जाचे आहेत या ठिकाणी फक्त शेअर्स आणि कर्जरोखे यांचा व्यवहार चालतो, अलिकडे कोलकत्ता, बेंगळोरमधील शेअर बाजार त्यांचा व्यवहार इलेक्ट्रानिक माध्यमातून पार पाडत आहेत. शेअर बाजारातील सर्व व्यवसाय सेबी (Securities Exchange Board of India) च्या अधिकाराखाली नियंत्रीत केले जातात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. भारतातील सहकारी संस्थाची निर्मिती भारतीय सहकारी संस्था ________ कायद्याद्वारे नियंत्रीत केली जाते.
2. जगातील पहिली सहकारी संस्था ________ यानी ________ या देशात सुरूकेली.
3. कर्नाटकातील पहिली सहकारी संस्था ________ येथे सुरू करण्यात आली.
4. बहुराष्ट्रीय निगम सर्वप्रथम ________ या देशात सुरू करण्यात आल्या.
5. भारतातील महत्वाच्या बहुराष्ट्रीय निगम म्हणजे ________ आणि________
6. भारतात सर्वप्रथम शेअरबाजार ________ येथे सुरू करण्यात आला.

**II. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

7. सहकारी संस्थाची वैशिष्ट्ये सांगा.
8. वेगवेगळ्या सहकारी संस्था कोणत्या?
9. सहकारी संस्थाचे फायदे आणि तोटे सांगा.
10. बहुराष्ट्रीय निगमचे देशाला काय फायदे आहेत?
11. शेअर बाजाराचे प्रमुख कार्य कोणते?

**III. उपक्रम :**

1. तुमच्या शिक्षकांच्या मदतीने तुमच्या शाळेत सहकारी संघ स्थापन करा.

***

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS